# सातवा शिक्का

धन्यवाद, भाऊ. आपण उभे असताना, आपण प्रार्थना करुया.

2 सर्वसमर्थ परमेश्वरा, जीवनाचा लेखक आणि सर्व चांगल्या, आध्यात्मिक दानांचा दाता, आम्ही, खरोखरी तुझे ह्या अद्भूत, महान समयासाठी तुझ्या उपस्थितीत आहे, खूप आभारी आहोत, प्रभू, जो आमच्या जीवनात एक महान चित्तवेधक क्षण आहे, असा समय जो आम्ही कधीच विसरणार नाही, ह्याची पर्वा नाही की आम्हाला किती वेळ थांबावे लागेल. आणि परमेश्वरा, आम्ही प्रार्थना करतो की ह्या समाप्तीच्या रात्री…आम्ही ह्या सणाच्या अंतिम दिवशी आम्ही पवित्र वचनाकडे लक्ष देत आहोत, येशू त्यांच्यामध्ये उभा राहीला आणि जोराने बोलू लागला, "जर कोणी मनुष्य तहानलेला असेल, त्याने मजकडे यावे!" आणि स्वर्गीय पित्या मी प्रार्थना करतो की आज रात्री तीच गोष्ट केली जाईल की आम्ही आमच्या प्रभूची वाणी ऐकू शकू जी आम्हास बोलावीत आहे, आणि आम्हास त्याच्या सेवकाईसाठी अधिक जवळ बोलावीत आहे. आम्ही अनुभव करतो की आम्ही त्याची वाणी अगोदरच, हे शिक्के उघडतेवेळी ऐकलेली आहे, की हा अंतिम समय आहे, आणि समय जवळ आहे. ह्या आशीर्वादांना आम्हास प्रदान कर जे आम्ही पित्या, येशू ख्रिस्ताच्या नावाने आणि त्याच्या गौरवासाठी मागत आहोत. आमेन.

तुम्ही बसू शकता.

3 मला हे सांगण्यास आवडेल, की माझ्या जीवनांतील माझ्या सर्व सभांमध्ये, मी विश्वास करितो की ह्या आठवड्यातील सभा हा माझ्या जीवनांतील सर्व सभांमध्ये सर्वात गौरवी समय होता. ह्याच्याशी काही कर्तव्य नाही की मी काय केले…अगोदर, मी महान चमत्कार झालेले पाहीले, आणि चंगाई सभा पाहिल्या, परंतु ती त्या सर्वांपलिकडे आहे. येथे असणे हा माझ्या जीवनांतील महान आणि गौरवांतील समयांपैकी एक आहे. आणि ह्या लहान प्रार्थना गृहाने घेतलेले वेगळे रुप केवळ तेच नाही, परंतु आतील वेगळे रुप पाहात आहे!

4 आणि, आता, मी बीलीला विचारित होतो; त्याने मला नेण्यासाठी येण्यास फार उशीर केला. त्याने सांगितले तेथे एका आणखी समुदायाने बाप्तिस्मा घेतला आहे. ज्यांनी, ह्या आठवड्यात, प्रभू येशू ख्रिस्ताच्या नावात बाप्तिस्मा घेतला आहे अशा लोकांची संख्या शंभराच्या वर आहे. म्हणून, आम्ही—आम्ही आभारी आहोत. आणि परमेश्वर तुम्हास आशीर्वादीत करो!

5 आणि, आता, जर तुमच्याकडे आराधनालय नसेल, आम्ही तुम्हाला येथे आमंत्रित करतो, की या आणि आम्हासमवेत सहभागिता करा. लक्षात ठेवा, की हे आराधनालयाचे द्वार उघडे आहे. आपण संप्रदाय नाही, आणि मी आशा आणि विश्वास करतो की ते कधीच संप्रदाय होणार नाही. ही फक्त एक सहभागिता आहे जेथे पुरुष आणि स्त्रिया, आणि मुले आणि मुली, परमेश्वराच्या मेजासभोवती भेटतात, आणि वचनासभोवती सहभागिता करतात, आणि आपल्यामध्ये सर्व गोष्टी सामाईक आहेत.

6 आता, आणि आपल्याला एक विस्मयकारक पाळक आहेत, एक देवाचा खरा मनुष्य, आणि मी त्याच्यासाठी फार आभारी आहे. जर तुम्ही स्मरण कराल, एका वर्षाआधी, एक दृष्टांत पाहीला होता की एका जागी अन्न साठवलेले होते. आणि ते अगदी बरोबर आहे. आणि आम्ही…

7 आता आपल्याकडे, ती पुरेशी जागा, संडे स्कूल वर्गासाठी, सर्व वयोगटासाठी आहे, आणि आम्ही ह्या संधीबद्दल फार कृतज्ञ आहोत. कोणीतरी कधी म्हटले आहे, जर त्यांच्याकडे रविवारचे शाळेचे वर्ग असते तर तेथे ते त्यांच्या मुलांना पाठवू शकले असते. आता, तुमच्याकडे, ते आहेत. म्हणून, आता, म्हणून तुम्ही येथे या आणि आमच्याबरोबर राहा जर तुमच्याकडे प्रार्थनागृह नाही.

8 अर्थात, जर तुमच्याकडे चांगले प्रार्थनागृह आहे जेथे तुम्ही जात आहात, आणि सुवार्तेचा प्रचार करीत आहात, असे सर्व, का, तो—तो आमच्यासारखा आणखी एक समुह दुसरीकडे आहे. परंतु जर तुमच्याकडे प्रार्थनागृह नाही, आणि तुम्ही…

9 मला ठाऊक आहे, की कितीजण देशाच्या दुसऱ्या भागांतून, हे आराधनालय त्यांचे प्रार्थनागृह करण्यासाठी आले आहेत. आणि आम्ही निश्चितच येथे प्रभूच्या वचनाकडे तुमचे स्वागत करतो. आणि मला स्मरण आहे, मला वाटते, जेव्हा मी येथून गेलो होतो, मी तुम्हाला सांगितले होते की—की माझ्या सभा येथे ह्या आराधनालयात होतील.

10 मला अजून ठाऊक नाही की भविष्यात प्रभूने माझ्यासाठी काय ठेवले आहे. मी विश्वास करतो की ते त्याच्या हातात आहे, मी कोणत्या अंधश्रद्धेवर किंवा इतर गोष्टीत विश्वास करीत नाही, मी प्रत्येक दिवशी त्याच्यासाठीच वाट पाहतो की त्याने मला त्या जागेत न्यावे जेथे मी त्याची सेवा अधिक चांगल्या रीतीने करु शकेन. आणि जेव्हा तो माझ्याबरोबर हे पूर्ण करील, तेव्हा मी विश्वास करतो की तो मला शांतीने त्याच्या घरी स्विकारील.

11 आणि, आता, मी ह्या आराधनालयाच्या लोकांच्या सहकार्याबद्दल खूप आभार मानतो. कारण बीली ह्या आठवड्यात मला सांगत होता, की, मला वाटते, प्रत्येक कुटूंब जे ह्या आराधनालयात प्रतिनिधीत्व करते त्यांच्याबरोबर कोणीतरी आहे. त्यांनी आपली घरे आणि ठिकाणांना उघडले आहे, आणि त्या लोकांना आत घेतले आहे ज्यांच्याकडे जाण्यासाठी कोणतेच स्थान नाही. आता, ते एक खऱ्या ख्रिस्ती व्यक्तिचे कार्य आहे. आणि काही घरात खूप लोक लहानशा जागेत थांबलेले आहेत, ह्यासाठी की तेथे ते राहू शकतील.

12 कारण, हा एक फार कठीण समय आहे, त्यामुळे काही प्रकारचे काम खेळाच्या जगतात चालू आहे. काही प्रकारचा बास्केट बॉल किंवा काही गोष्टी आणि—आणि आरक्षण करण्यात आले आहे. त्यात एक मोठा समुह तेथून…

13 मला वाटते, येथे ह्या छोट्या मंडळीत, जवळजवळ, अठ्ठावीस किंवा तीस राज्यांचे येथे प्रतिनिधित्व करीत आहे, दोन विदेशी राष्ट्रांखेरीज, म्हणून हे एक छोटेसे संजीवन आहे, म्हणून, त्याने आपल्यामध्ये स्थान प्रस्थापित केले आहे. माहीत असावा…

14 मी आज, काही लोकांना विचारीत होतो. मी म्हणालो, “मला वाटते तेथे ह्या सभेत जेफर्सनविलेतील फारशी लोक नव्हती.”

15 काही जण म्हणाले, “आम्ही आत येऊ शकलो नाही.” अच्छा, तसे होते. ते कारण होते. काही पोलीसांना, आणि इतरांना सभेत येण्याची इच्छा होती. परंतु म्हणाले, सभोवती असे बोलत होते, म्हणाले परंतु ते आले आणि ते आत जाऊ शकले नाही. कारण ते आत जाण्याअगोदर तेथे पूर्ण भरले होते. म्हणून कदाचित, त्यांच्याकडे नंतर वेळ होता, आणि ते आले नाही. म्हणून आता लोक इतर स्थानांतून येत आहेत, म्हणून आम्ही खूप आभारी आहोत.

16 आता, मला ठाऊक नाही. ह्या नंतर जी दुसरी गोष्ट असेल ती म्हणजे दुसरा संदेश सात तुतारींचा असेल. परंतु, शिक्क्यांमध्येच, प्रत्यक्षात सर्व गोष्टींचा समावेश आहे. मंडळ्यांची युगे नंतर येतात, आणि आपण त्यांना प्रथम ठेवले, जे अधिक—जे अधिक महत्त्वपूर्ण होते; परंतु त्या वेळेस. आता, उघडलेले शिक्के दाखवितात की मंडळी कोठे जात आहे, आणि कसा तिचा शेवट होतो. आणि आता, मी विचार करतो, की स्वर्गीय पित्याचा निश्चितच आम्हावर अनुग्रह आहे, की आम्हाला हे पाहू दे की आमच्याकडे काय आहे.

17 आणि मी हे जुन्या टिप्पण्याकडे पाहून बोलत आहे ज्यावर, खूप वर्षांअगोदर, मी प्रचार केला आहे, मी आत येऊन तेच बोलत होतो जो मी विचार केला होता की ठीक होते, आणि पुढे जात राहीलो. ते जरा विषयापासून वेगळे होते. आणि आता, ते सर्व चारही शिक्के, ह्या सर्वांवर, मी वीस मिनीटांचा संदेश दिला. प्रकटीकरणाचे, चारही घोडेस्वार, मी त्यांना एकत्रीतपणे घेतले आणि म्हटले, "एक घोडा सफेद झाला," मी म्हटले, "तो कदाचित प्रारंभीचा काळ आहे. आणि दुसरा घोडा दुष्काळात गेला," आणि मग अशाप्रकारे. परंतु, ओह, जेव्हा वचन वास्तवात प्रगट झाले, तर ते ह्यापासून शेकडो मैल दूर होते.

18 म्हणून, आपल्याला आवश्यकता आहे ती म्हणजे लक्ष द्या आणि वाट पाहा. आणि कदाचित ह्या वेळेस ते करण्याची तेथे कदाचित पुष्कळ गोष्टी सांगितल्या जातात. ज्या इतर लोकांबरोबर जुळत नसतील. परंतु मी विश्वास करतो, जेव्हा तो महान समाप्तिचा समय येतो आणि आपण आपल्या प्रभूला भेटतो, तुम्हाला समजेल ते योग्य होते. ते—ते—ते वास्तवात योग्य आहे.

19 आता, जे लोक शहरा बोहरुन, विविध स्थानांतून निरनिराळ्या राज्यांतून आणि देशांतून आले आहेत, मी कशाप्रकारे तुमच्या प्रामाणिकपणाची प्रशंसा करु जे तुम्ही इतका लांबचा प्रवास करुन, आणि सुट्ट्या घेऊन येथे आला आहात. आणि त्यांच्यातील काहीजणांना राहण्यासाठी जागा देखिल नाही! मला—मला ठाऊक आहे, कारण मी त्यांच्यातील काहीजणांना राहण्यासाठी जागा मिळवून देण्यास मदत केली आहे. त्यांच्याकडे खाण्यास किंवा आणखी कशासाठी पैसे नाही...आणि ते कसेही करुन काहीतरी घडण्याच्या अपेक्षेने त्याची काळजी घेण्यासाठी आले आहेत. आणि त्यामधील इतक्या महान विश्वासाबरोबर, ह्याची पर्वा न करता की त्यांना जेवणाशिवाय जावे लागेल, किंवा त्यांना राहण्यास जागा नाही, तरीही कसेही करुन त्या गोष्टी ते ऐकू इच्छितात, ज्या घडलेल्या आहेत. तुम्हाला ठाऊक आहे ही खरोखरीच मोठी गोष्ट आहे. आणि प्रत्येकजण त्यांतील शंभर टक्के आहेत!

20 मागे मी माझ्या मेहूण्याला भेटलो, ज्याने...ह्या प्रार्थनागृहाच्या वीट बांधकामाचे काम केले होते आणि इत्यादी. आणि मी त्याला सांगत होतो की मी कशी त्याच्या कामाची प्रशंसा केली. मी काही एक—एक वीटेचा गवंडी नाही, किंवा त्याविषयी मला काहीच ठाऊक नाही. परंतु मला हे ठाऊक आहे की चौरस कोपरा काय असतो, आणि काय तो ठीक बनविला गेला आहे किंवा नाही.

21 आणि त्याने म्हटले, "मी तुला सांगेन." तो म्हणाला, "तेथे असा कधीच समय नव्हता. क्वचितच, तुम्ही असे ऐक्य लोकांमध्ये पाहता, जेव्हा ते सर्व एकत्र मिळून काम करतात."

22 भाऊ वूड, भाऊ राबर्सन, आणि प्रत्येक जणांनी प्रत्येक गोष्ट त्यांच्या जागेवर ठेवली. आणि तो भाऊ ज्याने—ज्याने ध्वनिविषयक प्रणाली बसविली...माझा अर्थ श्रोत्यांना ऐकण्याची व्यवस्था आणि सर्वगोष्टी प्रार्थना गृहात केल्या. त्यांनी म्हटले, "सर्वगोष्टी, बरोबर

कार्य करीत आहेत.” जेव्हा त्यांना काही गोष्टीची गरज भासली, तेथे ती गोष्ट करण्यासाठी व्यक्ती उभा होता. म्हणून...परमेश्वर सर्व कार्यात उपस्थित आहे. आम्ही ह्यासाठी खूप आभारी आहोत.

23 मंडळीत पुष्कळ महान दान देणारे, मदतीसाठी आहेत, जसे आमचे भाऊ व बहीण डाऊच येथे बसलेले आहेत, आणि पुष्कळ इतरांनी ह्या कार्यासाठी खूप दान दिले. मी विचार करतो, ह्या समयी त्यांना कुठल्याही गोष्टीत उणे पडले नाही आणि प्रत्येक गोष्टीची किंमत चुकवली गेली. म्हणून आम्ही त्यासाठी फार आभारी आहोत.

24 लक्षात ठेवा, ही तुमची मंडळी आहे, कारण तुम्ही ख्रिस्ताचे दास आहात आणि त्यासाठीच ते येथे बांधले गेले आहे, एक उघडलेला दरवाजा की सेवक बनविले जावे, आणि ते सेवक जे पहिल्यापासून ख्रिस्ताचे सेवक आहेत की त्यांनी आत यावे येशू ख्रिस्ताबरोबर सहभागिता करुन आनंदीत व्हावे. आणि आम्ही तुम्हाला सांगू इच्छितो की प्रत्येक जणाचे स्वागत आहे.

25 आणि आता जेव्हा तुम्ही कधी, मला अभिषेकाखाली बोलताना ऐकता की मी संघटनांचे पडदे काढून उघड करतो, माझा—माझा अर्थ मी तुमच्या मंडळीतील पाळकाविरुध्द, किंवा भावा—बहिणींविरुध्द आहे असा नाही. कारण, शेवटी, प्रत्येक संस्थेत परमेश्वराचे लोक आहेत. परंतु तो ह्या संस्थाचा स्विकार करीत नाही; तो त्या संस्थेतील व्यक्तीला स्विकारतो. आणि तो...संस्थाना घेत नाही.

26 म्हणून, जेव्हा लोक स्वत:ला संस्थे सभोवती बांधून घेतात, तेव्हा तुम्हाला ठाऊक आहे, त्यांनी त्यांची मंडळी काय सांगते ह्याखेरीज काहीच दिसू शकत नाही. आणि तेच इतरांबरोबरच सहभागिता तोडते, आणि ती एक प्रणाली आहे ज्याविषयी परमेश्वर प्रसन्न नाही, आणि ते जगिक कार्य आहे जे देवापासून नियुक्त केलेले नाही.

27 म्हणून, आता, मी कोणा व्यक्तीला बोलत नाही. कॅथलिक, यहुदी, ते कोणीही असो, किंवा—किंवा मेथॉडिस्ट, बाप्टिस्ट, प्रेसबेटेरियन, कुठलीही संस्था, कुठलीही संस्था नाही आणि—आणि संप्रदायशिवाय, आणि सर्व ठिकाणी, तेथे परमेश्वराची लेकरे बसलेली आहेत. समजले? आणि कित्येक वेळा मी विश्वास करतो की ते तेथे बाहेर एका उद्देशाने असतात, की त्यांना प्रकाश द्यावा, जे नियुक्त केलेले आहेत त्यांना सर्व ठिकाणांहून खेचावे. आणि—आणि त्या महान दिवशी आपण तेव्हा पाहू की प्रभू येशू ख्रिस्ताची मंडळी त्या महान भेटण्याच्या समयी हवेत बोलावली जाईल, आणि आपण सर्व त्याला भेटण्याकरिता वर जाऊ. आणि मी—मी—मी त्या तासाची वाट पाहत आहे.

आता, तेथे खूप काही सांगता येते.

28 आणि आज रात्री, ह्या अंतिम समाप्तिच्या रात्री, जसे नेहमी सर्वजण...प्रत्येक आरोग्यदानाच्या सभेत मी पाहतो की आरोग्यदानाच्या सभेत मोठ्या गोष्टी होण्याची अपेक्षा लोकांना तणाव चिंताग्रस्त करते. आणि तीच गोष्ट आज रात्रीही मी पाहतो की प्रत्येक जण अपेक्षेखाली आहे की पाहू कशा प्रकारे...आणि प्रत्येक रात्री हे शिक्के उघडण्याच्यावेळी असेच होते.

29 आता मला हे अधिक स्पष्ट करायचे आहे. प्रत्येक वेळी हे शिक्के त्या जागेवर आले; प्रत्येक गोष्टीत मी त्यांच्यावर विश्वास केला, आणि दुसऱ्यांची पुस्तके वाचली, त्यापेक्षा ते भिन्न होते जे माझ्या खोलीत आले.

30 आणि माझे मन, ह्यासमयी...मी ह्या सकाळी आरोग्यदानाची सभा ठेवण्याचे कारण हे आहे, कारण माझे मानवी मन माझ्या स्वतःच्या विचारधारणेच्या मार्गापासून इतके दूर

झाले. मी आत खोलीत पडदे खाली ओढून आणि प्रकाश करुन राहण्याचा प्रयत्न केला हा आठवा दिवस आहे. आणि मी माझ्या गाडीमध्ये देखिल कुठे जाण्यासाठी बसलो नाही.

31 मला काही भावांसोबत, बँकेमध्ये, काही चिठ्ठ्यांवर आणि गोष्टींवर, पैसे आणि गोष्टींवर सही करण्यास जावे लागले कारण ह्या गोष्टी ह्या प्रार्थनागृहासाठी उधार घेतल्या होत्या. परंतु मी—परंतु मी तेथून थेट परत आलो, आणि अभ्यास करण्यास गेलो.

32 आणि ही आश्चर्याची गोष्ट आहे की, तेथे एकही व्यक्तीने काही सांगितले नाही किंवा नेहमी, ते दरवाजा ठोठावतात आणि ओढतात आणि सभोवती असतात. तेथे अशी एकही गोष्ट झाली नाही. ते खूप आश्चर्यकारक होते.

33 जेथे मी भाऊ वुड्सच्या येथे खात होतो. नेहमी ती जागा गाड्यांनी भरलेली असते. आणि ह्या समयात आठ किंवा दहा विभिन्न लोक येथे राहण्यास येणार होते, आणि त्यांच्यातील एकही आला नाही.

34 तेव्हा, ह्या सकाळी, मी कधीच ही सकाळ विसरणार नाही जो अनुग्रह आपल्या तारणाऱ्याने त्याच्या थकलेल्या, दमलेल्या दासावर केला. जेव्हा, मी एका बिचाऱ्या व्यक्तीच्या प्रश्नाला उत्तर दिले, आणि, माझ्या बुद्धीप्रमाणे विचार करीत होतो की मी बरोबर केले आहे. आणि अचानक, जसे काही मी—मी एका मुलाकडून मी काहीतरी खेचून घेतले, मला इतके अपराधी असल्यासारखे वाटले आणि ते काय होते हे मला कळले, नाही. आणि मी विचार केला की मी चंगाई सभा घेण्यासाठी जोर देत होतो, कदाचित कोणी इतके आजारी असेल, तेव्हाच त्याच्यासाठी प्रार्थना करायची असेल. आणि मी श्रोत्यांना विचारले. थोड्याच मिनिटात ते प्रगट झाले. आणि कोणीतरी म्हणाले, "तू तुझा वाचणार नाही—तुझा वचनाचा भाग वाचणार नाहीस काय?" किंवा असेच काही आणि त्या वेळी, मी एका लहान कागदाचा तुकडा घेतला आणि तो पुन्हा वाचला, पाहीले तेथे काय सांगितले होते. आणि खाली पुस्तकावर पाहीले, आणि मी ज्या प्रश्नाचे उत्तर देत होतो त्यापेक्षा ते पूर्णपणे वेगळे होते. समजले?

35 मी हे सहज तुम्हास सांगत आहे. जेव्हा ते महान अद्भूत आत येते तर ते ख्रिस्ताचे मन असते. तुम्ही तुमच्या विचारांपासून दूर जाता जोपर्यंत तुम्ही तुमच्या मनाने चालता, मी...हे तुम्ही...मी ते समजावू शकत नाही, कारण मी करु शकत नाही. समजले? मी ते करु शकत नाही. कोणीही ते करु शकत नाही.

36 कशाप्रकारे एक तो मनुष्य, एलीया, तेथे डोंगरावर परमेश्वराच्या उपस्थितीत उभा राहून आकाशातून अग्नी खाली आणू शकतो, आणि मग अग्नीनंतर लगेच पाऊस? आणि मग आकाश बंद करतो, आणि साडे तीन वर्ष पाऊस पडत नाही, आणि तेथे परत जातो, त्याच दिवशी, पावसाला बोलावतो! आणि त्या अभिषेकाखाली, कसे...आणि चारशे धर्मगुरुंना बाहेर नेले आणि त्यांना मारले; आणि मग जंगलात पळाला, एका स्त्रीच्या धमकीमुळे, त्याच्या जीवनासाठी आरोळी मारीत होता. समजले? ईजबेल, तिने प्रतिज्ञा केली होती की ती त्याचा जीव घेईल, जेव्हा अहाब आणि ते सर्व तेथे देवाची उपस्थिती आणि महान चमत्कार पाहण्यासाठी उभे होते. पाहा, त्याला...आत्म्याने त्याला सोडले होते. त्याच्या देह स्वभावानुसार त्याला कसा विचार करावा हे समजले नाही, पाहा तो त्याच्या स्वतः साठीही विचार करु शकला नाही.

37 आणि, स्मरण करा, स्वर्गदूतांनी त्याला निद्रा आणली, आणि त्याला विश्राम दिला. त्याला उठवले, आणि त्याला रोटी खाण्यास दिली; मग पुन्हा त्याला निद्रा आणली, आणि विश्राम दिला; आणि उठविले, आणि पुन्हा त्याला रोटी खाण्यास दिली. आणि

आपल्याला ठाऊक नाही की चाळीस दिवस, त्या मनुष्याचे काय झाले. मग त्याला परत कुठेतरी गुहेमध्ये ओढण्यात आले, आणि देवाने त्याला बोलावले.

38 त्या अद्भूत गोष्टी समजवण्याचा प्रयत्न करु नका. तुम्ही ते करु शकत नाही. समजले? करण्यासाठी केवळ एकच कार्य आहे, फक्त पुढे जात राहा. आणि मी होईल तितके मला स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला, परंतु ह्यानंतर पुढे मी...मी विचार करतो की पुन्हा असे करण्याचा प्रयत्न करणार नाही. तुम्ही एकतर पूर्ण विश्वास कराल किंवा नाही. आणि तुम्ही...तुम्ही पाहाल. थोड्या वेळाने, का असे.

आता, मी प्रामाणिक राहण्याचा प्रयत्न केला आहे. परमेश्वर ते जाणतो.

39 आणि तो प्रश्न ह्या सकाळी. मी त्याचे उत्तर देण्याचा प्रयत्न अगदी प्रामाणिकपणे केला जसे मला माहीत होते. मी फक्त वचनाचा प्रथम भाग वाचला, ते आणि तो असा होता...तो बरोबर नसणार. परंतु पवित्र आत्मा माझ्या मनाला समज देत होता. पाहा, बघा, अंतिम दोन किंवा तीन दिवसात, काय घडत होते. पाहा, मी—मी..."सात हजारला" सातशे म्हटले. ह्या सकाळी मी प्रयत्न करीत होतो, आणि ते लोकांकडून पकडले गेले, पाहा, आणि ते दर्शविते की तुम्ही लक्ष देत होता. आता, आणखी एक, जेथे मी "कबुतर," बोलण्याचा प्रयत्न करीत होतो आणि मी त्यास कोकरा म्हटले; परंतु ते मला लगेच समजले. आणि तेव्हा, परत येथे, मला त्यावर पकडले नाही, पवित्र आत्मा परत फिरुन आला आणि मला त्याकडे आणले.

40 ती दुहेरी पुष्टी आहे की ह्या गोष्टी बरोबर आहेत. त्या आहेत...परमेश्वर त्यावर लक्ष ठेवीत आहे, हे पाहण्यासाठी की त्या बरोबर आहेत. ते बरोबर आहे. त्याची इच्छा आहे. त्याची इच्छा आहे की तुम्ही हे जाणावे की हे सत्य आहे.

41 तोच एक आहे जो हे पाठवीत आहे, कारण ते निश्चितच नव्हते...तो माझ्यासाठी, एक धडा होता, जसा तो तुमच्यासाठी आहे. आणि म्हणून आम्ही ह्या ज्ञानासाठी मी खूप आभारी आहे, की आता प्रभूला ह्या ज्ञानासाठी मी जाणतो, कोणत्या समयात आपण राहात आहोत; पहा, अगदी अंतिम समयात राहात आहोत, मंडळी उचलली जाण्याअगोदर. आता फक्त...

42 आपण बोलत आहोत, म्हणून आपण पुन्हा वचनावर त्याचा आशीर्वाद मागूया.

43 आमच्या स्वर्गीय पित्या, येथे ती महान रात्र, महान समय आला आहे जेव्हा, एक महान गोष्ट घडली आहे. ती सर्व लोकांभोवती घडली आहे. आणि पित्या, मी प्रार्थना करतो की आज रात्री ती गोष्ट सर्व संशयांच्या पलिकडे, लोकांच्या हृदयात आणि मनात समजावली जावो, की त्यांना समजेल की परमेश्वर अजूनही राजासनावर आहे, आणि तो अजूनही त्याच्या लोकांवर प्रेम करतो.

44 आणि हा तो समय आहे, समय जो पाहण्याची जगाची फार इच्छा होती, जो आता येत आहे, कारण तो ही मूक्तीसाठी आरोळी मारत आहे. आपण पाहू शकतो की ते घटक त्यास परत आणण्यासाठी तयार आहे. आपण ते घटक पाहू शकतो जे मंडळीला ख्रिस्ताच्या उपस्थितीमध्ये आणण्यासाठी तयार आहेत. आपण पाहू शकतो की वधू तीचे रुप धारण करीत आहे, लग्नाचे वस्त्र परिधान करुन स्वतःला तयार करीत आहे. आपण पाहू शकतो की प्रकाश लुकलुकत आहे. आपल्याला ठाऊक आहे की आपण अंतिम समयात आहोत.

45 आता, स्वर्गीय पित्या, जेव्हा आता आम्ही प्रचार करण्यास, किंवा शिकवण्यास पुढे सरकत आहोत त्या महान, सामर्थी घटनेवर जी दोन हजार वर्षांपूर्वी महिमेत घडली आहे, आणि जी थोर प्रिय प्रेषित, योहान ह्यास दिली होती. आणि आज रात्री आम्ही त्यावर

बोलणार आहो. आता पवित्र आत्मा त्याच्या पराक्रमी सामर्थ्याच्या प्रकटीकरणाने पुढे येवो, तो आम्हास त्या गोष्टी प्रगट करो ज्या तो आम्हास समजावू इच्छितो, जसे त्याने मागील काही रात्रींत केले आहे. आम्ही वचनासह, आम्हास येशूच्या नावाने, तुला समर्पित करतो. आमेन.

46 आता, जेव्हा तुम्ही तुमचे बायबल काढू इच्छिता. आणि हे एक छोटेसे वचन, पवित्र शास्त्रातले एक वचन आहे. परंतु, हे शेवटचे वचन आहे, ते मिळाले आहे...किंबहुना हा शेवटचा शिक्का आहे.

आता, मागील रात्री आपण सहाव्या शिक्क्यावर बोलत होतो.

47 पहिला शिक्का, ख्रिस्तविरोध्याची ओळख देतो. त्याचा समय त्यांतून जातो, आणि आपण पाहीले तो बाहेर निघून जातो.

48 कशा प्रकारे त्या श्वापदाची, देवाच्या सामर्थ्याबरोबर ओळख दिली होती. जो ख्रिस्तविरोधीच्या सामर्थ्यासह, युध्द करण्यास गेला! मला वाटत नाही की त्याविषयी कोणाच्या मनात काही प्रश्न असेल.

49 तेव्हा आपण पाहतो, हे लगेच त्यानंतर आहे, मंडळीच्या युगात, ते प्राणी गेले.

50 ह्यातून येताना, आपल्याला कळले, की आपण ते सारे चित्र बदलले, कोणताही प्राणी आता बाहेर येत नाही. समजले? परंतु, महासंकटाचा काळ संपल्यानंतर पुढे येतो, जेव्हा मंडळी गेलेली असते.

51 हे मंडळीच्या युगाबरोबर कशाप्रकारे पूर्णत: जुळते! मला एक बिंदुही दिसत नाही, एखादी गोष्ट जी पूर्णतः जुळत नाही, अगदी युगे आणि सर्व गोष्टी, आणि समय त्याविषयी विचार करा. हे दर्शविते, की ते देवानेच केले आहे. मानवी बुध्दीने ते समजू शकत नाही. आणि आता आपण हेही पाहीले...

52 प्रभू आम्ही हे वचन, पवित्र वचन घ्यावे, जे येशूने म्हटले ते घडेल. आणि आम्हाला ते कसे मिळू शकते? आणि येथे, येतो आणि प्रगट करतो, आणि ते जसे आहे तसे बिलकुल आणतो. त्याचा संदेश तेथे, उत्तर देत आहे, आणि सहा शिक्क्यांतून, बिलकुल त्याच स्थानावर आणतो, परंतु त्याने सातवा गाळला आहे. समजले?

53 तेव्हा जेव्हा शिक्के उघडले गेले, परमेश्वराने, येथे लक्ष द्या, त्याने सातव्याचे कोणते चिन्ह प्रगट करण्याचेही वगळले. समजले? ते परमेश्वराकडे पूर्णत: गुप्त आहे. लक्ष द्या. आता आपण बायबलमध्ये सातवा शिक्का वाचण्यास जात आहोत. तो आपल्याला, प्रकटीकरणाच्या 8व्या अध्यायात मिळतो.

*आणि त्याने सातवा शिक्का फोडल्यावर स्वर्गात सुमारे अर्धा तासपर्यंत निवांत झाले.*

54 त्यावर हे सर्व आपल्याकडे आहे. आता आपण लक्ष देणार आहोत.

55 आणि मी खूप वेळ थांबण्याचा प्रयत्न करणार नाही, कारण आज रात्री, तुमच्यातील पुष्कळजण घरी जाण्यास प्रवासात असतील. आणि मी पुन्हा, ह्या सकाळी चंगाई सभा ठेवण्याचा विचार केला, ज्यामुळे तुम्ही सकाळी जाऊ शकाल, तुम्हाला थांबावे लागणार नाही. आणि आता...

56 आणि मला, सुध्दा, मला टक्सन, ॲरिजोना येथे—येथे प्रवास करायचा आहे. जेथे मी राहतो आणि ते आता माझे घर आहे. आणि मग जर प्रभूची इच्छा असेल तर मी—मी

परत येथे येऊ इच्छितो, बहुदा कुटूंब जूनमध्ये काही दिवसांसाठी येऊ इच्छिते. आणि, आता, कदाचित मी तुम्हा सर्वांना येथे, सभेच्या समयी भेटेन.

57 माझी पुढची ठरविलेली सभा अलब्यूक्यूरिक, न्यू मेक्सिको येथे आहे. मला वाटते ती नऊ, दहा, आणि अकरा आहे. मी तेथे गुरुवारी आणि गुड फ्राईडेला असेन. म्हणून मला ह्या सर्व गोष्टी होणे आहे, आणि माझ्या दुसऱ्या नियोजित भेटी ज्या मी त्या समयी करु शकलो नाही, म्हणून मी गुरुवार आणि शुक्रवार रात्री मी अलब्यूक्यूरिक, न्यू मेक्सिको येथे असेन.

58 आणि, नंतर, नंतर, माहीत आहे, ती लवकरच होणार आहे. आम्हाला निश्चित माहीत नाही. ती माझ्या चांगल्या मित्रांसोबत, *मीडनाईट क्राय,...* समुहाबरोबर साऊर्थन पाईन्स ठिकाणी, उत्तर कॅरोलिना येथे असेल.

59 आणि ते आता तेथे फोनवर आहेत, त्यांनी टेलीग्राम, संदेश, आणि सर्व गोष्टी पाठवल्या आहेत आणि लिटील रॉक येथे दुसऱ्या समुहाकडे जवळ आले आहेत. येशू नावाचे लोक, जेथे मी मागील उन्हाळ्यात काऊ पॅलेस येथे सभा घेतल्या होत्या. त्यांचे लिटील रॉक, अर्कझास येथे अधिवेशन आहे. आणि गेल्या वर्षापासून त्यांना कमीत कमी एक रात्र तरी हवी होती. किंवा, त्यांना सर्वच पाहीजे होत्या, परंतू ते एका रात्री साठीही तयार होतील. आणि म्हणून मी त्यांना म्हणालो, मला ठाऊक नाही काय करावे. मी म्हणालो ते त्याची "संभाव्य" जाहिरात करु शकतात. मग त्यांना थोड्या वेळाने ते कळविले जाईल.

60 काय त्यांनी आता फोन केला? ओह. ठीक आहे, काय म्हणतो? [एक भाऊ म्हणतो, "हॉट स्प्रींग"—सम्पा.] हॉट स्प्रींग हेच आहे ना? मी चूक केली ["चोवीस."] [कुठली चोवीस...["मे."] मे? [कोणी म्हटले, "चोवीस ते अठ्ठावीस जून."] चोवीस ते अठ्ठावीस जून. आता ती "संभाव्य" आहे, जर प्रभूची इच्छा असेल तर ती. समजले? मी...

61 हेच कारण आहे की मला ह्या गोष्टी करण्यास आवडतात. आता तुम्ही थोड्या वेळात शिकाल, समजले. जेव्हा मी एखाद्या ठिकाणी जातो, मला तेथे माझे पाय ठेवायला आवडतात, कारण परमेश्वर बोलला आहे, "तेथे जा." तेव्हा जर शत्रू तेथे आला, मी म्हणतो, "मी येथे येशू ख्रिस्ताच्या नावात आलो आहे. मागे हो!" पाहा? समजले? समजले? तुम्ही तुमच्या भूमीबद्दल निश्चित आहा. जेव्हा तो तुम्हाला कोठेही पाठवतो, तो तुमची काळजी घेतो. समजले? परंतु जेव्हा तुम्ही काही गृहीत धरुन जाता, तेव्हा मला ठाऊक नाही, तो तेथे असणार नाही. म्हणून मी—मी होईल तितके निश्चिंत राहू इच्छितो. मी पुष्कळ जणांना घेतले ज्यांना घेण्यास त्याने मला सांगितले नव्हते, परंतु मी—मी होईल तितका निश्चित होऊ इच्छितो. आता प्रभू तुम्हा सर्वांस आशीर्वादीत करो.

62 आता, आपण पाहतो. की येथे केवळ एकच वचन आहे, आपल्याला थोडे आणखी काहीतरी करायला आवडेल येथे थोडेसे—थोडेसे अगोदर. तुम्ही पाहीले की आपण 7वा अध्याय सोडला. सहावा अध्याय सहाव्या शिक्क्याने संपतो, तेथे काहीतरी घडते. समजले? आणि ते कसे—कसे सुंदर व योग्य रितीने 6व्या आणि 7व्या अध्यायामध्ये ठेवलेले आहे. आता तुम्ही 7व्या अध्यायात पाहीले, आपण पाहतो, सहाव्या आणि सातव्या अध्यायाच्यामध्ये मध्यांतर आहे. प्रकटीकरणाच्या सहाव्या आणि 7व्या अध्यायाच्या मधला मध्यांतर आणि तो मध्यांतर सहाव्या आणि सातव्या शिक्क्यामध्ये दिला आहे. आता आपण तो पाहू इच्छितो. तो खूप महत्त्वाचा आहे की आपण थोडा वेळ त्यावर लक्ष देऊया.

63 आता लक्षात ठेवा. प्रकटीकरणाच्या 4थ्या अध्यायानंतर मंडळी गेलेली आहे. चार घोडेस्वार गेल्यानंतर, मंडळी निघून जाते. समजले? ज्या सर्वगोष्टी मंडळीशी

निगडीत आहेत, त्या प्रकटीकरणाच्या 4थ्या अध्यायापर्यंत घडतात. प्रत्येक गोष्ट जी ख्रिस्तविरोधकाच्या हालचालीत घडल्या, त्या चौथ्या अध्यायापर्यंत गेल्या. आणि प्रकटीकरणाचा चौथा शिक्का ख्रिस्तविरोधक आणि ख्रिस्त ह्या दोघांसाठी समाप्त झाला. आणि ख्रिस्तविरोधक त्याच्या सेनेसह त्याच्या विनाशाकरिता येतो, आणि ख्रिस्त त्याच्या सेनेसह येतो.

64 हे एक जुने युध्द आहे, ज्याची समयापूर्वी सुरुवात झाली. आणि नंतर ते...सैतान आणि त्याचे दूत खाली टाकण्यात आले होते, आणि नंतर ते पृथ्वीवर आले. आणि ते युध्द पुन्हा सुरु झाले, कारण हव्वा जी देवाच्या वचनाच्या मागे वेगळी केली होती, तिने ते कुंपण तोडले. आणि त्या घटकेपासून, सैतानाने ह्या युध्दात देवाच्या वचनावर विजय मिळवला, कारण त्याच्या एका अशक्त पात्राने सीमांना तोडले होते, आणि अगदी तशाचप्रकारे तो प्रत्येकवेळी युध्द जिंकला, कारण त्याच्या लोकांतील एकाने वचनांतून मार्ग खोलला.

65 आणि हे ह्या अंतिम मंडळीच्या युगात संस्थेच्या प्रणालीद्वारे केले आहे. जी जीवंत परमेश्वराच्या वास्तविक, मूळ, पवित्र मंडळी जी खोट्या घोडेस्वारासह, वचनाचा स्विकार करणार नाही, आणि मंडळीला वचनापासून मतसिध्दांताकडे वळवते.

66 आता, किती जणांना माहीत आहे की रोमन कॅथलिक मंडळी ही मतसिध्दांतावर बांधलेली आहे? [मंडळी म्हणते, “आमेन”—सम्पा.] ते हे स्विकारतात का? पूर्णपणे. निश्चित. निश्चितपणे, ते ते स्विकारतात. हेच, सर्वकाही नाही. कॅथलिक, निश्चितच, हे त्यांच्या भावनांना बिलकुल दुखावणार नाही, कारण त्यांना हे माहीत आहे. अलिकडे जास्त काळ झाला नाही. त्यांनी एक नविन गोष्ट आणली आहे की मरीयेचे पुनरुत्थान झाले होते. तुम्हाला आठवते, येथे काही वर्षांअगोदर, अंदाजे दहा वर्षे. किती जणांना ते लक्षात आहे? [“आमेन.”] त्या वर्तमान पत्रात, निश्चित. पहा? सर्वगोष्टी, नविन “मत–सिध्दांत.” पाहा, ते सर्व मत सिध्दांत आहेत, वचन नाही. समजले?

67 एक धर्मगुरु अलिकडेच एका मुलाखतीत, म्हणाला, “श्री ब्रॅन्हम”, म्हणाला, “परमेश्वर त्याच्या मंडळीत आहे.”

मी म्हणालो, “परमेश्वर त्याच्या वचनात आहे.”

त्याने म्हटले, “आपण येथे वाद घालण्यासाठी नाही.”

68 मी म्हणालो, “मी वाद घालत नाही. मी फक्त एक विधान करीत आहे. परमेश्वर त्याच्या वचनात आहे. ते बरोबर आहे. ‘जो कोणी त्यांतून काही काढील, किंवा त्यात काही घालेल,’ वचन म्हणते.”

69 त्याने म्हटले, “अच्छा, देवाने दिले...ख्रिस्ताने त्याच्या मंडळीला सामर्थ्य दिले, आणि त्यांना म्हटले: जे काही ते पृथ्वीवर बांधतील, ते स्वर्गात बांधले जाईल; आणि जे काही...”

मी म्हणालो, “ते अगदी सत्य आहे.”

70 त्याने म्हटले, “आमच्याकडे ह्या...तत्वाच्या आधारे, की आमच्याकडे पापाला मोकळे करण्याचे सामर्थ्य आहे.”

71 आणि मी म्हटले, “जर तू ते त्या तऱ्हेने करशील जसे ते मंडळीला दिले होते आणि जसे त्यांनी ते केले, मी त्याचा स्विकार करीन. जर तू करशील, येथे पाणी आहे, ‘तुझ्या पापमोचनासाठी येशू ख्रिस्ताच्या नावाने बाप्तिस्मा घे,’ पाहा, कोणाच्या सांगण्याने तुझे पापमोचन होत नाही.” समजले? पाहीले? ते अगदी बरोबर आहे.

72 पेंटेकॉस्टलच्या दिवशी पेत्राला चाव्यांसह पाहा. लक्ष द्या, त्याच्याकडे त्या चाव्या आहेत ज्याविषयी ते बोलत आहेत आणि लोकांनी म्हटले, “पुरुष आणि बंधुजनहो, आम्ही तारणासाठी काय करावे?”

73 पेत्र म्हणाला, “पश्चाताप करा, आणि तुमचे पापमोचन होण्यासाठी, तुम्ही प्रत्येक जण येशू ख्रिस्ताच्या नावाने बाप्तिस्मा घ्या, म्हणजे तुम्हाला पवित्र आत्म्याचे दान प्राप्त होईल. कारण हे वचन तुम्हाला, तुमच्या मुलाबाळांना व जे दूर आहेत त्या सर्वांना म्हणजे जितक्यांना परमेश्वर आपला देव स्वतःकडे बोलावील तितक्यांना दिला आहे.” ते बरोबर आहे. म्हणून हे सर्वकाळासाठी ठरवले गेले. ते सर्व समाप्त झाले. त्याने ते केले.

74 आता, परंतु, तुम्ही पाहता, ख्रिस्तविरोधक आत येतो, जसे आम्ही त्याचे चित्र काढले आणि ते दाखवले. काय प्रकटीकरण आहे! बाप रे! आणि इतक्या वर्षात, विचार करीत आपण पाहत आहोत, की पुढे जात आहे. आणि येथे ते पूर्णपणे, थेट, **प्रभू परमेश्वर सांगत आहे**.

75 आता, आणि आपण हा मध्यांतर 6व्या आणि 7व्या अध्यायात पाहतो. आता, प्रकटीकरणाचा 7वा अध्याय, येथे ती—ती…घटना प्रगट करतो. येथे ही घटना अशीच झालेली नाही. ते ह्यामध्ये असेच ठेवलेले नाही. समजले? ते एका उद्देशासाठी येथे आहे, आणि हे एक प्रकटीकरण आहे जे काहीतरी प्रगट करते. लक्ष द्या कसे रहस्यमय आणि अंकगणितासारखे अगदी अचूकपणे ते पवित्रवचनात ठेवलेले आहे! समजले तंतोतंतपणे.

76 तुम्ही परमेश्वराच्या गणितावर विश्वास ठेवता काय? [मंडळी म्हणते, “आमेन”—सम्पा.] जर तुम्ही ठेवत नाही. तर तुम्ही निश्चितच हरवलेले आहात…तुम्ही जगात निश्चित हरवले जाल, जर तुम्ही चार किंवा सहा, किंवा—किंवा काहीही ठेवण्यास सुरुवात केली, ह्याशिवाय फक्त गणिताचे शब्द एका क्रमाने असतात. तर निश्चित तुमच्या दृश्यात गाय कुठेतरी झाडाच्या माथ्यावर चारा उचलत आहे. निश्चितच तुम्ही पळून जाल. कारण परमेश्वर असे करीत नाही…त्याचे संपूर्ण वचन पुर्णतः गणितात आहे. होय, महाशय. परिपूर्ण, खूप परिपूर्ण! असे दूसरे कुठलेही वाङ्मय लिहीलेले नाही, जे गणितात इतके परिपूर्ण आहे.

77 आता, 8वा अध्याय फक्त सातव्या शिक्क्याचे दृश्य दाखवते, जेथे आणखी काही प्रगट केलेले नाही, आणखी काहीच नाही. काय हे सातव्या शिक्क्यात प्रगट केले नाही का…आता, ह्याचा प्रकटीकरणाच्या 7व्या अध्यायाशी काही संबंध नाही. तो सातवा शिक्का प्रगट करत आहे, तो पूर्णतः नि:शब्द आहे. आणि जर माझ्याकडे वेळ असला…मी तुम्हाला आणखी काही ठिकाणाहून हे दाखवीन.

78 मागे उत्पत्तीपासून हा सातवा अध्याय…किंवा ह्या सातव्या शिक्क्याविषयी बोलले आहे. अगदी प्रारंभापासून, उत्पत्तीमध्ये, ह्या सातव्या शिक्क्याविषयी…

79 हे शिक्के पुढे जातात. तुम्हाला लक्षात नाही का, ह्या सकाळी, ह्या गोष्टीपुढे आणण्यात आल्या? आणि आज रात्री त्यांवर प्रकाश टाकला जात असता लक्ष द्या. आणि तुम्हाला कळते की, जेव्हा हे सातव्या शिक्क्याकडे जाते, ती काही प्रगट करीत नाही. [भाऊ ब्रॅन्हम एकदा टिचकी वाजवतात—सम्पा.] होय.

80 येशू ख्रिस्ताने, स्वतः, बोलताना, अंतःसमयाविषयी सांगितले. आणि जेव्हा तो आला…त्याने सर्व सहा शिक्के सांगितले. जेव्हा तो सातव्या शिक्क्याकडे आला, तो थांबला. पाहा हेच ते आहे. ही एक महान गोष्ट आहे.

81 आता, आता, आपण येथे 7व्या अध्यायावर बोलणार आहोत—ह्यासाठी सहाव्या आणि सातव्या शिक्क्यामध्ये दूवा साधता यावा. कारण आपल्याकडे केवळ तेच साधन आहे, ज्यावर आपण पुढे जाऊ शकतो. सहाव्या व सातव्या शिक्क्यामध्ये इस्त्राएलला बाहेर बोलावले जाते.

82 आता, येथे माझे यहोवा विटनेसचे पुष्कळ मित्र बसलेले आहेत, ते सर्व आहेत... किंवा होते. कदाचित त्यांच्यातील काही अजूनही यहोवा विटनेस असतील. परंतु त्यांनी सदैव, श्री. रसलने एक लाख चव्वेचाळीस हजारांना, ख्रिस्ताची अलौकीक वधू म्हटले आहे. समजले? ते...ते नाही आहे.

83 त्याचा मंडळीच्या युगाशी काही एक संबंधित नाही. ते पूर्णपणे इस्त्राएली आहेत. आता, आपण ते काही मिनीटातच वाचणार आहोत. आता, ह्या सहाव्या...शिक्क्यांमधील मध्यांतर, हा एक लक्ष चव्वेचाळीस हजार यहुद्यांना बोलावले जाणे आणि शिक्कामोर्तब करणे आहे, ज्यांना महासंकटाच्या काळात मंडळी गेल्यानंतर बोलावले गेले आहे. समजले? त्याचा मंडळीच्या युगाशी काही एक संबंध नाही. ओह, ते बोलावले गेलेले आहेत, आणि ते पवित्र वचनासह पूर्णपणे मेळ खातात. दानिएलाचे अंतिम साडेतीन सप्ताह, दानीएलाच्या "लोकांना" दिलेले आहेत, परराष्ट्रीयांना नाही, पाहीले. दानीएलाच्या "लोकांना," आणि दानीएल यहुदी होता!

84 आता, इस्त्राएलकडे लक्ष द्या, इस्त्राएल फक्त तिच्या संदेष्ट्यांवरच विश्वास ठेवते, आणि तेव्हा ते सिध्द होतात.

85 आणि मंडळीच्या युगात, पहिल्या प्रेषितांच्या मंडळीपासून प्रोटेस्टंट मंडळीत कधीच संदेष्टा नव्हता. मला सांगा 7वा दूत हा परराष्ट्रीयांतील एकमेव संदेष्टा. तो कोण होता, आणि मला तो दाखवा. कधीच नव्हता! पहिल्या प्रेषितांच्या युगात एक होता. ज्यास अगाबस म्हटले गेले, जो सिध्द करण्यात आलेला संदेष्टा होता. परंतु...जेव्हा परराष्ट्रीय, परमेश्वराच्या वतनात आले, आणि पौल परराष्ट्रीयांकडे वळला. जसे काल रात्री आपण वाचले, पेत्रानंतर, त्याला प्रभूपासून प्राप्त झाले की, "तो परराष्ट्रीय लोकांतून त्याच्या नावासाठी, त्याची वधू घेत होता," तेव्हा इतिहासाच्या पानांवर त्यांच्याकडे परराष्ट्रीय संदेष्टा कधीच नव्हता. तुम्ही केवळ मागे इतिहासातून पाहा आणि शोधा. का? ते वचनाच्या अगदी विरुध्द होईल. अगदी बरोबर आहे.

86 जेव्हा पहिला प्राणी पुढे आला, तो सिंह होता, तो संदेष्ट्याचा शब्द होता.

जो दुसरा गेला, तो त्याचे कार्य, अर्पण होते.

जो तिसरा आला, त्याच्यामध्ये मनुष्याची बुध्दीमत्ता होती.

87 परंतु अंतिम दिवसात आपल्याला अभिवचन देण्यात आले आहे की मंडळीत तो परत पुन्हा येईल, ते सर्व गोष्टी ठीक करण्यासाठी ज्याचे चुकीचे मार्गदर्शन केले होते, चुकले होते, करण्याचे राहून गेले होते, अर्धवट राहिले होते. कारण येथे ही भविष्यवाणी करण्यात आली होती की सातव्या दूताचा संदेश देवाची सर्व गूजे पूर्ण करील. आणि तेव्हा, आपण ह्या सर्व गोष्टींचे अध्ययन केले. आपण पाहीले की ते अगदी वचनाशी सुसंगत आहे. तेच कारण आहे.

88 आता, तुम्ही कल्पना कराल, हा व्यक्ती कधी दृश्यात येईल? जेव्हा तो येईल, लक्षात ठेवा, तो इतका नम्र असेल आणि अशा गोष्टी करील, मंडळी त्याला ओळखणार नाही. आणि तुम्ही कल्पना करु शकाल की, मंडळ्या, अजूनही सुधारकांच्या रीतीरिवाजात

आहेत, काय त्या परमेश्वरापासून आलेल्या संदेष्ट्यास स्विकारतील, जो दृढतापूर्वक त्यांच्या शिक्षणाच्या आणि संस्थांच्या कट्टर विरुध्द असेल?

89 आता, केवळ एकच व्यक्ती ते पूर्ण करु शकतो, एकच आत्मा, जो पृथ्वीवर होता ज्याविषयी मी जाणतो. एकंतर तो असेल...जो एलिया त्याच्या समयात असेल. आणि त्याची भविष्यवाणी केली होती तो दुसरा कोणी नाही परंतु ख्रिस्ताचा आत्मा आहे.

90 जेव्हा ख्रिस्त आला, तो परिपूर्णता होता. तो संदेष्टा होता. तो संदेष्ट्यांचा देव होता. पाहीले? समजले?

91 ख्रिस्त, पाहा त्यांनी कसा त्याचा द्वेष केला. परंतु तो अगदी त्याच मार्गाने आला जसे वचनात म्हटले होते की तो येईल. परंतु तो संदेष्टा असल्याकारणाने, त्यांना स्वतःला परमेश्वराच्या राज्याबाहेर परमेश्वराचा आत्मा जो त्यांचे विचार पारखीत होता आणि इत्यादी, त्यास "अशुध्द आत्मा" म्हणून निंदा केली. म्हणाले, "तो—तो एक ज्योतिषी, किंवा एक सैतान," आहे.

92 एक ज्योतिषी हा एक सैतान आहे, पाहा, सैतानाचा आत्मा. निश्चितच. तुम्हाला ते माहीत आहे काय? [मंडळी म्हणते, "आमेन"—सम्पा.] पूर्णपणे. ज्योतिषी सांगणे हे संदेष्ट्याची नक्कल करणे आहे, जे पूर्णपणे देवासमोर देवनिंदा आहे.

93 आता लक्ष द्या, दानिएलाच्या अंतिम साडेतीन वर्षाच्या वचनाशी अगदी सुसंगत आहे.

94 लक्ष द्या, इस्त्राएलाच्या विश्वासणाऱ्यांना—विश्वासणाऱ्यांना फक्त सांगण्यात आले होते, जुन्या करारात, संदेष्टा सिध्द झाल्यानंतर त्यांच्यावर विश्वास ठेवण्यास सांगण्यात आले. "जर तुमच्यामध्ये कोणी, आत्मिक किंवा संदेष्टा असला, तर मी प्रभू...तुझा परमेश्वर त्याला प्रगट होईन, आणि त्याच्याशी दृष्टांतातून, स्वप्नांतून, बोलेन, स्वप्नांचा अर्थ सांगेन." कोणाला एखादे स्वप्न पडले, संदेष्टा त्याचा अनुवाद करु शकेल. आणि जर—जर त्याला दृष्टांत झाला असेल, तो ते सांगे. "मी स्वतःला त्याला दृष्टांतातून आणि स्वप्नातून प्रगट होईन. आणि जर तो जे काही बोलेल ते त्याप्रमाणे घडले, तर त्या संदेष्ट्याचे ऐका, कारण मी त्याच्याबरोबर राहीन. जर त्याप्रमाणे घडले नाही, तर त्याची भीती मुळीच बाळगू नको." होय. ते बरोबर आहे. "त्याच्यापासून दूर राहा, त्याला एकटे राहू दे, समजले." आता ते आहे...

95 आता, इस्त्राएल सदैव त्यावर विश्वास ठेवील. आणि काय तुम्ही पाहात नाही? कारण?

आता माझी इच्छा आहे की, आज रात्री, हा धडा तुम्ही व्यवस्थित समजावा.

96 का? कारण, ही त्यांना, देवापासून मिळालेली आज्ञा आहे: मला ह्याची काळजी नाही की परराष्ट्रीय तेथे किती पत्रके पाठवतील आणि वाटतील. मला त्याची पर्वा नाही की तुम्ही आपले बायबल खाकेत घेऊन कितीही इस्त्राएलभर फिरला आहात *हे*, *ते*, किंवा *आणखी* काही सिध्द करा, परंतु ते कधीच संदेष्ट्याला सोडून काहीच स्विकारणार नाही. ते अगदी बरोबर आहे. कारण संदेष्टा हाच एक आहे जो दैवी वचन घेऊ शकतो आणि ते त्याच्या स्थानी ठेवू शकतो, आणि सिध्द झालेला संदेष्टा होऊ शकतो. ते त्याचा विश्वास करतील. ते बरोबर आहे.

97 जसे मी बेन्टन हार्बर, येथे एका यहुदीशी बोलत होतो, जेव्हा जॉन राईन, जो आयुष्यभर आंधळा होता, त्याला दृष्टी मिळाली. त्यांनी मला तेथे दाविदाच्या घरी नेले.

आणि हा रब्बी त्याच्या मोठ्या दाढीसह बाहेर आला. त्याने म्हटले, “कोणत्या अधिकाराने तू जॉन राईनला त्याची दृष्टी दिली?”

मी म्हणालो, “देवाचा पुत्र, येशू ख्रिस्ताच्या नावाने.”

98 त्याने म्हटले, “परमेश्वराला पुत्र व्हावा ही गोष्ट दूर आहे!” समजले? आणि तो म्हणाला, “तुम्ही लोक परमेश्वराला तीन तुकड्यात तोडू शकत नाही आणि त्याला यहुद्याला देऊ शकत नाही. त्याच्यातून तीन परमेश्वर बनवून; तुम्ही मूर्तीपुजकांचा समुह आहात!”

99 मी म्हणालो, “मी त्याला तीन तुकड्यात कापत नाही.” मी म्हणालो, “रब्बी काय तुमच्यासाठी ही विचित्र गोष्ट होणार नाही की तुम्ही ज्या संदेष्ट्यांवर विश्वास करता ते तुम्हाला काही चुकीची गोष्ट सांगतील?”

तो म्हणाला, “आमचे संदेष्टे काहीच चुकीचे सांगत नाही.”

मी म्हणालो, “यशया 9:6 कोणाविषयी बोलत होता?”

तो म्हणाला, “मसीहा.”

100 मी म्हणालो, “मग, मसीहा मनुष्य—संदेष्टा असेल. बरोबर आहे?”

म्हणाला, “होय, महाशय. ते खरे आहे.”

101 मी म्हणालो, “मला दाखवा येशू येथे कोठे कमी पडला!” त्याने म्हटले...मी म्हणालो, “मसीहा–संदेष्ट्याचे परमेश्वराशी काय नाते असेल?”

त्याने म्हटले, “तो परमेश्वर असेल.”

मी म्हणालो, “ते बरोबर आहे. आता तुम्ही वचनावर आला आहात.”

102 अशाप्रकारे माझे सहाय्य करा, यहुदी तेथे उभा होता आणि अश्रू त्याच्या गालावरुन खाली येत होते. म्हणाला, “मी तुझे नंतर कधी ऐकेन.”

मी म्हणालो, “रब्बी, काय तू ह्यावर विश्वास ठेवतोस?”

103 आणि तो म्हणाला, “पाहा”, त्याने म्हटले, “‘परमेश्वर ह्या दगडांपासून अब्राहामाची लेकरे उभी करण्यास समर्थ आहे.’” मला कळले की तो नविन करारातून बोलत होता.

मी म्हणालो, “बरोबर आहे, रब्बी! आता त्यांविषयी काय?”

104 त्याने म्हटले, “जर मी त्याचा प्रचार केला, मला तेथे खाली काढण्यात येईल,” तुला माहीत आहे त्यांची जागा तेथे टेकडीवर आहे, “खाली रस्त्यामध्ये माझी भाकरी मागत असेल.”

105 मी म्हणालो, “मला तेथे खाली माझी भाकरी मागावी लागेल तरी चालेल.” तुम्हाला ठाऊक आहे यहुद्याचा हात अजूनही पैशावर आहे. पाहीले? समजले? “मला किंबहुना...” आणि त्याचे नाव सोन्यामध्ये, त्यावर...मी म्हणालो, “त्याऐवजी मला तेथे खाली खारे कुरमुरे आणि बिस्किटे खाईन आणि झऱ्याचे पाणी पित राहीन. पण मला ठाऊक असेल की मी देवाबरोबर ऐक्यात व रस्त्यात आहे, येथे माझे नाव त्या इमारतीवर सोनेरी अक्षरांत असण्यापेक्षा आणि प्रभूपासून दूर असण्यापेक्षा. मला ते ठाऊक आहे.” तो अधिक माझे ऐकणार नाही, म्हणून आत निघून गेला.

106 परंतु तुम्ही देवाला दोन किंवा तीन भागात विभागू शकत नाही, जसे “पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा,” आणि तीन देव बनविले आणि ते एका यहुद्याकडे दिले. त्याची सर्वात प्रथम आज्ञा ही आहे, की, “तुला मजपुढे अन्य देव नसावे. मी तुझा प्रभू तुझा देव आहे.” येशू

काय म्हणाला? येशूने म्हटले, "'हे इस्त्राएला, ऐक, मी प्रभू तुझा परमेश्वर जो एकच देव आहे.'" तीन नाही; तुम्ही त्यांना ते कधीच देऊ शकत नाही. नाही. आजतागायत कोणताही संदेष्टा तीन देवाविषयी बोलला नाही. नाही. कोठेच नाही. तुम्ही त्याविषयी कधीच ऐकले नाही. नाही, महाशय. ते मूर्तीपुजक आणि इतर राष्ट्रांकडून आले आहे. होय, महाशय.

107 लक्ष द्या. परंतु हे संदेष्टे येतील. इतकेच नाही...ते संदेष्टे, आता, प्रकटीकरण 11 आहे. आपण त्याचा काहीभाग वाचला आहे. आणि जसे तुम्ही त्याचे अध्ययन टेप आणि अशा गोष्टींवर करता. मला वाटते की तुम्ही ते वाचावे ते पूर्णतः संदेष्ट्याच्या चिन्हाद्वारे, सिध्द केलेले संदेष्टे आहेत. तेव्हा इस्त्राएल त्यांचे ऐकणार आहे.

108 आता, तुम्ही, माझ्या यहोवा विटनेसच्या मित्रांनो, आता, हे समजून घ्या, एक लक्ष चव्वेचाळीस हजारांचा वधूशी काही एक संबंध नाही. तेथे पवित्रशास्त्रातील एकही वचनाचा बिंदूचा त्याला आधार नाही. नाही, महाशय. ते नाहीत. ते यहुदी आहेत. जे निवडलेले आहेत त्यांना दानीएलाच्या सत्तर सप्तकांतील अंतिम साडेतीन वर्षांच्या समयात बोलावण्यात येते. आता ते...

109 मी—मी हा संदर्भ नेहमी देत असतो. तुम्ही जे सर्व लोक येथे आहात तुमच्यासाठी नाही, परंतु, ह्या टेप्स सर्वत्र जातात, तुम्हाला समजले. आणि तुम्ही ते समजता. तुम्ही मला हा संदर्भ देताना ऐकता. हे त्या उद्देशासाठी आहे.

110 लक्ष द्या. आता, पाहा त्यांना कसे आंधळे केले गेले, तुम्ही पहाता की कसे त्यांना... येशू, किंवा...परमेश्वराला यहुद्यांना आंधळे करावे लागले. ह्यासाठी त्यांनी येशूला ओळखू नये. जर त्यांना ठाऊक असते, जर त्यांना ठाऊक असते की...त्याने केलेली चिन्हे पाहून, जर ते त्यांच्या योग्य स्थितीत असते, जसे ते पूर्वी नियमशास्त्राच्या अधीन होते जेव्हा परमेश्वराने त्यांना संदेष्ट्याविषयी आज्ञा केली, आणि त्यांनी पाहीले की येशूने ते केले, त्यांनी म्हटले, "हा मसीहा आहे." तसे का होते?

111 ते त्या समयात, ज्यांची नावे कोकऱ्याच्या जीवनाच्या पुस्तकात लिहीली होती, त्याचे प्रेषित आणि इतर, त्यांनी ते पाहीले आणि ते ओळखले.

112 त्यांच्यातील इतरांनी का नाही? पहा, त्यांना आंधळे केले होते. ते त्याला पाहू शकले नाही. अजूनही ते हे पहात नाही. आणि ते हे तोपर्यंत पाहणार नाही जोपर्यंत ती एक राष्ट्र म्हणून एका वेळेत जन्मास येत नाही...

113 वचन पडू शकत नाही. लक्षात ठेवा, वचन पडू शकत नाही. ह्याची पर्वा नाही की तुम्ही किती भावनायुक्त आहात, आणि काय सर्व घडत आहे, तरीही ते वचन पडू शकत नाही. ते अगदी तशाच प्रकारे घडणार जसे देवाने सांगितले होते. समजले? आता, आपल्याला समजले आहे की ह्या गोष्टी घडल्या पाहीजेत.

114 आणि हेच कारण आहे की त्यांनी येशूला ओळखले नाही जेव्हा त्याने स्वतःला एक संदेष्टा म्हणून प्रगट केले.

115 अगदी ती लहानशी—लहानशी शोमरोनी स्त्री तेथे विहीरीपाशी उभी होती. तो कधीही शोमरोनात गेला नव्हता; तो फक्त वर गेला, म्हणाला त्याला त्या मार्गाने जाण्याची गरज आहे, आणि तो तेथे वर गेला आणि तेथे ती लहानशी स्त्री होती. आणि त्या दिवसातल्या धार्मिक धर्मगुरु आणि गोष्टीपेक्षा तीची, ती सुवार्ता स्विकारण्यासाठी अधिक चांगल्या स्थितीत होती. तीने ते केले. निश्चितच. आता, समजले?

116 परंतु, ह्या त्यांच्या सर्व नकारांना तोंड देत, तरीही त्यांच्यातील एक अतिशय उदात्त मनुष्याने स्विकारले की त्यांना माहीत होते की तो एक देवापासून पासून पाठविलेला शिक्षक होता.

117 फार समय झाला नाही, मी दक्षिणी प्रांतातील सर्वात चांगल्या डॉक्टरांमधील एकाशी त्याच्या कार्यालयात बोलत होतो. लुईसव्हिलेतील एक अतिशय चांगला विशेषतज्ञ, एक खरा विचारशील मनुष्य. आणि मी त्याला म्हटले, मी म्हणालो, "डॉक्टर, मी तुला एक प्रश्न विचारु इच्छितो."

तो म्हणाला, "ठीक आहे."

118 मी म्हटले, "मी तुझे वैद्यकीय चिन्ह, दांडी पाहिली, तुमच्या त्या खांबावर एक साप गुंडाळलेला आहे. त्याचा काय अर्थ आहे?"

त्याने म्हटले, "मला माहीत नाही."

119 आणि मी म्हणालो, "ते हे दर्शविते: ते दैवी आरोग्याचे चिन्ह आहे, जेव्हा मोशेने रानात पितळी सर्प उंचावला, पाहा, जे केवळ एक चिन्ह (प्रतीक) होते, केवळ खऱ्या ख्रिस्ताचे प्रतीक होते."

120 आता, आज, औषध हे दैवी आरोग्याचे प्रतीक आहे. आणि जरी त्यांच्यातील कित्येक जण ह्यावर विश्वास ठेवीत नाही. खरे चांगले डॉक्टर्स ह्यावर विश्वास ठेवतात. परंतु त्यांच्यातील काहीजण त्यावर विश्वास ठेवीत नाहीत. परंतु ते चिन्ह जे ते धरतात सर्व समर्थ देवाच्या सामर्थ्याचे निदर्शक आहे, ते विश्वास ठेवू इच्छितात किंवा नाही. पाहीले? ते खरे आहे. वैद्यकीय चिन्हावर तेथे पितळी सर्प खांबावर टांगलेला आहे.

121 आता ह्या यहुद्यांकडे पाहा. आता अंधत्वाची पट्टी ह्या लोकांच्या डोळ्यांवर होती. ते, ते काहीच करु शकत नव्हते. ती तेथे होती, परमेश्वराने ती तेथे ठेवली होती. आणि ते तेथे त्यांना दिलेल्या संदेष्ट्याच्या येण्याच्या वचनाच्या समयापर्यंत होते. तुम्ही मिशनरी पाठवू शकता, तुम्ही तुम्हास हवे ते करु शकता. इस्त्राएल, जोपर्यंत संदेष्टे दृश्यावर येत नाही तोपर्यंत कधीच बदलले जाणार नाही, आणि ते परराष्ट्रीय मंडळीच्या स्वर्गरोहणानंतर होईल.

122 ह्यापेक्षा अधिक बैलाचे युग सिंहाचे बोलावणे ग्रहण करु शकत नाही, कारण परमेश्वराने त्याच्या वचनात सांगितले आहे की बैलाचा आत्मा निघून गेला आहे आणि सुधारकाच्या युगात एक मनुष्य निघून गेला. समजले? तुम्ही फक्त...

123 तीच एक गोष्टी आहे. जी तुम्ही...ते स्विकारु शकतात...आणि आता, त्यांना आंधळे केलेले आहे. तेच सर्व हे आहे. आता लक्ष द्या.

124 परंतु ते युग येणार आहे जेव्हा परराष्ट्रीयांचे युग समाप्त होईल. तेथे एक वृक्ष आहे. आणि त्याचे मूळ यहुदी होते, आणि जे तोडले गेले होते; आणि परराष्ट्रीयांना जे "रानटी, जैतून", कलम केले गेले होते, आणि ते त्याचे फळ देत आहे. आता, जेव्हा ती परराष्ट्रीय वधू कापली जाईल ते वधूचे झाड ज्याविषयी मी बोललो, आणि ते परमेश्वराच्या उपस्थितीत वर घेतले गेले आहे; परमेश्वर अविश्वासी परराष्ट्रीयांना नष्ट करील, येथे ह्या बाजूला (मूर्ख कुमारी), आणि पुन्हा कलम करील. त्याने ते करण्याचे अभिवचन दिले आहे.

125 आणि त्या समयापर्यंत तुम्हाला फक्त जाणणे आहे कुठे...जर तुम्हाला माहीत आहे तुम्ही कोठे जात आहात, तर ठीक आहे, सर्व ठीक आहे. जर तुम्हाला माहीत नाही, का, तुम्ही अंधःकारात अडखळत आहात.

126 आता, तेव्हाच त्या समयात जेव्हा यहूदी बदलले जातील. आता, मंडळीच्या युगाप्रमाणे, अभिषिक्त अभिवचनाच्या सामर्थ्याखाली, ते ख्रिस्ताला स्विकारतील, परंतु, आता, नाही, जेव्हा परराष्ट्रीय लोक आत आहेत. आता आपण पाहू शकतो की कुठल्या प्रकारचा संदेश हे दोन संदेष्टे, प्रकटीकरणाच्या 11 व्या अध्यायात, प्रचार करतील. आता तुम्ही स्पष्टपणे पाहू शकता की ते काय करणार आहेत. कारण, उर्वरीत, किंवा एक लक्ष आणि चव्वेचाळीस हजार, पूर्वनियुक्त, परमेश्वराचा शिक्का घेतात.

127 आपण वाचूया. आता खरे लक्षपूर्वक ऐका. आता माझी इच्छा आहे की तुम्ही जर शक्य असेल तर माझ्यासोबत वाचावे, कारण मी थोड्याच क्षणात हा संदर्भ तुम्हाला देणार आहे. 7वा अध्याय आता, हे सहाव्या आणि सातव्या शिक्क्यामध्ये आहे.

> *...ह्यानंतर ह्या गोष्टी—ह्यानंतर ह्या गोष्टी* (हे शिक्के)...

128 सहावा शिक्का फोडला गेला, आणि तो महासंकटाचा समय आहे. सर्वजण ते आता समजत आहात काय? [मंडळी म्हणते, "आमेन."] सहावा शिक्का फोडला होता, आणि महासंकटाला सुरुवात झाली होती...ह्यानंतर काय?

> *...ह्यानंतर मी चार देवदूत पृथ्वीच्या चार कोनांवर उभे राहीलेले पाहीले, ते पृथ्वीवरुन व समुद्रावरुन वारा वाहू नये व कोणत्याही झाडाला लागू नये म्हणून पृथ्वीचे 'चार वारे' अडवून धरीत होते.* (चार देवदूत!)
>
> *आणि मी आणखी एक देवदूत सुर्योदयाच्या दिशेने वर चढताना पाहीला, त्याच्याजवळ जीवंत देवाचा शिक्का होता, ज्या चार देवदूतांकडे पृथ्वीला व... समुद्राला उपद्रव करण्याचे काम सोपविले होते त्यांना तो उच्च स्वराने म्हणाला,*
>
> *आमच्या देवाचे जे दास आहेत त्यांच्या कपाळांवर आम्ही शिक्का मारीपर्यंत पृथ्वीला, समुद्राला व झाडांना उपद्रव करु नका...*

129 वधू नाही. "दासांना." पुत्र नाही "दासांना" इस्त्राएल हा नेहमीच देवाचा सेवक होता. मंडळी पुत्र आहे. पाहा, जन्माद्वारे. इस्त्राएल त्याचा दास आहे. सगळीकडे पाहा, ते सदैव असेच आहे. अब्राहाम त्याचा दास होता, आपण दास नाहीत. आपण लेकरे आहोत, पूत्र आणि कन्या होय,

> *...आपल्या...आपल्या...देवाचे त्यांच्या कपाळावर.*

130 आता लक्ष द्या.

> *...आपला देव त्यांच्या कपाळावर.*
>
> *आणि ज्यांच्यावर शिक्का मारण्यात आला त्यांची संख्या मी ऐकली...*

131 आता मला वाटते की ह्या वचनाकडे लक्षपूर्वक ऐकावे.

> *...आणि इस्त्राएल लोकांच्या सर्व वंशांपैकी एक लक्ष चव्वेचाळीस हजारांवर शिक्का मारण्यात आला.*

132 त्याने त्यांना योग्य नावे दिली. आता, जर तेथे कोणी ब्रिटीश–इस्त्राएली जाणणारा बसलेला असेल, लक्षपूर्वक ऐका की कसा हा भेद उघडला जातो, पाहा.

> *यहुदा वंशापैकी बारा हजारांवर शिक्का मारण्यात आला.* ("वंशाला" बोलावले) *रऊबेन वंशापैकी बारा हजारांवर गाद वंशापैकी...बारा हजारांवर*

133 पाहा तुमच्या—आता तुमच्या वंशाकडे पाहा.

*आणि आशेर वंशापैकी बारा हजारांवर…नफताली वंशापैकी बारा हजारांवर…मनश्शे वंशापैकी…बारा हजारांवर*

*आणि शिमोन वंशापैकी बारा हजारांवर…लेवी वंशापैकी बारा हजारांवर; इस्साखार वंशापैकी बारा हजारांवर;* (इस्साखार, मला वाटते तुम्ही तसे उच्चारता)…*बारा हजारांवर. बारा हजारांवर.*

*…जबलून वंशापैकी…बारा हजारांवर. योसेफ वंशापैकी बारा हजारांवर… बन्यामीन वंशापैकी बारा हजारांवर शिक्का मारण्यात आला.*

134 आता, तेथे बारा वंश आहेत, एका वंशातून. बारा हजार बाराच्या बारा पट…किती? [मंडळी म्हणते, "एकशे चव्वेचाळीस हजार."—सम्पा.] एक लक्ष चव्वेचाळीस हजार. आता पाहा. ते सर्व इस्त्राएलचे वंश आहेत.

135 आता लक्ष द्या, "ह्यानंतर…" आता येथे दूसरा समुह येतो. आता, वधू गेलेली आहे, आपल्याला ते ठाऊक आहे. परंतु हा समुह येताना पाहा.

*ह्यानंतर मी पाहिले तो सर्व राष्ट्रे, वंश, लोक व निरनिराळ्या भाषा बोलणारे ह्यांच्यापैकी कोणाला मोजता आला नाही असा, शुभ्र झगे परिधान केलेला व हाती झावळ्या घेतलेला, मोठा लोकसमुदाय राजासनासमोर व कोंकऱ्यासमोर उभा राहिलेला माझ्या दृष्टीस पडला.*

*ते, उच्च स्वराने म्हणत होते, राजासनावर बसलेल्या आमच्या देवाकडून व कोकऱ्याकडून तारण आहे.*

*आणि सर्व राष्ट्रे…तेव्हा राजासन, वडील मंडळ व चार प्राणी ह्यांच्याभोवती सर्व देवदूत उभे होते, ते राजासनासमोर उपडे पडले व देवाला नमन करुन*

*म्हणाले, आमेन: धन्यवाद…गौरव…ज्ञान…उपकारस्तूती…सन्मान… सामर्थ्य…व बळ…ही युगानुयुग आमच्या देवाची आहेत; आमेन.*

*आणि तेव्हा वडिलमंडळापैकी एकाने…*

136 आता तो येथे वडिलमंडळासमोर आहे. कारण, आपण त्याला सर्व शिक्क्यामधून पाहिले आहे.

*आणि वडिलमंडळापैकी एकाने मला म्हटले, हे कोण आहेत…*

137 आता योहान, यहुदी असल्यामुळे त्याच्या स्वतःच्या लोकांना ओळखले. त्याने त्यांना वंशाच्या रुपात पाहिले. हे बरोबर आहे का? त्याने ओळखले आणि प्रत्येक वंशाला पुकारले.

138 परंतु आता, जेव्हा त्याने हे पाहिले, तो अचंबित झाला. आणि वडिलांना ते माहीत होते, म्हणून तो म्हणाला:

*…शुभ्र झगे परिधान केलेले हे कोण आहेत? व कोठून आले?*

139 योहान, आता उत्तर देत आहे.

*आणि मी त्याला म्हटले, प्रभो, हे तुला ठाऊक आहे.*

140 योहानाने त्यांना ओळखले नाही, पाहा, सर्व जाती, भाषा आणि राष्ट्र

*…आणि त्याने मला म्हटले, हे…*

*...तो मला म्हणाला, मोठ्या संकटातून येतात ते हे आहेत* (दुसऱ्या शब्दांत, महासंकट) *आणि ह्यांनी आपले झगे कोकऱ्याच्या रक्तात धुऊन शुभ्र केले आहेत.*

*ह्यामुळे ते देवाच्या राजासनासमोर आहेत, ते अहोरात्र त्याच्या मंदिरात त्याची सेवा करितात आणि...राजासनावर बसलेला त्यांच्यावर आपला मंडप विस्तृत करील.*

*ते ह्यापुढे भूकेले असे होणार नाहीत व तान्हेलेही होणार नाहीत. त्यांस सूर्य—सूर्य किंवा कोणतीही उष्णता बाधणार नाही.*

*कारण राजासनापुढे मध्यभागी असलेला कोकरा त्यांचा मेंढपाळ होईल व तो त्यांचा मेंढपाळ होईल व तो त्यांना जीवनाच्या पाण्याच्या झऱ्याजवळ नेईल, आणि देव त्यांच्या डोळ्याचे सर्व अश्रू पुसून...टाकील.*

141 आता आपण उघडूया...शिक्क्याकडे जाऊया.

काय तुम्ही पाहिले, ते...प्रथम होते. आता आपण सुरुवात करुया, इस्त्राएल.

142 आणि तेव्हा, आपण शुध्द झालेली मंडळी पाहतो, वधू नाही; महासंकटाद्वारे शुध्द झालेली मंडळी, पाहा, पाहा मोठ्या संख्येने खऱ्या प्रामाणिक अंतःकरणाचे लोक त्या महासंकटाच्या काळांतून येथे बाहेर आले. ती मंडळी नाही. ती गेलेली आहे, वधू. तेथे मंडळी आहे.

143 आता आपण थोड्या वेळाना पहातो, येशूने म्हटले की राजासन मांडले जाईल, आणि कसे...ते प्रत्येकजण न्यायात उभे राहतात.

144 आता, आपण आता पहातो की हे लोक जीवंत देवाच्या शिक्क्याने मोहरबंद केलेले होते (हे बरोबर आहे?) हे यहुदी. जीवंत देवाचा शिक्का काय आहे?

145 आता, मी कोणाला काही सांगत नाही, कोणत्या भावना दुखवीत नाही. मी फक्त सांगत आहे, पहा, तुम्हाला ठाऊक आहे, की कित्येक ज्यांनी ह्यावर लिहीले आहे, ते वाचल्यावर, ते दावा करतात की येथे हा समुह, रक्ताने धुतलेला, ही वास्तवात वधू आहे?

146 तुम्हाला ठाऊक आहे की विद्वान असाही दावा करितात की एक लक्ष चव्वेचाळीस हजार हे वधू आहेत? काय...येथे काहीतरी चुकीचे बसविलेले आहे...ठीक येथे, कारण तेथे आता काहीतरी चुकीचे आहे.

147 लक्ष द्या, आमचे ॲडवेन्टीस्ट बंधुजन म्हणतात की, "देवाचा शिक्का म्हणजे शब्बाथ दिवस पाळणे आहे." तुम्हाला ते ठाऊक आहे. परंतु मला ह्यावर पवित्र वचनाचा भाग पाहीजे जो दाखवतो की शब्बाथ किंवा शब्बाथ दिवस पाळणे हा देवाचा शिक्का आहे. समजले? ही फक्त कोणीतरी कल्पना आखलेली आहे.

148 परंतु, जर तुम्ही इफिसकरांस पत्र 4:30 वाचले, ते म्हणते, "देवाच्या पवित्र आत्म्याला खिन्न करु नका. खंडणी भरुन प्राप्त केलेल्या मुक्तीच्या दिवसापर्यंत तुम्ही त्या आत्म्याच्या योगे मुद्रीत झाला आहे," होय, महाशय, जेव्हा मध्यस्थीचे कार्य समाप्त होते, आणि तुम्ही येता, ख्रिस्त त्याच्या स्वकीयांना सोडवण्यासाठी येतो. तुम्ही मुद्रीत झालेले आहात, जोपर्यंत पुढील संजीवन येत नाही. जेव्हा एकदा तुम्ही पवित्र आत्म्याद्वारे मुद्रीत झालेले आहात, हे पूर्ण झालेले कार्य आहे, की परमेश्वराने तुमचा स्विकार केलेला आहे, आणि त्यापासून दूर जाणे नाही.

149 तुम्ही म्हणता, “ठीक आहे, माझ्याकडे तो होता, आणि मी दूर गेलो.” नाही, तुमच्याकडे—तुमच्याकडे तो नाही.

150 परमेश्वराने म्हटले मुक्तीच्या दिवसापर्यंत तो तुमच्यासह आहे. आता, तुम्ही फक्त त्याच्याबरोबर वाद घालता, आणि तुम्हाला ठाऊक आहे ह्याचा अर्थ काय आहे. “तुमच्या मूक्तीच्या दिवसापर्यंत.”

151 लक्ष द्या. जसे ते तेथे होते...कारण ते निवडीप्रमाणे शेष असे होते. हे यहुदी आता निवडीप्रमाणे शेष असे आहे. यहुद्यांसाठी एलीयाच्या प्रथम सेवकाईच्या दिवसात, जेथे सात हजार विश्वासी परमेश्वराने वेगळे ठेवले होते, आता ते ह्या उरलेल्या समयात, एक लक्ष चव्वेचाळीस हजार त्यांच्या निवडीप्रमाणे येत आहेत. त्या समयाचा संदेश, संदेशावर विश्वास ठेवण्यासाठी एक लक्ष चव्वेचाळीस हजार आहेत.

152 आता, तुम्ही म्हणाल, “ओह, आता एक मिनिट, भाऊ, मला ह्या ‘निवडीविषयी’ ठाऊक नाही. बरे, मी तेथे ते कधीच वाचले नाही.”

153 ठीक आहे, आता आपण पाहूया की हे बरोबर आहे की नाही. आपण परत मत्तयकडे वळूया, आणि येथे खाली जाऊया आणि शोधूया की आपण ह्याविषयी कोठेतरी काही थोडेसे सापडते का पाहूया. मी आता विश्वास करतो की मी बरोबर आहे. मी ते येथे लिहून ठेवलेले नाही. परंतु सहज माझ्या मनात आले. आपण शेवटून घेऊया, 30वे वचन, जेथे काल रात्री आपण पाहीले, सहाव्या शिक्क्याच्या शेवटी, 30व्या वचनात. आता आपण ते वाचूया आणि पाहूया की आपल्याला 31 व्या वचनाकडे जायचे आहे. समजले? “ते मनुष्याच्या पुत्राला गौरवात येताना पाहतील.” आता 31 वे वचन.

> *कर्ण्याच्या महानादाबरोबर तो आपल्या दूतांस पाठवील, आणि ते आकाशाच्या एका सीमेपासून दुसऱ्या सीमेपर्यंत त्याच्या निवडलेल्यांस चारही दिशांकडून जमा करतील.’*

154 जे “निवडलेले” आहेत ते बाहेर येतील. हे काय आहे? आणि महासंकटाचा समय परमेश्वर. त्याच्या निवडलेल्यांस बोलावील, आणि त्या समयात ते निवडलेले यहुदी आहेत. बायबल त्याविषयी बोलते. पौल त्याविषयी बोलतो, “निवडीप्रमाणे.” ते निवडीप्रमाणे एक लक्ष आणि चव्वेचाळीस हजार असतील, जे ह्या संदेशावर विश्वास करतील, अक्षरश: तेथे असलेल्या लाखो लोकांतून.

155 एलियाच्या भविष्यवाणीच्या दिवसात, पलिष्टानात तेथे लाखो लोक होते, आणि लाखोंतील सात हजार वाचले होते.

156 आता, “निवडीप्रमाणे.” जेथे लाखो यहूदी जन्मभूमीत एकत्र होत होते. ते एक राष्ट्र बनत असे. तेथे लाखो असतील, परंतु फक्त एक लक्ष आणि चव्वेचाळीस हजार “निवडलेले” घेतले जातील. ते संदेश ऐकतील.

157 तीच गोष्ट परराष्ट्रीय मंडळीत आहे. तेथे वधू आहे, आणि ती निवडलेली आहे. “आणि त्याला निवडीप्रमाणे बोलावले जाईल.” लक्ष द्या, हे सर्व तंतोतंत मंडळीला, निवडलेल्या विश्वासणाऱ्यास दर्शविते.

158 दुसरे विश्वास ठेवीत नाहीत. तुम्ही फक्त ते सांगू शकता. तुम्ही एखाद्या मनुष्याला सत्य सांगा, आणि ते वचनाद्वारे सिध्द केलेले असू द्या; आणि नंतर प्रगट केलेले, तो म्हणतो, “मी त्यांवर विश्वास ठेवत नाही.” तुम्ही फक्त...

159 त्याद्वारे आणखी मुर्ख होऊ नका. येशूने सांगितले तसे करु नका. म्हणाला, “ते डुकरणीपुढे मोती टाकण्यासारखे आहे.” समजले? म्हणालो, “त्यांना एकटे राहू द्या. ते

वळतील आणि तुम्हाला त्यांच्या पायांखाली तुडवतील. ते तुमची थट्टा करतील. तेथून दूर जा आणि त्यांना सोडा. 'जर आंधळा आंधळ्याला वाट दाखवील...'"

160 फार समय झाला नाही, मी एका मनुष्याकडे गेलो, किंबहुना, तोच माझ्याकडे आला. तो सर्वत्र दैवी आरोग्याविरुध्द, वादविवाद करीत होता. आणि तो वर आला आणि तो म्हणाला, "मी तुझ्या दैवी आरोग्यावर विश्वास ठेवत नाही."

161 मी म्हणालो, "माझ्या, मला वाटते, त्याने काही फायदा होणार नाही, कारण माझ्याकडे काही नाही." आणि तो...मी म्हणालो, "परंतु परमेश्वर परिपूर्ण आहे."

तो म्हणाला, "तेथे अशी काही गोष्ट नाही."

162 मी म्हणालो, "तू हे सांगण्यासाठी खूप उशीर केला. होय, तू—तू ज्यासाठी खूप वेळ थांबला. तू काही वर्षाअगोदर वाद केला असता, परंतु आता हे दुसरे युग आहे. पाहा, तेथे लाखो साक्ष देण्यासाठी आहेत." मी म्हणालो, "तू—तू आता हे बोलण्यास खूप उशीर केला आहेस."

163 त्याने म्हटले, तो म्हणाला, "अच्छा मी त्यावर विश्वास ठेवीत नाही; तु काय करतोस ह्याची मी पर्वा करीत नाही."

मी म्हटले, "निश्चितच नाही. तू करु शकत नाही." समजले?

164 त्याने म्हटले, "मला आंधळे कर!" म्हणाला, "जर तुझ्याकडे खरोखरीच पौलासारखा पवित्र आत्मा आहे," म्हणाला, "मला आंधळे कर."

165 मी म्हणालो, "मी ते कसे करु शकतो जेव्हा तू अगोदरच आंधळा आहेस?" मी म्हणालो, "तुझ्या पित्याने तुला सत्यापासून आंधळे केले आहे." मी म्हणालो, "तू, तू आधीच आंधळा आहेस."

166 आणि त्याने म्हटले, "मी विश्वास ठेवणार नाही; मी पर्वा करीत नाही की तू काय करु शकतो, तू किती पुराव्याने सिध्द करु शकतो, किंवा ह्यासारख्या काही गोष्टी. मी अजूनही ह्यावर विश्वास ठेवत नाही."

167 मी म्हटले, "निश्चितच, ते अविश्वासणाऱ्यांसाठी नाही. ते फक्त विश्वासणाऱ्यांसाठी आहे. हेच ते आहे." समजले?

168 ते काय आहे? पाहा, तुम्हाला त्याचवेळेस समजते, निवड नाही. ह्यामुळे मूळीच मूर्ख बनू नका. येशूने तीच गोष्ट केली. त्याने म्हटले, "त्यांना एकटेच राहू द्या. जर आंधळा आंधळ्यास वाट दाखवील, ते दोघेही खड्ड्यात पडणार नाहीत काय?"

169 परंतु जेव्हा तो त्या क्षुद्र वेश्येकडे आला, [भाऊ ब्रॅन्हम त्याच्या बोटाने एकदा टिचकी वाजवितात—सम्पा.] तेथे आग लागली! ते काय आहे? ते निवडलेले बीज तेथे होते, पाहा, तिने ते त्याक्षणी पाहीले. जेव्हा ते पेत्राकडे आले, तेथे निवडलेले बीज होते, पाहा, आणि त्यांनी ते पाहिले. "आणि जे सर्व पित्याने दिलेले आहे, दिलेले आहे" (भूत काळ) "मला दिलेले आहे, ते माझ्याकडे येतील. ते माझ्याकडे येतील." ओह, माझ्या देवा! मी त्यावर प्रेम करतो! होय, महाशय. लक्ष द्या, विश्वासणारे त्यावर विश्वास ठेवतील.

170 अविश्वासणारे ह्यावर विश्वास ठेवू शकत नाहीत. म्हणून, आता, जर कोणी सर्प वंश आणि अशा गोष्टीविषयी वादविवाद करु इच्छितात, आणि तुम्ही त्यांना दाखवायचा प्रयत्न केला, ते हे ऐकणार नाही; फक्त निघून जातील त्यांना एकटेच राहू द्या समजले, परमेश्वर वादविवाद करीत नाही, त्याची लेकरेही वादविवाद करीत नाही.

171 लक्ष द्या, परमेश्वराचे एक लक्ष आणि चव्वेचाळीस हजार निवडलेले यहूदी श्वापदाला, त्याच्या संप्रदायाला किंवा मुर्तींना, किंवा कुठल्याही गोष्टींना नमन करीत नाही, जरी त्यांचे राष्ट्र त्यासमयी करारामध्ये होते. इस्त्राएल करारामध्ये आहे, परंतु येथे एक लक्ष चव्वेचाळीस हजार आहे जे ते करणार नाही. ते निवडलेले आहेत.

172 तशीच गोष्ट आता येथे परराष्ट्रीय मंडळीमध्ये आहे, तो एक निवडलेला समुह आहे. तुम्ही त्यांना त्या प्रकारच्या लोकांमध्ये ओढू शकत नाही. ते ह्यावर विश्वास ठेवणार नाही. नाही, महाशय जेव्हा प्रकाश एकदा त्यांच्यावर त्याचवेळी सर्वगोष्टी ठीक होतात. ते हे…घडताना पाहतात, नंतर ते प्रगट होताना आणि सिध्द होताना पाहतात. आणि ते येथे खाली बायबलमध्ये पाहतात. त्या वचनास पुढे घडताना पाहतात. ठीक आहे, तुम्ही केवळ तुम्ही—तुम्ही त्याच्याबरोबर मुर्ख होण्याचे सोडून द्या, कारण ते ह्यावर विश्वास ठेवतात. हेच सर्व आहे. हेच सर्व आहे. जरी ते हे समजावू शकत नाही, परंतु त्यांना ठाऊक आहे. ते त्यांच्याकडे आहे. म्हणून, जसे मी म्हणतो, तेथे खूप गोष्टी आहेत ज्या मी समजावू शकत नाही, परंतु मला—मला ठाऊक आहे त्या कसेही करुन खऱ्या आहेत. ओह. ठीक आहे.

173 हा समय सहाव्या व सातव्या शिक्क्यांमधील होता, तो ह्या लोकांना बोलावतो. त्याच्याविषयी येशूद्वारे मत्तय 24 अध्याय आणि 31 व्या वचनात बोलतो, पाहा, जे आताच आपण वाचले आहे. ह्या तुताऱ्या दोन साक्षीदार आहे…जेव्हा तुतारी वाजते, ती दोन साक्षीदारांची तुतारी कृपेच्या समयाची यहुद्यांसाठी आहे. एक तुतारी वाजली, तुम्ही लक्ष द्या. एक तुतारी वाजली. तो म्हणाला, "आणि कर्ण्याचा नाद झाला." आता येथे 31व्या वचनाकडे लक्ष द्या.

*कर्णाच्या महानादाबरोबर तो आपल्या दूतांस पाठवील, (एक नाही, पाहा, तेथे दोन आहेत.)…*

174 ते काय आहे? जेव्हा परमेश्वर बोलण्यास सज्ज होतो, तेथे कर्ण्याचा नाद होतो. ती सदैव त्याची वाणी असते. पाहा, ती युध्दासाठी बोलावते. परमेश्वर बोलतो. हे दूत कर्ण्याच्या नादासह पुढे येतील.

175 आणि तुम्ही लक्ष दिले काय, अंतिम दूताच्या संदेशावेळी, कर्णा वाजतो. पहिल्या दूताचा संदेश, एक कर्णा वाजला; दूसऱ्या दूताच्यावेळी, एक कर्णा वाजला, जेव्हा तो ते पाठवतो. लक्ष द्या, परंतु जेव्हा शिक्के जाहीर केले गेले, ते सर्व एका महान दैवी गोष्टीत होते. लोकांचा समुह बोलावण्यासाठी, तेथे एक कर्ण्याचा नाद झाला होता, आणि सात शिक्के फोडण्यात आले होते.

176 लक्ष द्या, "ते आकाशाच्या एका सीमेपासून दुसऱ्या सीमेपर्यंत, त्याच्या निवडलेल्यांस यहूद्यांस चारही दिशांकडून जमा करतील."

177 जसे आपण पाहीले, त्याने सहा शिक्क्यांचा उल्लेख केला, परंतु सातव्या शिक्क्यांचा केला नाही. त्याने येथे कधीही सातव्या शिक्क्यांविषयी कोठेही काहीही सांगितले नाही.

178 थेट 32 व्या वचनाकडे पाहा, दृष्टांताकडे वळा. निवडलेल्या यहुद्यांस बोलावण्याच्या समयी. आता येथे लक्ष द्या.

179 "आणि तो दूतांना कर्ण्यासह पाठवील, आणि निवडलेल्यांस आकाशाच्या चारही दिशांकडून जमा करतील." आता तो सुरुवात करतो…

180 पाहा, तो येथे सातव्या शिक्क्याविषयी काही एक सांगत नाही. समजले? तो सहाव्या शिक्क्याविषयी बोलला; पहिला, दुसरा, तीसरा, चौथा, पाचवा, आणि सहावा.

181 परंतु लक्ष द्या:

*आता अंजिराच्या झाडाचा दाखला घ्या. त्याची डहाळी कोमल असता तीला पाने फुटू लागली, म्हणजे उन्हाळा जवळ आला असे तुम्ही समजता.*

*तसेच तुम्हीही ह्या सर्व गोष्टी पाहाल तेव्हा तो जवळ, दाराशीच आहे असे समजा.*

182 तो शेवटचा, तो प्रश्न त्यांनी त्याला विचारला, "आणि ह्या युगाच्या समाप्तीचे चिन्ह काय?"

183 "जेव्हा तुम्ही ह्या यहुदी लोकांना पाहता...जेव्हा तुम्ही ह्या इतर गोष्टी घडताना पाहता, तुम्हाला माहीत आहे काय घडत आहे. आता जेव्हा तुम्ही ह्या यहुदी लोकांना पाहता..." तो यहुद्यांशी बोलत आहे! आता लक्ष द्या. की तो कोणा संगती बोलत आहे, परराष्ट्रीयांशी? यहुद्यांशी! यहुद्यांशी! समजले?

184 आता, तो म्हणला, "तुमचा माझ्या नावासाठी सर्व राष्ट्रे द्वेष करतील," आणि अशाच प्रकारे पुढे.

185 आता, "केव्हा," त्याने म्हटले, "तुम्ही ह्या यहुद्यांना पलिकडे पुढे उमलताना पाहता," जेव्हा तो इस्त्राएलाने पुन्हा तिच्या देशाकडे वळण्यास सुरुवात केली. जेव्हा ती तेथे जाते, (मंडळी स्वर्गारोहणासाठी तयार आहे.) तेथे जूने जगाच्या अंतासाठी फक्त साडेतीन वर्षे उरलेली आहेत, आणि ती गोंधळात जाते, आणि सहस्त्रवर्षाचा, काळ येतो नविन, नविन—नविन पृथ्वीसाठी. म्हणाला, "दाराशी आहे!" आता पृथ्वीवरील एक हजार वर्षे देवासाठी फक्त एक दिवस आहे. आणि साडे तीन वर्षे, ती किती असतील? देवाच्या वेळेमध्ये कित्येक सेकंद. तेच कारण आहे की त्याने म्हटले, "तो दाराशी आहे."

*मी तुम्हास खचित सांगतो, हे सर्व पूर्ण होईपर्यंत ही पिढी नाहीशी होणारच नाही...*

186 काय, काय पूर्ण होणार नाही? त्यांनी सदैव, पृथ्वीवरील यहुद्यांना मारण्याचा प्रयत्न केला आहे. ते तसे कधीच करु शकणार नाही.

187 परंतु लक्ष द्या, ही पीढी यहुद्यांना परतताना, पुन्हा पलिस्तानात येताना पाहील, ती पीढी ह्या गोष्टी घडताना पाहील. आणि आताच दोन वर्षामागे, ती एक परिपूर्ण राष्ट्र तीच्या स्वतःच्या मूद्रेसहीत बनली आहे आणि जे काही तेथे त्या स्थितीत ती आहे.

188 आता मित्रांनो, आपण कुठे आहोत? शिक्के आणि सर्व गोष्टी उघडत आहेत, आता आपण येथे मध्ये आहोत. हे तेथे आहे. पाहा, आपण कोठे बसलेलो आहोत? [मंडळी म्हणते, "आमेन"—सम्पा.]

189 मी आशा करतो तुम्ही ते समजत आहात. माझ्याकडे कुठलेही शिक्षण नाही. मला ठाऊक आहे मी कशाविषयी बोलत आहे, परंतु कदाचित मला ते समजावता—समजावता येऊ शकत नाही, समजावता, तुम्हाला अर्थ समजण्यासाठी. परंतु मी आशा करतो की परमेश्वर ह्या मिश्र वचनाला घेतो, आणि त्यांना विभागतो, पाहिले, आणि तुम्हाला समजते की ते काय आहे. कारण, तो, आपण दाराशी आहोत. आपण येथे वेळेवर आहोत. आता लक्ष द्या.

190 पाहा, आताच, तो ह्या यहंद्यांकडे वळतो, आणि अंतिम समयी. तो काय घडणार आहे ते सांगतो. आपणही ते आता जाणतो...आपल्याला माहीत आहे, आपण चांगल्या रीतीने जाणतो, की वंश विखरलेले आहेत. ते पंचवीशशे वर्षांपासून आहेत. त्यांच्याविषयी

भविष्यवाणी केली होती. की ते चार वाऱ्यांनी विखरतील. तुम्हाला ते माहीत आहे ना? आपल्याला ते ठाऊक आहे.

191 कारण, आपणास मागे जाऊन पाहावे लागणार नाही, कारण माझ्याकडे येथे खरी महत्त्वाची गोष्ट आहे जी माझी इच्छा आहे की तुम्ही पाहावी, तुम्ही खूप थकण्याआधी, आणि मी थकलो आहे.

192 लक्ष द्या. आपणाला ठाऊक आहे, अगदी प्रत्येक वंश, ते वंशाचे कालगणनाशास्त्र आहे, किंवा तुम्ही त्यास जे काही संबोधू इच्छिता, किंवा भूरचनाशास्त्र, किंवा वंशाची स्थिती, आता एकत्र नाही. ते सगळीकडे विखरलेले आहेत.

193 यहुदी, यरुशलेमेत एकत्रित होत आहेत. हो की नाही...ते त्यांचे वंशही जाणत नाही. त्यांच्याकडे आणखी वंशाचे झेंडे नाहीत किंवा काहीही. जे सर्व त्यांना ठाऊक आहे, की ते यहुदी आहेत. ह्या स्थितीत सर्व जगभर असण्याची त्यांच्याविषयी भविष्यवाणी केली गेली होती. आता, त्यांची पुस्तके नष्ट करण्यात आली आहेत. त्यांना ठाऊक नाही.

तुम्ही म्हणता, "तुम्ही कोणत्या वंशाचे आहात?"

"मला ठाऊक नाही."

"कुठला वंश?"

"मला ठाऊक नाही."

194 एक बन्यामीन वंशाचा, एक *ह्या* वंशाचा, आणि एक *त्या* वंशाचा. त्यांना ठाऊक नाही. की ते कुठले आहेत. त्यांची पुस्तके युध्दाद्वारे नष्ट करण्यात आली, आणि पंचवीसशे वर्षे होऊन गेली, त्यांना केवळ इतकेच ठाऊक आहे, की ते यहुदी आहेत. बस. म्हणून, त्यांना ठाऊक आहे की ते त्यांच्या जन्मभूमीत पुन्हा आले आहेत. ते अजूनही...लक्ष द्या, जरी त्यांना त्याचे वंश माहीत नाही, परंतु परमेश्वराला ठाऊक आहे.

195 मला ते खूपच आवडते! तुम्हाला ठाऊक आहे! त्याने म्हटले तेथे..."तुमच्या डोक्यावरील प्रत्येक केस मोजलेला आहे." हूं! लक्षात घ्या! तो काहीच गमवत नाही. "मी ते शेवटच्या दिवशी वाढवीन."

196 जी त्यांनी त्यांचे—त्यांच्या वंशाचे झेंडे गमावले आहेत आणि *कोण* कुठला आहे, आणि ते *ह्या* किंवा *त्या* वंशाचे आहेत, त्यांना ठाऊक नाही की ते बन्यामीन वंशाचे आहेत किंवा नाही, किंवा—किंवा ते रऊबेन आहेत, किंवा—किंवा इस्साखार, किंवा ते कुठले आहेत. परंतु देव त्यांना येथे बोलावितो.

197 आता, लक्ष द्या, प्रकटीकरण 7 मध्ये, आपण हे वाचतो. प्रत्येक वंशाचे "बारा हजार" त्या सर्वांतून निवडलेले आहेत. तेथे प्रत्येक वंशाचे बारा हजार, जे निवडलेले आहेत. येथे क्रमाने ठेवलेले आहेत. ओह, माझ्या प्रभू! ते काय आहेत? ते वंशाच्या क्रमाप्रमाणे आहेत. परंतु अजूनही ते तसे नाहीत, परंतु ते येतील ते वंशाच्या क्रमाप्रमाणे आहेत. वंशाचे क्रम कसे असतील? नेहमीच यहुदी नाही. परंतु ते जे निवडलेले आहेत. एक लक्ष चव्वेचाळीस हजार, वंशाच्या क्रमानुसार घेतले जातील. ओह! माझ्या प्रभू!

198 कसे ते मला तुम्हास दाखविण्यास आवडेल! आपण त्यात पाहणार नाही. परंतु अगदी त्याच प्रकारे मंडळी शिस्तीत असली पाहीजे.

199 आता माझी इच्छा आहे की तुम्ही काही मिनीटांसाठी लक्षपूर्वक पाहावे आणि माझ्यासह वाचावे. आता येथे काही गोष्ट आहे जिच्याकडे तुम्ही वंशाच्या बोलावण्यात, कधीच लक्ष दिले नसेल. मी तुम्हाला काही वेळा अगोदर प्रकटीकरण 7 वाचण्यास

सांगितले. माझ्याबरोबर वाचा, आणि त्या वंशाकडे जवळून पाहा. प्रकटीकरण 7मध्ये दान आणि एफ्राईम दिसत नाही आणि त्यांच्यासह गणला गेला नाही. तुम्ही त्याकडे लक्ष दिले काय? योसेफ आणि लेवी त्यांच्या जागी घेतलेत. तुम्ही त्याकडे लक्ष दिलेत का? दान आणि एफ्राईम तेथे नाहीत. नाही, महाशय. परंतु योसेफ आणि लेवी ह्यांना दान आणि एफ्राईमाच्या बदल्यात घेतले गेले.

200 का? ...सदैव लक्षात ठेवणारा, देव त्याचे प्रत्येक वचन लक्षात ठेवतो. ओह, मला त्यावर प्रचार करण्यास आवडेल. समजले? देव कधीच विसरत नाही, जरी ते तसे वाटते.

201 जसे त्याने मोशेला म्हटले. इस्त्राएल तेथे "चारशे वर्षांपासून" होता. त्यांना त्या समयापर्यंत जाणे होते. त्याने अब्राहामास म्हटले, "आणि त्याची संतती परकीय प्रांतात चारशे वर्षे राहील, तो त्याच्या सामर्थ्यशाली हाताने त्यांना बाहेर आणिल." परंतु मग त्याने मोशेला म्हटले, "मला माझे अभिवचन लक्षात आहे, आणि मी जे म्हटले ते पूर्ण करण्यास खाली आलो आहे."

202 परमेश्वर विसरत नाही. तो त्याचे शाप विसरत नाही, त्याचे आशीर्वादही विसरत नाही. परंतु, जे प्रत्येक अभिवचन त्याने केले आहे, तो त्यासह राहतो.

203 आता जर आपण पाहीले की येथे ते का चुकले. आता वाचा. माझी इच्छा आहे की आता मजबरोबर वाचावे. अनुवादकडे जा, वीस...29वे वचन किंवा अधिक निश्चित 29 वा अध्याय. हे वंश तेथे नसल्याचे कारण तेथे आहे. प्रत्येक गोष्टीला एक कारण असते. अनुवाद, आम्ही अनुवाद पुस्तकाचा 29वा अध्याय घेऊ इच्छितो. आता, प्रभू आम्हास सहाय्य करो, की आपण आता समजू शकू. आता आम्ही अनुवाद, 29 अध्याय, 16 व्या वचनापासून सुरुवात करु इच्छितो. आता ऐका मोशे बोलत आहे.

> *(आपण मिसर देशात कसे राहत होतो व निरनिराळ्या राष्ट्रांमधून प्रवास करीत आपण कसे आलो हे तुम्हाला ठाऊकच आहे;*
>
> *आणि त्यांच्या काष्ठपाषाणांच्या...व सोन्यारुप्याच्या मुर्ती व इतर अमंगळ वस्तू तुम्ही पाहील्या.)*

204 प्रत्येकजण एखादी लहानशी किंवा इतर गोष्ट, लहानशी संत सीसीलीयाची मूर्ती वाहून नेत असतो. तुम्हाला माहीत आहे, त्यासारखेच काहीतरी, पहा. "कदाचित म्हणून..." लक्षपूर्वक ऐका.

> *आज आपला देव परमेश्वर ह्यांच्यापासून परावृत्त होऊन त्या राष्ट्रांच्या देवाची सेवा करावयाला आपले मन प्रवृत्त करील असा एखादा पुरुष, स्त्री, कूळ किंवा वंश तुमच्या लोकांत कदाचित असायचा! कोण जाणे! विष व कडूदवणा येणारे मूळ तुमच्यामध्ये असेल!*
>
> *जरी मी आपल्या मनाच्या इच्छेप्रमाणे वागलो तरी माझे कुशलच होईल असे तो आपल्या मनाचे समाधान करुन घेईल...*

205 पाहा, लोक म्हणतात, "हा त्याला स्वतःला आशीर्वाद देत आहे." तुम्हाला ठाऊक आहे ते छोटासा क्रूस बनवतात किंवा असेच काही करतात, जसे ते आता करतात, तुम्ही पाहा त्याच गोष्टी, समजले. आणि तुम्ही पाहा हे मुर्तीपूजकांचे स्वभाववैशिष्ट्य आहे, पाहा, इतर राष्ट्रे.

> *...जरी मी आपल्या मनाच्या इच्छेप्रमाणे...वागलो तरी माझे कुशलच होईल असे तो आपल्या मनाचे समाधान करुन घेईल, पण त्यामुळे सुक्याबरोबर ओलेही जळून जाईल.*

206 "फक्त प्या. त्याने काहीही फरक पडत नाही. जोपर्यंत तुम्ही मंडळीत जाता, तुम्ही योग्य आहात."

> *परमेश्वर त्याला मुळीच क्षमा करणार नाही, पण त्याचा कोप...व त्याची ईर्ष्या असल्या मनुष्यावर पेटेल, व ह्या ग्रंथात लिहीलेले* (वचनांतून काही काढू नका किंवा त्यात वाढवू नका. समजले?) *सर्व शाप त्याला लागतील. आणि परमेश्वर त्याचे...भूतलावरुन त्याचे नाव खोडून टाकील*

207 जोपर्यंत तो येथे भूतलावर आहे ते होईल, समजले "आकाशाखाली."

> *आणि नियमशास्त्राच्या ह्या ग्रंथात जो करार लिहिलेला आहे त्यांतल्या सर्व वचनाप्रमाणे परमेश्वर त्याच्या वाईटासाठी त्याला इस्त्राएलाच्या सर्व वंशातून वेगळे करील.*

208 म्हणून, "जर कोणी मनुष्य एका मूर्तीची सेवा करील किंवा एखादी मूर्ती त्याच्यावर ठेवील किंवा त्याच्या मनाच्या इच्छेप्रमाणे वागलो तरी माझे कुशलच होईल असे म्हणेल, आणि मूर्ती सेवा करील." परमेश्वराने म्हटले आहे, "एखादा पुरुष, स्त्री, कूळ, किंवा वंश, त्याचे नाव त्या लोकांमधून पूर्णपणे खोडले जाईल." आता ते बरोबर आहे का? [मंडळी म्हणते, "आमेन"—सम्पा.] किती सत्य आहे!

209 मूर्तीपूजेने मंडळीत काही वर्षांआधी तीच गोष्ट केली, आणि आजही करीत आहे. आणि मी पाहीले...पाहा ख्रिस्तविरोधी कशाप्रकारे विरुध्द हालचाल करण्याचा प्रयत्न करीत आहे. किती जणांना ठाऊक आहे की सैतान परमेश्वराच्या संताच्या नमून्यांचे रुप धारण करतो?

210 काय आहे—पाप काय आहे? योग्य गोष्टी विकृत करणे होय. खोटे काय आहे? सत्याचा विपर्यास करणे. व्यभिचार करणे. व्यभिचार काय आहे? योग्य कृती, कायदेशीर कृती चूकीच्या पद्धतीने करणे. समजले?

211 आता, हे करण्याचा प्रयत्न करीत असता, "नाव खोडले गेले," तुम्ही मंडळीच्या युगात, तेच श्वापद मृत लोकांच्या मूर्त्यांची उपासना करीत आहे. आणि इत्यादी प्रभू येशू ख्रिस्ताचे नाव खोडण्याचा प्रयत्न करीत आहे आणि पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा अशा उपाधि देत आहे. तीच गोष्ट, अशा प्रकारे, त्यामागे शाप आहेत.

212 दान आणि एफ्राईमाने, इस्त्राएलाचा ढोंगी राजा, तोतया, यराबाम ह्यांच्या कारकिर्दीत तेच केले. आता 1 राजे 12 अध्याय पाहा. मला ठाऊक आहे आपण...हे माझ्यासाठी ते—ते—ते एक पार्श्वभूमी बनवते. ज्यावर आपण अवलंबून राहू शकतो. जे आपण पाहतो. एक राजे, मी 12 अध्याय, 25 ते 30 वचनांकडे जाऊ इच्छितो.

> *तेव्हा यराबाम...एफ्राईमाच्या पहाडी प्रदेशात शाखेम नगर मजबूत करून तेथे राहू लागला आणि त्यानंतर तेथून निघून जाऊन पनुएल नगरची मजबुती केली.*
>
> *आणि आता यराबाम आपल्या मनात म्हणाला...की,* (पाहा, त्याच्या मनाची कल्पना),*हे राज्य दाविदाच्या घराण्याकडे जाण्याचा संभव आहे.*

213 तो घाबरत होता, तुम्ही समजता, कारण लोक कदाचित बाहेर जातील.

> *जर लोक...यरूशलमेत यज्ञ करावयास गेले तर त्यांचा स्वामी यहुदाचा राजा रहबाम याच्याकडे त्यांचे मन वळेल व ते मला जीवे मारुन यहुदाचा राजा...रहबाम—रहबाम याचे पुन्हा होतील.*

*राजाने आपल्या बरोबरच्या लोकांचा सल्ला घेऊन सोन्याची दोन वासरे केली आणि लोकांस म्हटले आजवर तुमचे यरुशलमेस जाणे झाले तेवढे पुरे, इस्राएला, ज्या देवांनी तुला...मिसर देशातून आणिले तेच हे पहा.*

*आणि त्याने एका वासराची बेथेल येथे व दुसऱ्याची दान येथे स्थापना केली.*

*आणि ही गोष्ट पापास कारण झाली, दानापर्यंतचे लोक ह्यांपैकी एका वासराच्या दर्शनास जाऊ लागले.*

214 पाहा, एफ्राईम बेथेल येथे, आणि दान आणि त्यांनी मूर्त्यांची स्थापना केली. आणि ते त्याची उपासना करण्यास गेले.

215 आणि येथे आपण ह्या सहस्त्रशताब्दीच्या युगात आहोत, आणि परमेश्वर अजूनही ते पाप आठवतो. तेथे त्यांची गणना देखिल करण्यात आली नाही. होय! महिमा! [भाऊ ब्रॅन्हम त्याचे हात पुन्हा एकदा टाळी वाजवितो—सम्पा.] अगदी जशा निश्चिततेने तो त्याचे प्रत्येक चांगले अभिवचन लक्षात ठेवतो. तसेच तो प्रत्येक कुकर्मही लक्षात ठेवतो. तो लक्षात ठेवतो. जेव्हा...

216 मित्रांनो, मी विश्वास करतो तेच कारण आहे की, मी सदैव त्या वचनासमवेत राहतो, ते कितीही विचित्र भासेना त्याच्याशी काहीही कर्तव्य नाही.

217 पाहा, आता, त्यांनी त्यावेळी तेथे त्याविषयी विचार केला नाही. त्यांनी तेव्हा त्याविषयी विचार केला नाही. त्यांना वाटले, "ठिक आहे, त्याचे काम झाले आहे." ठीक आहे.

218 परंतु येथे ते ह्या हजार वर्षाच्या काळात बसले आहेत, जेव्हा त्यांची नावे आणि वंश त्यांच्यातून "खोडलेले आहेत," कारण त्यांनी मूर्तीची आराधना केली, त्यांना परमेश्वराने शापित केले.

219 त्याने असे म्हटले नाही की, त्याने निकलाईताचे आणि इजबेलचा "द्वेष" केला? त्यापासून वेगळे राहा. त्याने असे म्हटले नाही की तो इजबेलीच्या कन्यांना "मृत्यू" ने मारुन टाकेन, ते त्याच्या उपस्थितीपासून सर्वकाळासाठी वेगळे होणे आहे? त्यावर मूळीच, विश्वास ठेवू नका, त्यापासून दूर व्हा. म्हणून परमेश्वर लक्षात ठेवतो. लक्ष द्या.

220 परंतु, तुम्ही तेथे पाहिले का, ते "खोडले जाणार" होते? का? स्वर्गाखाली तेथे कुठलेच त्वरीत बलिदान नव्हते की जे त्याला पवित्र आत्मा देऊ शकत होते की तो ह्या गोष्टी पाहील. परंतु त्याने ते केले, कशाही प्रकारे, त्याच्या स्वार्थी बुध्दीने.

221 परंतु, यहेज्केल, सहस्त्रशताब्दीच्या वर्ष काळात, त्याच्या दृष्टांतात, तो पुन्हा त्यांना योग्य क्रमाने पाहतो. यहेज्केल, जर तुम्हाला ते वाचायचे असेल. तर ते खाली ठेवा, आणि वेळ वाचवण्यासाठी तुम्ही ते वाचू शकता. यहेज्केल 48:1 ते 7, 23 ते 29, ही वाचा. यहेज्केलने प्रत्येक वंश तंतोतंतपणे योग्य क्रमाने पाहीला. ठीक आहे.

222 आणि प्रकटीकरण 14 मध्येही योहानाने पुन्हा त्यांना वंशाच्या क्रमाने पाहिले, ते बरोबर आहे, प्रत्येक वंश त्याच्या जागी. काय घडले?

223 तुम्हाला लक्षात आहे, त्याने म्हटले, "स्वर्गाखाली त्याचे नाव वंशावळीतून खोडले जाईल." जोपर्यंत तो स्वर्गाखाली होता, तेथे ते आणखी असणार नाही. आणि हे एक लक्ष चव्वेचाळीस हजार येथे अजूनही वंशावळीत आहे, परंतु तुम्ही पाहीले, त्यांना आंधळे केले गेले होते. त्यांच्याकडे फक्त बैलांचे आणि बकऱ्यांचे अर्पण होते. समजले? आता, लक्ष द्या, त्याने त्यांना खोडले, "स्वर्गाखाली."

224 परंतु परराष्ट्रीय, पवित्र आत्म्याच्या दिवसात त्याच्या विरुध्द, तुमची नावे जीवनाच्या पुस्तकातून पूर्णपणे काढली जातील, "आणि कदापि क्षमा मिळणार नाही. ह्या युगातही किंवा येणाऱ्या युगातही." ते बरोबर आहे? म्हणून तेथे आपण उभे आहोत.

225 इस्त्राएल, त्यांची—त्यांची जागा बकऱ्या, मेंढ्याच्या जागी होती. जोपर्यंत ते येथे पृथ्वीवर होते, त्याचा वंश गमावलेला होता. त्यांना कधीच समाविष्ट करु शकत नव्हते. आता सर्व...जेव्हा त्याने त्यांना तेथे बोलावले, एक लक्ष चव्वेचाळीस हजार, ते तेथे नव्हते. ते बरोबर आहे. त्यांना तेथे मोजण्यातही आले नव्हते. आणि योसेफ आणि लेवीला दान आणि एफ्राईम ह्यांच्या जागी घेण्यात आले. आता तुम्ही त्याकडे पाहू शकता. तुम्ही पाहण्याआधी, ते तेथे आहेत. आणि येथे परमेश्वराचे अभिवचन, शेकडो आणि शेकडो वर्षांअगोदर तेथे आहे. [भाऊ ब्रॅन्हम मंचावर पुष्कळ वेळा ठोठावतात—सम्पा.]

226 आता, काय घडले? त्यांना भयंकर महासंकटाच्या काळात शुध्द केले होते.

227 आता, जर परमेश्वर त्या कुमारीला—शुध्द करणार आहे, जी चांगली स्त्री होती. परंतु ती तिच्या दिव्यात तेल आणण्यास असमर्थ ठरली, आणि तो तिला महासंकटाच्या समयामध्ये शुध्द करणार आहे. त्याने ते वंश त्याच गोष्टीसाठी तेथेच ठेवणार आहे, आणि त्यांना महासंकटाच्या समयात शुध्द करणार आहे. कारण, ते एक—एक शुध्दीकरण आहे. तो न्याय आहे. परंतु, तुम्ही पाहता, ते, नंतर...आणि येथे पाहा, शुध्दीकरणानंतर येथे एक लक्ष चव्वेचाळीस हजार इस्त्राएल आले आहेत. आणि येथे निद्रीस्त कुमारीही शुध्द झाल्यावर येतात, आणि शुभ्र वस्त्र घातलेले आहे. पाहिले? किती परिपूर्ण! किती सुंदर ते आहे!

228 अगदी जसा याकोब, संकटाच्या समयी, पाहा. ते...याकोब, संकटाच्या समयी त्याने चूक केली होती. परंतु तो शुध्दीकरणाच्या समयांतून गेला. कारण त्याने त्याचा भाऊ एसावाचे, नुकसान केले होते. समजले? त्याने, त्याचा ज्येष्ठत्वाचा हक्क घेण्यासाठी त्याला फसविले. परंतु तो, त्याचे नाव याकोबापासून इस्त्राएल होण्यापूर्वी, शुध्दीकरणातून गेला, जे आज परमेश्वराच्या कार्य पध्दतीची, प्रतिछाया आहे.

229 आता, आपण 8व्या वचनाकडे वळूया...किंवा पहीले वचन, 8व्या अध्यायाचे, असे मला म्हणायचे आहे, प्रकटीकरणाचे 8:1.

230 मला ठाऊक आहे तुम्ही थकला आहात. परंतु, आता, फक्त आणखी काही मिनिटे ऐकण्याचा प्रयत्न करा. आणि स्वर्गाच्या परमेश्वरा आम्हास सहाय्य कर, ही माझी प्रार्थना आहे.

231 आपण लक्षात घेतले पाहीजे की हा सातवा शिक्का सर्व गोष्टीच्या समाप्तीचा समय आहे. हे बरोबर आहे. ज्या गोष्टी सात शिक्क्यांच्या पुस्तकात लिहिल्या आहेत, मुद्रीत केल्या आहेत. ती मुक्तीची योजना युगाच्या स्थापनेपूर्वी केली होती, त्या प्रत्येक अंशाचा अंत होतो. हा अंत आहे, हा संघर्ष करणाऱ्या जगाचा अंत आहे. हा सृष्टीच्या संघर्षाचा अंत आहे. हा सर्वगोष्टीचा अंत आहे. त्यातच, तूतारींचा अंत आहे. हा पीडांचा अंत आहे. हा पृथ्वीचा अंत आहे. तो आहे...तो समयाचा देखिल अंत आहे.

232 समय समाप्त होत आहे. बायबल तसे सांगते. मत्तय, 7 वा अध्याय...मला म्हणायचे आहे, प्रकटीकरण, 7वा अध्याय...10 वा अध्याय आणि...आणि 1 ते 7 वचन. समय संपला आहे. दूत म्हणतो, "आणखी समय नसणार," ते केव्हा, महान गोष्टी घडण्याच्या समयात.

233 ह्या समयात, सर्वकाही समाप्त होत आहे. अंतिम समयात...ह्या सातव्या शिक्क्याच्या शेवटी. लक्ष द्या. तो मंडळीच्या युगाचा शेवट आहे. तो—तो सातव्या शिक्क्याचा शेवट आहे. तो तुताऱ्याचा अंत आहे. तो पीडांचा अंत आहे, आणि अगदी सहस्त्रशताब्दीच्या काळात प्रवेश करण्याचा अंत आहे. हे सातव्या शिक्क्यावर आहे.

234 हे रॉकेट हवेमध्ये सोडण्यासारखे आहे. आणि त्या रॉकेटचा *येथे* स्फोट होतो, आणि ते वर जाते आणि नंतर पुन्हा स्फोट होतो. ते पाच तारे बाहेर काढते. त्याच्यातील एक ताऱ्याचा स्फोट होतो आणि त्यांच्यातून पाच तारे बाहेर निघतात; आणि मग त्यांच्यातील एका ताऱ्याचा स्फोट होतो आणि त्यांतून पाच तारे निघतात. पाहा, ते लूप्त होत आहे.

235 तोच, सातवा शिक्का आहे. तो जगाच्या समयाचा अंत करतो. तो *ह्यासाठी* समय समाप्त करतो. तो *त्यासाठी* समय समाप्त करतो. तो *ह्यासाठी* समय समाप्त करतो. तो समय समाप्त करतो. ह्या सातव्या शिक्क्यात सर्व गोष्टींचा अंत होतो.

236 आता, तो ते कसे करणार आहे? तेच जे आपणास ठाऊक नाही. नाही का? आपल्याला ठाऊक नाही.

237 तसेच हा ह्या सर्व गोष्टीसाठी समय आहे, आणि एक हजार वर्षाच्या काळात जाण्याचा समय आहे.

238 लक्ष द्या, हे शिक्के फोडणे हे इतके महान होते की स्वर्ग त्यामुळे स्तब्ध झाला होता. "अर्धा तासपर्यंत निवांत झाले." आता, ते महान आहे का! ते काय आहे? स्वर्ग, स्तब्ध झाला होता. अर्धा तासपर्यंत, तेथे एकही गोष्ट हालली नाही.

239 आता, अर्धा तास, जर तुमच्याकडे चांगला समय असला तर कदाचित अधिक वाटणार नाही. परंतु, मृत्यु व जीवनाच्या मधील रहस्यात, तो एक हजार वर्षासारखा वाटला. तो इतका महान होता!

येशूने त्याचा उल्लेख कधीच केला नाही. त्यांच्यातील बाकीच्यांनीही केला नाही.

240 योहान देखिल त्याविषयी लिहू शकला नाही. नाही, येथे त्याला लिहीण्यास मनाई केली होती. [भाऊ ब्रॅन्हमनी त्याच बायबलवर दोन वेळा थाप मारली—सम्पा.] पाहिले, तेथे फक्त...फक्त...त्याने ते लिहीले नाही, परंतु हा निवांत आहे.

241 आणि चोवीस वडील जे परमेश्वरासमोर उभे होते, तेथे, वीणा वाजवीत होते; त्यांनी त्यांचे वीणा वाजविणे थांबविले.

स्वर्गात, देवदूतांनी त्यांचे गाणे थांबविले.

242 विचार करा! ते पवित्र करुबीम आणि साराफीम, जे यशयाने मंदिरात पाहिले, सहा जोडीने...किंवा तीन पंखांच्या जोडीने. तीन...दोन त्यांच्या तोंडावर, आणि दोन त्यांच्या पायावर आणि उडत होते. आणि दिवस आणि रात्र, ते देवासमोर, गात आहेत. "पवित्र, पवित्र, पवित्र, सेनाधीश परमेश्वर!" आणि जेव्हा ते चालत किंवा मंदिरामध्ये येत, त्याच्या—त्याच्या उपस्थितीने, मंदिराचे उंबरठे हालले.

243 आणि हे पवित्र साराफिम स्तब्ध झाले. देवदूतांनी गाणे थांबविले. ओह—ओह. होय! जे परमेश्वराच्या उपस्थितीत, "पवित्र, पवित्र, पवित्र," गात होते, ते शांत झाले. कोणीही देवदूत गात नाही. स्तुती नाही. वेदीची सेवा नाही—नाही. नाही. कुठलीच नाही. तेथे निवांत होता; स्तब्धता, अर्धा तासासाठी, स्वर्गात निःशब्द शांतता.

244 स्वर्गाचे सर्व दूत ह्या अर्ध्या तासासाठी शांत होते, जेव्हा मूर्क्तींच्या पुस्तकातील ह्या सातव्या शिक्क्याचे रहस्य उघडले गेले. ह्याचा विचार करा. परंतु, तो फोडला गेला.

कोकऱ्याने तो फोडला. तुम्हाला ठाऊक आहे काय? मी विश्वास करतो, ते त्याद्वारे विस्मित झाले. त्यांना माहीत नव्हते; तेथे तो होता! ते फक्त थांबले.

245 का? ते काय आहे? आता, आपल्यातील कोणालाही ठाऊक नाही. परंतु, मी—मी तुम्हाला ते माझ्या—माझ्या प्रकटीकरणाद्वारे सांगणार आहे.

246 आणि, आता, माझा ओढा धर्मवेडा होण्याचा नाही. जर मी आहे, मी त्याविषयी अज्ञानी आहे, पाहा. मी...मी स्वतःला अशी हीन दृष्टी होणारा आणि काल्पनिक गोष्टी बोलणारा होऊ दिले नाही.

247 मी काही गोष्टी बोललो आहे, त्या कदाचित काही लोकांना विचीत्र प्रकारच्या वाटल्या असतील. परंतु जेव्हा परमेश्वर अवतीभोवती येतो, त्याचे समर्थन करतो, आणि ते सिध्द करतो आणि म्हणतो हे सत्य आहे, तेव्हा ते परमेश्वराचे वचन आहे. समजले ते कदाचित विचित्र वाटेल, त्या प्रकारे. पाहिले?

248 आणि, आता, जसा मी ह्या रात्री व्यासपीठावर उभा आहे, माझ्याकडे ते प्रगट केलेले प्रकटीकरण आहे. ते तिहेरी शैलीत आहे. ते मी, परमेश्वराच्या सहाय्याने, त्या घडीविषयी तुम्हाला सांगेन. आणि मग तुम्ही...आपण प्रथम, त्याकडे जाऊया. येथे ह्या प्रकटीकरणाची सुरुवात होते. जे काय आहे ते मी तुम्हाला सांगू इच्छितो. काय घडले, ते हे आहे...त्या सात मेघगर्जना ज्या त्याने गर्जना ऐकल्या, आणि ज्या लिहीण्यास मनाई करण्यात आली. तेच काय ते रहस्य आहे, ह्या सात सलग गर्जनेच्या मागे. [भाऊ ब्रॅन्हम खूप वेळा मंचावर ठोठावतात—सम्पा.]

249 आता, का? आपण ते सिध्द करुया. का? ते एक रहस्य आहे जे कोणीही जाणत नाही. योहानाला त्याविषयी लिहीण्यास मनाई केली होती, त्याविषयी चिन्हामध्ये लिहीण्यासही. का? हेच कारण आहे की तेथे स्वर्गात हालचाल—हालचाल नव्हती; तीने कदाचित रहस्य प्रगट केले असते. आता तुम्हाला ते समजले काय? [मंडळी म्हणते, “आमेन”—सम्पा.]

250 जर ते इतके महान आहे, तर ती समाविष्ट केली पाहीजे, कारण ती घडणारच होती. परंतु जेव्हा सात गर्जना...

251 आता लक्ष द्या. जेव्हा सात दूत त्यांची तुतारी वाजविण्यास पुढे आले, तेथे एक गर्जना होती. [भाऊ ब्रॅन्हम मंचावर एक वेळा ठोठावतात—सम्पा.] जेव्हा इस्त्राएल गोळा झाले, तेथे एक तुतारी वाजली. “जेव्हा आणखी समय असणार नाही.” शेवटची तुतारी, एक गर्जना.

252 परंतु येथे सात सरळ गर्जना, एका ओळीत: एक, दोन, तीन, चार, पाच, सहा, सात. ती परिपूर्ण संख्या. सात, गर्जनेने एका ओळीत, शब्द काढले, नाही...फक्त—फक्त एक, दोन, तीन, चार, पाच, सहा, सात. एका सरळ रेषेत. [भाऊ ब्रॅन्हम सात वेळा मंच ठोठावतात—सम्पा.] तेव्हा स्वर्ग त्या लिहू शकला नाही. स्वर्ग त्याविषयी काहीच जाणू शकला नाही. कारण तेथे काहीच हालचाल नव्हती. तो एक निवांत समय होता. तो इतका महान होता की, तो देवदूतांपासूनही गुप्त ठेवण्यात आला होता.

253 आता, का? जर सैतानाला ते कळले असते, तर त्याने कदाचित मोठी हानी केली असती. तेथे एक गोष्ट आहे, जी त्याला माहीत नाही. आता, तो कुठल्याही गोष्टीचा त्याला हवा तसा अनुवाद करु शकतो. आणि कुठल्याही प्रकारच्या दानाचे सोंग घेऊ शकतो. (माझी आशा आहे तुम्ही शिकत आहात.) परंतु तो हे जाणू शकत नाही. ते शब्दात देखिल लिहीलेले नाही. ते पूर्णतः रहस्य आहे.

254 देवदूत सर्व गोष्टी बंद होत्या. जर त्यांनी एखादी हालचाल केली, तर काही गोष्टी निघून गेल्या असत्या, म्हणून ते केवळ गप्प राहीले, वीणा वाजवणे बंद केले. सर्व गोष्टी थांबविल्या.

255 सात, देवाचा परिपूर्ण क्रमांक. [भाऊ ब्रॅन्हम मंचावर सात वेळा ठोठावतात—सम्पा.] अगदी एका रांगेत. सात मेघगर्जनांनी एकत्र शब्द उच्चारले, जणू काही ते काही गोष्टी लिहीत होते. लक्ष द्या, त्या समयी, योहानाने ते लिहीण्यास सुरुवात केली. त्याने म्हटले, "ते लिहू नको."

256 येशू त्याविषयी कधीच बोलला नाही. योहान ते लिहू शकला नाही. देवदूतांना त्याविषयी काहीच माहिती नाही. ते काय आहे? ही ती गोष्ट आहे, येशूने म्हटले, "अगदी स्वर्गातील दूतांनाही ठाऊक नाही." त्याविषयी काहीच नाही. पाहीले? समजले? त्याला स्वतःलाही ते ठाऊक नाही. म्हटले, "फक्त देवाला" ते ठाऊक असेल.

257 परंतु त्याने आपल्याला सांगितले आहे, जेव्हा आपण "ही चिन्हे घडताना पाहू." आता तुम्ही काहीतरी समजत आहात? [मंडळी म्हणते "आमेन"—सम्पा.] ठीक आहे. लक्ष द्या, आपण, "ही चिन्हे घडताना पाहण्यास सुरुवात करा." समजले?

जर सैतानाला ते कळले असते...

258 जर तुम्हाला काहीतरी घडावे असे वाटते...आता तुम्हाला ह्यासाठी माझे शब्द घ्यावे लागतील. जर मी काही गोष्ट करण्याची योजना करितो, मला त्याविषयी कोणाला सांगण्यापेक्षा अधिक ठाऊक आहे. असे नाही की ती व्यक्ती ते सांगेल, परंतु सैतान ती ऐकेल. समजले? त्याला ती प्राप्त होऊ शकत नाही, जोपर्यंत परमेश्वराने ती पवित्र आत्म्याने माझ्या अंतःकरणात बंद करुन ठेवली आहे, तर ती माझ्या व परमेश्वरामध्ये आहे. समजले? त्याला त्याविषयी काहीच ठाऊक नाही. जोपर्यंत तुम्ही ती बोलता, तेव्हा तो ती ऐकतो. आणि मी प्रयत्न केला...मी लोकांना सांगतो मी *अमुक—अमुक* गोष्ट करीन, आणि पाहा सैतान शक्य तितके प्रत्येक मार्ग कापून टाकतो, तेथे जाण्याकरिता, पाहा, माझ्यावर मात करण्यासाठी. परंतु जर मला प्रकटीकरण परमेश्वराकडून मिळते, आणि त्याविषयी काहीच बोलत नाही, तेव्हा ते वेगळे असते.

259 लक्षात ठेवा, सैतान नक्कल करण्याचा प्रयत्न करील. तो प्रत्येक गोष्टींची नक्कल करण्याचा प्रयत्न करतो. जी मंडळी करील. तो ते करण्याचा प्रयत्न करितो. आपण ते ख्रिस्तविरोधकाद्वारे पाहतो.

260 परंतु ही एक गोष्ट आहे. तो नक्कल करु शकत नाही. याची नक्कल होणार नाही, पाहा, कारण त्याला ते ठाऊक नाही. त्याला ते जाणण्याचा कोणताच मार्ग नाही. हे तिसरे आकर्षण आहे. त्याला त्याविषयी काहीच ठाऊक नाही. समजले? त्याला ते समजत नाही.

261 परंतु तेथे त्याखाली एक रहस्य दडलेले आहे! [भाऊ ब्रॅन्हम मंचावर एकदा ठोठावतात—सम्पा.] देवाला सर्वाधिक गौरव असो! मी माझ्या उर्वरित जीवनात तसा कधीच विचार करु शकत नाही, जेव्हा मी पाहीले. आता, मला ठाऊक नाही की काय... मला ठाऊक आहे की पुढची पायरी तेथे, परंतु मला ठाऊक नाही काय, त्याचा अनुवाद कसा करावा. ते अधिक लांब असणार नाही. जेव्हा ते घडले, मी येथे लिहून ठेवले आहे, जर तुम्ही हे पाहू शकता, "थांब, येथून आणखी पुढे जाऊ नको." मला धर्मांध होणे आवडत नाही. मी फक्त सत्य सांगत आहे.

262 परंतु तुम्हाला तो लहान बुट आठवतो, जो समजावण्याचा नेहमीच प्रयत्न केला आहे की तो जीव *नेहमीच* पुढे असतो, आणि आतील विवेक आणि सर्व त्याप्रकारच्या गोष्टी? ज्यामुळे ह्यानंतर नक्कल करणारा मोठा समुह बनण्याची सुरुवात झाली. कशाप्रकारे त्यांना लोकांचे हात पकडायचे आहेत, आणि लोकांना थांबवून ठेवायचे, आणि कंपन घ्यायचे आहेत? प्रत्येकाच्या हातात कंपन होत होते.

263 परंतु तुम्हाला लक्षात आहे, जेव्हा त्याने मला वर तेथे नेले आणि म्हटले, “हे ते तिसरे आकर्षण आहे, आणि कोणालाही ते कळणार नाही.” तुम्हाला ते लक्षात आहे? [मंडळी म्हणते, “आमेन”—सम्पा.] दृष्टांत कधीही अयशस्वी होत नाही. ते पूर्णतः सत्य आहेत.

264 आता लक्ष द्या. त्या नक्षत्रांच्या समुहाचा दृष्टांत लक्षात आहे का? चार्ली, मी...येथे तुम्ही आहात.

265 काहीतरी घडत आहे, मी तुम्हाला म्हटले, हा आठवडा, तुम्ही...हे सर्व तुमच्या सभोवती आहे, परंतु मला आश्चर्य वाटते की जर तुम्ही त्याकडे लक्ष दिले आहे.

266 त्या नक्षत्रांच्या समुहाची आठवण करा, तो देवदूतांचा दृष्टांत, जेव्हा मी ॲरिझोनास जाण्यास निघालो? [मंडळी म्हणते, “आमेन”—सम्पा.] तुम्हाला लक्षात आहे, *“महाशय, हा कोणता समय आहे?”* [“आमेन.”] तुम्हाला तो लक्षात आहे? पाहा, तेथे फक्त एक महान गर्जनेचा धमाका झाला, आणि सात देवदूत प्रगट झाले. ते बरोबर आहे? [“आमेन.”] एक गर्जनेचा धमाका, सात देवदूत प्रगट झाले.

> आणि *मी* कोकरा *पाहिला जेव्हा त्याने पहिला शिक्का फोडला, आणि मी ऐकले, ती एक मेघगर्जनेची वाणी होती, आणि चार प्राण्यांतील एकाने म्हटले, ये आणि पाहा.*

267 पाहा, एक मेघगर्जना, सात संदेश जे सीलबंद केलेले आहेत. आणि ह्या युगाच्या अंतिम दिवसापर्यंत प्रगट केले जाऊ शकत नाही. समजते मला काय म्हणायचे आहे? [मंडळी म्हणते, “आमेन”—सम्पा.]

268 आता, तुम्ही ह्या आठवड्याच्या रहस्यमय भागाकडे लक्ष दिले काय? हाच तो आहे. हाच आहे जो तो होता. तो कोणी मनुष्य नव्हता, एक—एक मनुष्य. तो प्रभूचा स्वर्गदूत होता. लक्ष द्या.

269 तेथे साक्षीदार आहेत, तीघे, येथे बसलेले आहेत, एका आठवड्याआधी, एक आठवड्यापेक्षा थोडे अधिक मी मागे पर्वतांमध्ये, मेक्सिको जवळ, दोन भावांबरोबर होतो जे येथे बसलेले आहेत. माझ्या पायांच्या विजारीला काटेरी फळ, किंवा काटेरी बीज मी काढीत होतो; आणि एक स्फोट झाला, जवळजवळ, असे भासले जणू काही, पर्वत हादरून खाली पडतील. आता, ते बरोबर आहे. मी माझ्या भावांना कधीच सांगितले नाही, परंतु त्यांना फरक जाणवला.

270 आणि त्याने मला म्हटले, “आता तयार हो. पूर्वेकडे जा. हा त्या दृष्टांताचा अर्थ आहे.” समजले? आता, तुम्ही समजून घ्या. की भाऊ सोथमन ज्या शिकारीमागे गेले होते ती मिळाली नाही. आम्ही ती त्याच्यासाठी मिळविण्यास प्रयत्न करीत होतो. आणि तो म्हणाला, “आता, ह्या रात्री, तुमच्यासाठी चिन्हादाखल, तो हे करीत नाही. ह्यासमयी तुला ह्या स्वर्गदूतांच्या भेटीकरिता पवित्र झाले पाहीजे.” आणि तुम्हाला आठवते, मला स्वतःला वेगळा अनुभव आला.

271 आणि मी पश्चिमेला होतो. ते स्वर्गदूत पूर्वेकडून येत होते. आणि जसे ते आले, मी त्यांच्याबरोबर उचलल्लो गेलो, (तुला ते आठवते?) पूर्वेकडून येत होते. [मंडळी म्हणते, “आमेन”—सम्पा.]

272 आणि भाऊ फ्रेड, आज रात्री. येथे, साक्षीला आहेत, आणि भाऊ नॉर्मन. जसे आम्ही खाली गेलो, मी जवळजवळ त्या मनुष्याला पटवले की त्याने तेथे राहावे आणि शिकार करावी. भाऊ सॉथमन, हे बरोबर आहे का? [भाऊ फ्रेड सॉथमन “आमेन”—सम्पा.] होय, तेथे, उभे आहेत. मी पटवले; परंतु, तरीही, त्याने म्हटले, “तो ते करणार नाही.” मी कधीच काही सांगितले नाही; निघून गेलो.

273 तंबूच्या बाजूला कोणीतरी बसले होते. त्या दिवशी...भाऊ सॉथमन, तुम्हाला आठवते. आणि मी, जसे काहीतरी सांगितले जात होते, की मी तुला आणि भाऊ नॉर्मन... भाऊ नॉर्मन कुठे आहे? तेथे मागे. त्यांना शपथ घेण्यास लावली की जे काही घडत आहे त्याचा उल्लेख ते करणार नाहीत. हे बरोबर आहे? [भाऊ म्हणाले, “आमेन. ते सत्य आहे.”—सम्पा.] काय मी वळून *ह्याप्रकारे* तंबूतून बाहेर गेलो? हे बरोबर आहे? [“ते बरोबर आहे.”]

274 कारण, हे तसेच आहे जे काही होते, अगदी तसेच जे काही होते, आणि जाऊन की जोपर्यंत हे घडत नाही मी ते सांगू शकत नाही, पाहा, लोक हे समजतील.

275 आणि काय तुम्ही लक्ष दिले काय? “तो एक स्वर्गदूत,” मी म्हणालो, “त्यांच्यात, एक स्वर्गदूत वेगळाच होता.” तो त्यांच्यातल्या इतरांपेक्षा बराचसा माझ्यासारखा दिसत होता. तुमच्या ते लक्षात आहे काय? [मंडळी म्हणते “आमेन”—सम्पा.] ते एका समुहात होते; तीन एका बाजूला, आणि एक वर. आणि एक अगदी येथे माझ्या बाजूला होता, डावीकडून उजवीकडे मोजले तर, तो सातवा स्वर्गदूत असेल. तो अधिक तेजस्वी होता, इतरांपेक्षा माझ्यासाठी अधिक अर्थपूर्ण होता. तुम्हाला आठवते? मी म्हणालो, “त्याची छाती *अशाप्रकारे* बाहेर होती, आणि पूर्वदिशेस उडत होता.” (तुम्हाला आठवते.) “अशाप्रकारे” मी म्हणालो, “त्याने मला वर उचलले; मला वर उचलले” तुम्हाला ते आठवते? [“आमेन.”]

276 येथे ते आहे, एक सातव्या शिक्क्यासह, एक गोष्ट जिच्यासाठी मी माझ्या संपूर्ण जीवनभर आश्चर्य करीत आहे. आमेन! इतर शिक्केही माझ्यासाठी खूप महत्त्वाचे आहेत. अर्थात, परंतु, ओह, तुम्हाला ठाऊक नाही की हा माझ्यासाठी किती महत्त्वाचा आहे, जीवनांतील एक वेळा! [भाऊ ब्रॅन्हम मंचावर खूप वेळा ठोठावतात—सम्पा.]

277 मी प्रार्थना केली, मी देवाला आरोळी मारली. मी—मी—मी...त्या फोनिक्स सभेनंतर...जे लोक, माझ्याबरोबर होते, त्यांना ठाऊक आहे. मी पर्वतांमध्ये होतो.

278 एके सकाळी, मी उठलो आणि सबीनो कनान येथे वर गेलो, ते मोठे, खडकाळ. उंच पर्वत. आणि मी तेथे वर गेलो. आणि तेथे एक लहानशी पाऊलवाट होती, ती संपल्यावर, लेमॉन पर्वतावर जा, जो तीस मैलाचा मार्ग आहे, तेथे सुमारे तीस फुट बर्फ होता. म्हणून पर्वतावर, अगदी पहाटे, दिवस उजाडण्याअगोदर, ह्या लहानशा पाऊलवाटेमधून वर जाताना, गोलाकार खडकांमधून. मला *त्या* मार्गाने जाण्याचा प्रेरणेचा अनुभव झाला. आणि मी वळलो, आणि वर काही मोठ्या, दातेरी खडकांमध्ये, अरे, बापरे, शेकडो फूट उंच.

279 आणि मी त्या खडकांमध्ये खाली गुडघे टेकले. मी *हे* बायबल खाली ठेवले आणि हे पुस्तक खाली ठेवले...*ते* लहान टॅबलेट. [भाऊ ब्रॅन्हम त्याचे बायबल आणि टॅबलेट

दाखवितात—सम्पा.] मी म्हणालो, “प्रभू परमेश्वरा, ह्या दृष्टांताचा अर्थ काय आहे? मी—मी—मी...प्रभू, ते...ह्याचा अर्थ माझा मृत्यु आहे काय?”

280 तुम्हाला आठवते, मी तुम्हाला म्हटले, “मला वाटले कदाचित त्याचा अर्थ कदाचित माझा मृत्यु असेल, कारण असा काही स्फोट झाला की, त्याने मला तुकड्यांमध्ये हादरुन टाकले.” तुम्हाला ते आठवते. किती जणांना ते माहीत आहे, ह्याविषयी ऐकले आहे? [मंडळी म्हणते, “आमेन”—सम्पा.] का, निश्चित, तुम्ही सगळ्यांनी पाहिले आहे. आणि मला वाटले त्याचा अर्थ माझा मृत्यु असू शकतो.

281 आणि मग खोलीमध्ये, मी म्हणालो, “हे...प्रभू हे काय—काय—काय होते? ह्याचा काय—काय अर्थ आहे? ह्याचा अर्थ असा आहे की मी मरणार आहे? जर असाच आहे, ठीक आहे, मी माझ्या कुटूंबाला सांगणार नाही. पाहा, जर माझे कार्य संपले असेल, तर मला जाऊ दे.” आणि मी म्हणालो...

282 आता, ते काय होते? परंतु त्याने एक साक्षीदार परत पाठवला, तुम्हाला आठवते की मी तुम्हाला सांगत होतो, की ते तसे नव्हते. त्याचा अर्थ माझ्या कार्याचा पुढील भाग होता. ओह, ओह, ओह! तुम्हाला ते समजले? [मंडळी म्हणते, “आमेन”—सम्पा.] समजले? आणि वर सबीनो कनानमध्ये बसलो होतो...

283 स्वर्गीय पिता हे जाणतो. इतके खरे जसे तुम्ही ते घडताना पाहत आहात, ते स्वर्गदूत थेट खाली आले आणि प्रत्येक संदेशाला सत्य प्रमाणित केले. तेव्हा, तुम्हाला समजते की ते देवापासून आले आहे, किंवा नाही. ते, तुम्हाला दृष्टांताद्वारे अगोदरच सांगितले होते. मी तुम्हाला ते सभा समाप्त होईपर्यंत सांगू शकत नव्हतो, कारण मला तसे करण्यास मनाई केली होती.

284 सबिनो कनानमध्ये, त्या सकाळी वर बसलेलो असता, माझे हात वर होते. आणि माझी...वाऱ्याने माझी जूनी काळी टोपी खाली पडली होती. जेव्हा...मी तेथे माझे हात वर करुन, प्रार्थना करीत उभा होतो. मी म्हणालो, “प्रभू परमेश्वरा, ह्याचा अर्थ काय आहे? प्रभू, मी ते समजू शकत नाही. मला काय करावे लागेल? जर ही माझी घरी—जाण्याची वेळ आहे, तर येथे वर मला जाऊ दे, जेथे त्यांना मी कधीच सापडणार नाही. जर मी जात आहे, तर माझी इच्छा नाही की कोणीही माझ्या सभोवती शोक करावा. माझी—माझी इच्छा आहे की माझ्या कुटूंबाला फक्त वाटावे की मी फक्त फिरण्यासाठी गेलो आहे. आणि ते मला शोधणार नाही. मला कुठेतरी लपव. जर मी निघून जात असेन, का बरे, मला जाऊ दे. कदाचित जोसेफला कधी एके दिवशी माझे बायबल येथे पडलेले सापडेल, आणि त्याला ते वापरू दे. पहा, प्रभू जर मी दूर जाणार आहे, मला जाऊ दे.” आणि माझे हात पसरलेले होते. आणि एकदम अचानक, काहीतरी माझ्या हातात पडले.

285 मला माहीत नाही. मी सांगू शकत नाही. मी झोपी गेलो का? मला ठाऊक नाही. मी गाढ तंद्रीत गेलो का? मला ठाऊक नाही. तो दृष्टांत होता का? मी तुम्हाला सांगू शकत नाही. फक्त एकच गोष्ट सांगू शकतो ती मी...तसेच जसे ते स्वर्गदूत होते!

286 आणि ती माझ्या हातावर आदळली. आणि मी पाहिले, आणि ती तलवार होती. आणि तिची मूठ मोत्याची होती, खरोखर सुंदर आणि त्यावर एक सोन्याचे रक्षक आवरण होते. आणि तिचे पाते काही क्रोमीयमसारखे, चांदीसारखे दिसत होते, ती अगदी चमकदार होती. आणि ती एकदम खूप धारदार होती, अरे, बापरे! आणि मी विचार केला, “की ती सर्वात सुंदर गोष्ट आहे की नाही!” माझ्या हातात बरोबर बसली! मला वाटले, “ती फारच सुंदर आहे.” परंतु, मी म्हणालो, “अरे, मला नेहमीच अशा गोष्टींची भीती वाटते, एक तलवार.” मी विचार केला, “मी तिच्याबरोबर काय करणार?”

287 आणि तेव्हाच तेथे एक वाणी त्यामधून आली जिने त्या खडकांना हालविले. म्हणाली, “ती राजाची तलवार आहे!” आणि मग मी त्यांतून बाहेर आलो.

288 “मोठ्या राजाची तलवार.” आता, जर ती म्हणाली, “एका राजाची तलवार...” परंतु ती म्हणाली, “मोठ्या राजाची तलवार.” आणि तेथे फक्त एकच “मोठा राजा” आहे. आणि तो परमेश्वर आहे. आणि त्याच्याकडे एकच तलवार आहे, ती त्याचे वचन आहे, ज्याद्वारे मी जगतो. म्हणून, परमेश्वरा, मला सहाय्य कर. येथे त्याच्या पवित्र वेदीवर, ह्या पवित्र वचनासह येथे उभे असता! हे वचन आहे! आमेन! अहाहा, कोणत्या दिवसात आपण राहत आहोत! किती महान गोष्ट आहे! ते रहस्य आणि गुपित पाहा? हे तिसरे...

289 जेव्हा त्याने मला सोडले मी तेथे उभा होतो, कुठली गोष्ट माझ्यापाशी आली, आणि म्हणाली, “भिऊ नकोस.” आता मी कुठलीही वाणी ऐकली नाही. जसे काही माझ्या आतून, बोलली. मला तुम्हाला फक्त सत्य सांगायचे आहे, फक्त तंतोतंत काय घडले. काहीतरी आदळले, आणि म्हणाले, “भिऊ नकोस. हेच ते तिसरे आकर्षण आहे.”

290 तिसरे खेचणे! तुम्हाला ते लक्षात आहे? [मंडळी म्हणते, “आमेन.”—सम्पा.] त्याने म्हटले, “तुमच्याकडे ह्यावर कितीतरी नक्कल मारणारे होते. ज्याचे स्पष्टीकरण देण्याता तू प्रयत्न केला. परंतु,” म्हणाला, “ह्यासाठी प्रयत्न करु नको.” तुम्हाला ते लक्षात आहे? किती जणांना तो दृष्टांत लक्षात आहे? [“आमेन.”] का, तो पूर्ण झाला आहे. तो ध्वनीमुद्रीत आहे आणि सर्वत्र आहे. ही अंदाजे सहा, सात वर्षांअगोदरची गोष्ट आहे. सात वर्षांआधी म्हणाली, “त्याचे स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न करु नको.” म्हणाली, “हे तिसरे आकर्षण आहे, परंतु मी तुला तेथे भेटेन.” ते बरोबर आहे? [“आमेन”] त्याने म्हटले, “प्रयत्न करु नको...”

291 मी एका—एका लहान मुलाच्या बुटासह उभा होतो, जेव्हा त्याने मला म्हटले. म्हणाला, “आता तुझे पहिले आकर्षण पाठव आणि जेव्हा तू ते पाठवतो, मासे त्या आमिषामागे धावतील.” म्हणाला, “मग तुझे दुसरे आकर्षण पाहा,” म्हणाला, “कारण ती फक्त एक लहानशी मासळी आहे.” तो म्हणाला, “नंतर तीसरे आकर्षण ते पकडील.”

292 आणि ते सर्व सेवक माझ्यासभोवती जमा झाले, म्हणाले, “भाऊ ब्रॅन्हम, आम्हाला ठाऊक आहे तू ते करु शकतो! हालेलुयाह! भाऊ ब्रॅन्हम!” येथेच जेथे मी नेहमी बांधला जातो, प्रचारकांच्या समुहाबरोबर. समजले? मी लोकांवर प्रेम करतो. त्यांची इच्छा असते की तुम्ही सर्वगोष्टी समजाव्या, *हे*, *ते*.

293 आणि मी म्हणालो, “ठीक, होय, होय, हो,” मी म्हणालो, “मला ठाऊक नाही.” मी म्हणालो, “मला मासे पकडणे समजले आहे. आता,” मी म्हणालो, “आता पहिली गोष्टी तुम्ही करा...हीच पध्दत आहे जी केली गेली आहे. तुम्ही सर्व मासे सभोवती पाहता, तुम्हाला आमिष दाखवावे लागते.” अच्छा तीच तर मासे पकडण्याची खरी युक्ती आहे. म्हणून मी म्हणालो, “आमिषाला झटका मारतो. आता, तुम्हाला समजले, जेव्हा मी आमिषाला झटका मारतो. पहिल्या वेळेस, आता मासळी त्याच्या मागे येते.” परंतु ते थोडेसे होते. आणि ती तशीच होती जसे ते पकडीत होते.

294 म्हणून मग मी—मी म्हणालो, “मग तुम्ही—तुम्ही व्यवस्थित कराल...” आणि मी झटक्याने तिला बाहेर किनाऱ्यावर काढले आणि माझ्याकडे एक मासळी होती, परंतु ती अशी दिसत होती जणू काही काट्यावर लावलेले मांस, ती फक्त...ती इतकी लहान होती.

295 आणि तेव्हा मी तेथे उभा होतो, आणि कोणीतरी म्हणाले, “मी तुला सांगितले की ते करु नकोस!”

296 मी रडू लागलो. सर्व दोरी *अशा* प्रकारे माझ्या सभोवती गुंतली होती. आणि मी...तेथे उभा राहून, *अशा* प्रकारे माझे डोके खाली करुन रडत होतो. मी म्हणालो, “परमेश्वरा! ओह, मी...मला क्षमा कर! मी—मी एक मुर्ख मनुष्य आहे. प्रभू,...मला क्षमा कर.” आणि मी—मी माझ्याजवळ ही दोरी होती.

297 आणि हेच ते माझ्या हातात, एका लहान बाळाचे बूट होते, जवळ—जवळ *इतके* लांब. आणि माझ्याकडे ती दोरी होती, जी अंदाजे माझ्या बोटाएवढी जाड, जवळजवळ अर्धा इंच. आणि ह्या बुटाला अंदाजे...एक सोळा अंश अंदाजे एक—एक इंच, लहान भोक होते. आणि मी त्या लहान बूटाला ती दोरी घालण्याचा प्रयत्न करीत होतो, ह्या मोठ्या इंचाच्या दोरीने. ओह!

298 एक वाणी, म्हणाली “तू पेंटेकॉस्टल बालकांना ह्या अलौकीक गोष्टी शिकवू शकत नाही.” म्हणाली, “आता, त्यांना सोडून दे!”

299 आणि तेव्हाच त्याने मला वर उचलले. त्याने मला वर घेतले, आणि उंचावर बसविले. जेथे एक सभा चालू होती. एका तंबूसारखी, किंवा एका आराधनालयासारखे दिसत होते. आणि मी पाहिले, आणि तेथे एक लहानशी पेटी होती, आत एक लहान जागा होती. आणि मी पाहिले की तो प्रकाश, माझ्यावर कोणाशी बोलत होता, तो प्रकाश जो तुम्ही तेथे त्या फोटोत पाहता. तो माझ्यापासून भूर्रकन दूर निघून गेला, *अशा* प्रकारे आणि तंबूवर गेला. आणि म्हणाला, “मी तुला तेथे भेटेन.” आणि म्हणाला, “हे तीसरे आकर्षण असेल, आणि तू ते कोणालाही सांगणार नाहीस.”

आणि सबीनो कनानमध्ये, तो म्हणाला, “हे तीसरे आकर्षण आहे.”

300 आणि तेथे तीन महान गोष्टी आहेत ज्या त्या बरोबर जातात. आणि एक आजच उघडली आहे...किंवा काल, दूसरी आज उघडली आहे, आणि तेथे एक गोष्ट आहे ज्याचा अर्थ मी सांगू शकत नाही, कारण ती एका अज्ञात भाषेत आहे. परंतू मी तेथेच उभा राहिलो आणि त्याकडे पाहत होतो. आणि हे तीसरे आकर्षण येत आहे. [भाऊ ब्रॅन्हम तीन वेळा मंचावर ठोठावतात—सम्पा.] आणि परमेश्वराचा पवित्र आत्मा...अरे, बापरे!

हेच कारण आहे सर्व स्वर्ग शांत होता.

301 आता, मी—मी येथेच थांबतो, समजले. मला—मला असे वाटते, त्याविषयी अधिक बोलू नये. समजले?

302 म्हणून, फक्त लक्षात ठेवा.सातवा शिक्का, ह्या कारणामुळेच उघडला नव्हता. [भाऊ ब्रॅन्हम मंचावर. सहा वेळा ठोठावतात—सम्पा.] समजले, हेच कारण आहे. त्याने ते प्रगट केले नाही, कोणालाही त्याविषयी कळू नये.

303 आणि मी तुम्हास सांगू इच्छितो, मला ह्या वचनाविषयी काहीही जाणण्याअगोदर, हा दृष्टांत वर्षांअगोदर आला होता. तुम्हाला ते लक्षात आहे? [मंडळी म्हणते, “आमेन.”—सम्पा.] आणि ते असेच येथे आहे, जसे ते दुसऱ्या ठिकाणी वचनामध्ये तंतोतंत बसते. [भाऊ ब्रॅन्हम मंचावर दोन वेळा ठोठावतात.]. आणि परमेश्वर माझे हृदय जाणतो, मी कधीच अशा गोष्टीविषयी विचार केला नव्हता, आणि ती येथे होती. ती आपल्या विचारांअगोदर आहे. होय. अरे, बापरे!

304 हे असे दर्शविते की हा दृष्टांत परमेश्वरापासून होता, कारण पाहा, तो अंतिम संदेशाशी परमेश्वराच्या अभिवचनाशी तंतोतंत जुळतो. तुम्ही लक्ष द्या. आता लक्ष द्या. अंतिम समयाच्या संदेशासाठी, हा शिक्का. अखेर, त्याने—त्याने सर्व सहा शिक्के प्रगट केलेले आहेत, परंतु त्याने सातव्या शिक्क्याबद्दल काहीच सांगितले नाही. आणि हा शेवटचा

समयाचा शिक्का, जेव्हा त्याची सुरुवात होते, बायबलप्रमाणे, तो जाणण्याअगोदर, पूर्णतः गुप्त असेल. आणि लक्षात ठेवा, प्रकटीकरण 10:1—7, 1—10, अध्याय 10:1 ते 7, “सातव्या देवदूताच्या संदेशावेळी, परमेश्वराची सर्व रहस्ये प्रगट केली जातील.” आपण अंतिम समयात आहोत, सातवा शिक्का उघडण्याच्या समयात.

305 आता, मला कसे कळले? त्यादिवशी, मागील रविवारी, आजपासून एक आठवड्याआधी, जेव्हा मी ह्यावर प्रचार करीत होतो. “नम्र व्हा! नम्र व्हा! लक्षात ठेवा परमेश्वर छोट्या गोष्टींमध्ये व्यवहार करतो.” मला समजले नाही की तो वास्तवात कशाविषयी बोलत आहे. आणि आता मी ते समजत आहे. तो इतका नम्रतेचा मार्ग आहे! तुम्हाला वाटेल की अशाप्रकारची गोष्ट वॅटीकनमध्ये प्रगट केली जाईल किंवा...परंतु ती योहान बाप्तिस्मा देणाऱ्याकडे येते. ती आमच्या प्रभूच्या जन्मासारखी येते, एका गोठ्यात. परमेश्वराला गौरव असो! म्हणून माझे सहाय्य कर, वेळ जवळ आहे! आमेन. आपण येथे आहोत. अरे, बापरे!

306 आता काय तुम्ही परमेश्वराच्या दृष्टांताचे सत्य, समजत आहात, जे सात स्वर्गदूत पश्चिमेकडून मजकडे घेऊन येत आहेत? ते पश्चिमेकडून येत होते, पूर्वेकडून परत येत होते, ह्या संदेशास आज रात्री येथे आणण्यासाठी. [भाऊ ब्रॅन्हम मंचावर दोनदा ठोठावतात.—सम्पा.] अरे बापरे!

307 आता, त्या महान गर्जनेचा शब्द, आणि मिशन जे येथे आणले गेले, प्रगट केले गेले, ते...आणि सिध्द केले गेले की ते परमेश्वराचे आहे. आता फक्त विचार करा. मला हे शिक्के ठाऊक नव्हते, आणि हे ह्याच आठवड्यात प्रगट केले गेले. काय कोणी ह्यावर विचार केला होता, की सात स्वर्गदूत येण्याद्वारे, एक संदेश जो पुढे येणार होता, ते स्वर्गदूत त्यासाठी मला येथे परत घेऊन आले? समजले?

308 लक्षात ठेवा, तो सातवा संदेशवाहक...तो सातवा संदेशवाहक...तो सातवा स्वर्गदूत माझ्यासाठी महत्त्वपूर्ण होता, तो इतर कोणापेक्षा बराचसा माझ्यासारखा भासत होता. आता, पाहा, ते *अशा* प्रकारे उभे होते. आता, आम्ही फक्त इच्छितो की तुम्ही लक्ष द्यावे. आणि मी *येथे* उभा होतो, आणि मी त्या दुसऱ्यांना पाहात होतो...

309 पाहा, एक, पहिला समुह, त्या छोट्या पक्ष्यांचा, जे खालच्या बाजूला पंख मारीत होते. तुमच्या ते लक्षात आहेत? आणि ते सर्व पूर्व दिशेला उडून गेले. आणि दूसरा समुह, अधिक प्रकाशमय मोठ्या पक्ष्यांचा, कबुतरासारखा दिसत होता, तीक्ष्ण पंखांचा. ते पूर्व दिशेला उडले. पहिले आकर्षण, दुसरे आकर्षण, नंतर स्वर्गदूत होते. आणि जसे...

310 मी तेथे उभा होतो, आणि तो स्फोट झाला. आणि मी *ह्या* दिशेला पाहत होतो, पश्चिमेकडे, आणि ते आले आणि मला वर त्यांच्यामध्ये उचलले. माझे भान हरपले. आणि त्यांच्यातील एक येत होता, एक होता जो मला दिसण्यात खूप वेगळा दिसला, तो माझ्या...डाव्या बाजूस होता, जेथून मी त्या समूहात प्रवेश केला. परंतू डावीकडून उजवीकडे मोजले असता तो सातवा स्वर्गदूत असेल, समजले आता, लक्षात ठेवा, सात संदेशवाहक.

311 काय तुम्हाला ज्युनियर जॅकसनच्या स्वप्नातील पांढऱ्या खडकांचे पिरॅमिड ज्याचा अर्थ मी तुम्हाला सांगितला होता लक्षात आहे? [मंडळी म्हणते, “आमेन”—सम्पा.] समजले? लक्ष द्या, त्या रात्री जेव्हा मी, गेलो, आणि मी...तेथे सहा स्वप्न पडले आणि त्यांच्यातील प्रत्येक स्वप्न स्पष्टपणे एकच गोष्ट दाखवीत होता. मग दृष्टांताची सुरुवात झाली, आणि मला पश्चिमेकडे पाठवले. आणि, ज्युनियर, जेव्हा तो पाहात होता...लक्ष द्या, पाहा. किती परिपूर्ण!

312 आता मी—मी आशा आणि विश्वास करतो की तुम्हा लोकांना समजले की मी ही कृपा येशू ख्रिस्तावर टाकण्याचा प्रयत्न करीत आहे, जो ह्या सर्वांचा लेखक आहे. आणि हेच एक कारण आहे की तुम्ही तुमच्या जीवनात असे बोलताना मला ह्यापुर्वी कधीच ऐकले नाही, परंतु हा समय जवळ येत आहे. समजले? समजले? लक्ष द्या.

313 आता हे तुम्हाला निश्चित करण्यासाठी, ह्यासाठी की ते तुमच्या आत खोल बसू शकेल. मी तुम्हाला पुन्हा सोडण्याकरीता ठरवीत आहे. मला ठाऊक नाही. मी कुठे जाणार. मी शुभवर्तमान इतर जागी प्रचार केले पाहीजे. परंतु आता, की...

314 तुम्ही कदाचित म्हणाल, “मी अशाप्रकारची सर्व धर्मांधता ऐकली आहे.” मला ठाऊक नाही काय; मी कोणा इतर मनुष्याचा न्याय करु शकत नाही.

315 मला फक्त देवाला माझ्यासाठी उत्तर द्यायचे आहे...माझ्यासाठी. परंतु ह्या सर्व वर्षांमध्ये, मी कधी एका वेळेस तरी प्रभूच्या नावात काही तुम्हाला सांगितले काय जे बरोबर नव्हते? [मंडळी म्हणते, “नाही.”—सम्पा.] कोणीही इतर तसे सांगू शकत नाही, कारण मी सदैव तुम्हाला तसे सांगितले जसे त्याने मला सांगितले.

316 आता मला तुम्हाला दाखवू द्या की हे तंतोतंत सत्य आहे, आणि खात्री करा.

317 आता लक्षात ठेवा, “जर तेथे कोणी आत्मिक किंवा एखादा संदेष्टा असेल, मी प्रभू त्याच्याशी दृष्टांतांतून बोलतो, आणि त्याला स्वप्नांद्वारे प्रगट करतो.” “स्वप्नांचा अर्थ सांगतो.” योसेफ, तो स्वप्नांचा अर्थ सांगू शकत होता, आणि बोलू आणि—आणि दृष्टांत पाहू शकत होता. हे बरोबर आहे काय? [मंडळी म्हणते, “आमेन.”—सम्पा.]

318 आता ह्याकडे लक्ष द्या. की आता जेव्हा हे घडले ज्युनियर एका मैदानात उभा होता, जेथे एक—एक मोठे पिरॅमिड होते, अशाप्रकारे. आणि तेथे खडकावर काहीतरी लिहीले होते, आणि मी ते लोकांना प्रगट करत होतो. ज्युनियर, हे बरोबर आहे काय? [भाऊ ज्युनियर जॅक्सन म्हणाला, “ते बरोबर आहे.”—सम्पा.] जवळ जवळ एका वर्षाअगोदर ते घडले.

319 आणि आता पुढच्या गोष्टीवर लक्ष द्या. मी एक प्रकारचे अस्त्र घेतले. आणि त्याला कापले, आणि त्याच्या आत पांढरा खडक होता. ज्यावर काहीच लिहीले नव्हते. आणि, त्या वेळेस, मी पश्चिमेकडे जाण्यास सुरुवात केली. आणि मी त्या सर्वांना सांगितले, मी म्हणालो, “पश्चिमेला जाऊ नको. येथे थांब आणि मी येईपर्यंत ह्यावर पाहा.” पश्चिमेला स्फोटसाठी गेलो, पूर्वेकडे पवित्र आत्म्याद्वारे अनुवाद केलेल्या ह्या अलिखित वचनासह परत आला. आता, जर हा परिपूर्ण सर्वशक्तिमान परमेश्वर नाही, तर माझी इच्छा आहे की तुम्ही हे जाणून घ्या की हे काय आहे.

320 मित्रांनो, मी हे काय सांगण्याचा प्रयत्न करीत आहे? तुम्हाला हे दाखविण्यासाठी की आपण अंतिम समयात आहोत. आता, जर ते इतर पूर्णत: वचनावर आधारित आहे, म्हणून हे ही पूर्णतः वचनाच्या बिंदूवर आहेत! आम्ही येथे आहोत! मित्रांनो आपण अंतिम समयात आहोत.

321 लवकरच असे होईल, “समय निघून गेला आहे.” लाखो त्यांचे जीव गमावतील. लाखो, जे आता विश्वास करतात की ते वाचलेले आहेत, ते त्या आण्विक युगात चारा म्हणून गणले जातील. आपण अंतिम घडीत राहत आहोत. सर्वशक्तिमान परमेश्वराच्या कृपेने, त्याच्या लोकांना केलेल्या त्याच्या सहाय्यामुळे, की ते कदाचित प्रगट होणाऱ्या ख्रिस्ताला सामोरे जाण्यासाठी वाट पाहत आहेत! “किती वेळ, भाऊ ब्रॅन्हम?” कदाचित वीस वर्ष; कदाचित पन्नास वर्ष; कदाचित शंभर वर्षात. मला ठाऊक नाही. आणि

कदाचित ह्या सकाळी; कदाचित ह्या रात्री. मला ठाऊक नाही. आणि जर कोणी सांगतात की त्यांना ठाऊक आहे, ते चुकीचे आहेत. समजले? त्यांना ठाऊक नाही. फक्त, परमेश्वरच, जाणतो.

322 आता लक्ष द्या. म्हणून मला परमेश्वराकडून सहाय्य मिळू दे, मी सत्य सांगतो, की हे मला आत्मिकरित्या प्रगट झाले आहे, पवित्र आत्म्याद्वारे प्रगट झाले आहे. आणि, त्यांतील प्रत्येकाने, पवित्र शास्त्रात त्याचे स्थान ओळखले आहे.

323 आता, त्या शिक्क्याखाली कोणते महान रहस्य दडलेले आहे, मला ठाऊक नाही. मला ते ठाऊक नाही. मी ते समजू शकत नाही. मी ते सांगू शकलो नाही, की ते काय आहे ते त्याने काय—त्याने काय सांगितले, परंतु मला ठाऊक आहे की त्या सात गर्जना होत्या, ज्या एकत्रितरित्या उच्चारित होत्या फक्त सात वेगवेगळ्या वेळेला मोठा आवाज झाला. आणि ते कुठल्या दुसऱ्या गोष्टीत प्रगट झाली हे मी पाहिले तेव्हा, जेव्हा मी ते पाहिले, मी अनुवादासाठी वाट पाहिली. ते तेथून उडले, आणि मला ते समजू शकले नाही. ते अगदी बरोबर आहे. समजले? अजून त्यासाठी योग्य समय आलेला नाही.

324 परंतु, ते एका चक्रात चालत आहे, समजले. ते जवळ येत आहे. म्हणून, तुमच्यासाठी ही गोष्ट करणे आहे की लक्षात ठेवा की मी तुमच्याशी प्रभूच्या नावाने बोलत आहे. तयार राहा, कारण तुम्हाला ठाऊक नाही की कोणत्या समयी काय होईल.

325 आता, जेव्हा हे टेप होते, जे ते आहे, ते कदाचित माझ्या दहा हजार मित्रांना मजपासून दूर करील. कारण, ते म्हणणार आहेत की, "भाऊ ब्रॅन्हम त्याला स्वतःला, देवासमोर एक—एक सेवक किंवा एक संदेष्टा, किंवा काहीतरी बनविण्याचा प्रयत्न करीत आहे." माझ्या बंधूंनो मला तुम्हाला सांगू द्या, की ती एक चूक आहे.

326 मी तुम्हाला फक्त सांगत आहे. मी पाहीले आणि जे मला सांगण्यात आले. आणि आता तुम्ही—तुम्ही तुम्हाला जे वाटते ते करता. मला माहीत नाही कोण जाणार आहे... काय घडणार आहे. मला ठाऊक नाही. मला फक्त ठाऊक आहे की त्या सात गर्जनांमध्ये ते रहस्य दडलेले आहे. स्वर्गात निवांत होता. सर्वांना समजले? [मंडळी म्हणते "आमेन"—सम्पा.] तो समय असू शकतो. ती घडी आता असू शकते, की तो महान पुरुष जो दृश्यात येण्याची आपण अपेक्षा करतो तो दृश्यात येऊ शकतो.

327 कदाचित ही सेवकाई, की मी लोकांना पुन्हा वचनाकडे नेण्याचा प्रयत्न करीत आहे, तिचा पाया घातला गेला आहे; आणि जर तो घातला आहे, मी तुम्हाला भल्यासाठी, सोडत आहे. तेथे आपण दोघे एका वेळी एकत्र असू शकत नाही. समजले? जर तसे आहे, तो वाढेल; मी घटेन. मला ठाऊक नाही.

328 परंतु मला परमेश्वराद्वारे विशेष अधिकार दिला गेला आहे, की पहावे आणि समजावे की ते काय होते, पाहा, पाहिले ते प्रगट करावे. आता, तेच सत्य आहे.

329 आणि माझी खात्री आहे की तुम्ही ह्या गोष्टींकडे लक्ष दिलेले आहे ज्या ह्या आठवड्यात घडत आहेत. माझी खात्री आहे की तुम्ही त्या लहान कॉलीन्स मुलाला जे तेथे पडलेले, मरताना त्या रात्री पाहिले असेल; ती लहान, कर्करोग झालेली मुलगी.

330 देवाचे राज्य येत आहे. आणि ते नकारात्मकतेतून सकारात्मककतेकडे अधिक येताना दिसत आहे, जसे ते होत आले आहे. आता, त्याने लोकांचा गळा दाटून न येवो. न्यायीकरणातून, पवित्रीकरणाकडे, पवित्र आत्माच्या बाप्तिस्म्याकडे, आणि मग *येथे*, *येथे* समजले? आपण अगदी सर्व समयी, परमेश्वराच्या जवळ येत आहोत.

331 मेथडीस्ट सेवकांनो, तुम्ही पाहू शकत नाही काय, की तुमचा पवित्रीकरणाचा संदेश लुथरने केलेल्या प्रचारापेक्षा कसा उच्च आहे?

332 तुम्ही पेंटेकॉस्टलहो, काय तुम्ही समजू शकत नाही की तुमचा बाप्तिस्म्याचा संदेश मेथडीस्ट प्रचाराच्या पलिकडे आहे? तुम्हाला समजतेय मला काय म्हणायचे आहे?

333 होय, आपल्याकडे खूप गोष्टी पुढे जाण्याकरिता आहेत! आणि ते बरोबर आहे. आणि जर तेथे कोणी आहेत जे चुकीचा तिरस्कार करतात, आणि लोक अशा काही गोष्टी सांगतात ज्या वास्तविक खोट्या आहेत आणि सत्य नाहीत, मी त्याचा तिरस्कार करतो.

334 परंतु मी—मी विश्वसनीय सत्यावर प्रेम करतो, ह्याची काही पर्वा नाही की *ते* ह्या प्रकारे किंवा *त्या* प्रकारे किती अडथळे करते. जर ते सत्य आहे, परमेश्वर शेवटी प्रगट करील की ते सत्य आहे. आणि जर तो तसे करीत नाही. लवकरच येणाऱ्या दिवसांमध्ये, तर माझा दृष्टांत खरा नव्हता. आता तुम्ही पाहा की मी स्वतःला कोठे ठेवले आहे.

335 "भाऊ ब्रॅन्हम, ते कधी घडेल?" मी तुम्हाला सांगू शकत नाही. मला ठाऊक नाही.

336 परंतु, ह्या दिवसांतील एके दिवशी, जर आपण पुन्हा ह्या पृथ्वीवर कधीच भेटलो नाही, आपण पलिकडे—कडे ख्रिस्ताच्या न्यायासनाजवळ भेटणार आहोत. आणि तुम्हाला समजेल, की त्या खोलीत, जे प्रकटीकरण परमेश्वरापासून आले ते त्या इतरांसारखे आहे, जे ते...त्या शिक्क्याचे एक रहस्य, हे कारण की ते प्रगट केले गेले नाही, त्या त्या सात गर्जना होत्या. ज्यांनी त्यांचे शब्द उच्चारले. आणि ते, परिपूर्ण आहे. कारण, कोणालाही त्या विषयी काहीही माहीत नाही. ते लिहीलेले ही नव्हते. म्हणून, आपण अंतिम समयात आहोत. आपण येथे आहोत. मी परमेश्वराला त्याच्या वचनाबद्दल धन्यवाद देतो.

337 मी त्याचा येशू ख्रिस्तासाठी धन्यवाद करतो. कारण त्याला पाठविल्याविना आपल्या पापांचे क्षमेसाठी, आपण सर्व पापाच्या मोठ्या घाणीत, कुठल्याही आशेशिवाय, पडलो असतो. परंतु त्याच्या कृपेद्वारे, त्याचे—त्याचे रक्त सर्व पापे शुध्द करते. अगदी जसे शाईचा थेंब विरंजकाच्या बादलीत, तुम्हाला पुन्हा कधीच शाई सापडणार नाही. जेव्हा आपल्या पापांची कबूली दिली जाते, ते येशू ख्रिस्ताच्या रक्तात टाकले जातात, ते पुन्हा कधीच आठवले जात नाहीत. परमेश्वर त्यांची क्षमा करतो; ते कधीच केले गेले नव्हते. आणि जोपर्यंत ते बलिदान आपल्या प्रायश्चित्तासाठी तेथे आहे, तर तेच पुरेसे आहे. हेच ते आहे. समजले? आपण—आपण ह्यापुढे पापी नाहीत. आपण परमेश्वराच्या कृपेद्वारे, ख्रिस्ती आहोत. लक्षात ठेवा, आपण स्वतः इतके वाईट असू जेवढे ह्या पूर्वी नसू. परंतु, पाहा, परमेश्वराची कृपा आपल्याला मिळाली आहे, आणि तिनेच आपल्याला बनविले आहे जे आपण आज आहोत, ख्रिस्ती भाऊ व बहिणी.

338 हा माझ्यासाठी भयंकर आठवडा होता. मी थकलो आहे. माझे मन थकले आहे. कारण मी—मी माझ्याकडे...सर्वात उत्तम आहे जे मी करु शकलो. आणि प्रत्येक दिवशी, काही अद्भूत घडत आहे. मी विस्मयीत असतो; त्या खोलीत जाताना, आणि काही मिनीटांसाठी तेथे राहताना, आणि पाहा कशाने तरी मला पूर्णपणे वळवले.

339 आणि, येथे, मी, तेथे जातो आणि टिप्पणी करतो. मी डॉ. स्मित, उरीया स्मित, आणि, ओह, सर्व—लेखकांची आणि सर्व काही पुस्तके वाचली. त्या पुस्तकांना खोलवर वाचले. मी म्हणालो, "आता *येथे* सहावा शिक्का आहे. *येथे* चौथा शिक्का आहे. आता हा मनुष्य काय सांगतो? तो म्हणेल, 'अच्छा, ते *हे* होते, *ते*, किंवा *दुसरे* काही.'" मी येथे पाहिले आणि दुसरा व्यक्ति मिळाला. तो म्हणाला ते *अमुक-आणि-अमुक* होते. आणि ते ह्यासारखे दिसत होते. मी फक्त...ते बरोबर कार्य करु शकले नाही. समजले?

340 मग मी विचार केला, “बरे, प्रभू, हे काय आहे?” आणि मी थोडा वेळ वर–खाली चाललो. मी खाली गुडघे टेकले आणि प्रार्थना केली. पुन्हा गेलो आणि बायबल उचलले, खाली बसलो, वाचू लागलो. पुन्हा चाललो आणि अशाप्रकारे.

341 मग, अचानक, जेव्हा मी शांत झालो, येथे ते अशाप्रकारे प्रगट झाले. तेव्हा मी त्वरीत एक पेन घेतला, आणि ते लिहीण्यासाठी गेलो. जे काही मी पाहत आणि करीत होतो. ते लिहून घेईपर्यंत, त्याकडे अशाप्रकारे पाहत होतो.

342 मग उरलेल्या दिवसांत, मी ते घेऊन खाली जायचो आणि त्याचा तपास करायचो. आणि पाहायचो की ते वचनाशी जुळते की नाही. मग, “सर्व गोष्टी सिध्द होतात.” समजले? मला हे येथे सापडले.

343 आणि मी विचार केला, “आता तेथे खूप जणांना दृष्टांत झाला. खूप जणांना प्रकटीकरण मिळाले.” जर ते वचनाच्या विरुध्द आहे, तर ते सोडून दे; ते बरोबर आहे, ते सोडून दे.

344 आता, आता, मग मी तेथून निघालो. *अशा* प्रकारे खाली *अशा* धावत गेलो, खाली धावत गेलो. मी येथे लहान गोष्टी टिपून ठेवल्या आहेत. मला वाटले, “ठीक आहे, आता, वर्ग हे ऐकून आनंदी होईल, कारण हे *येथे* जुळते आणि हे *येथे* जुळते. आता, आपण पाहुया, हे *येथे* काय सांगते? होय. आणि, येथे ते आहे, अगदी *येथे*.” समजले?

345 आणि पुन्हा बायबलमधून पाहून आणीत असे, आणि आठवडाभर, त्या गोष्टी जुळवीत असे. ते, येथे टेपवर आहे. तुमचे त्यासाठी स्वागत आहे. आणि मी हे माझ्या ज्ञानाच्या उत्कृष्टतेनुसार, ख्रिस्ताच्या सहभागितेखाली, परमेश्वराच्या कृपेने, सर्व मनुष्यासाठी येशू ख्रिस्ताद्वारे केले आहे. जे मला ठाऊक आहे, त्यानुसार मी हे उत्कृष्टरित्या केले आहे.

346 तुम्ही एक सर्वात उत्कृष्ट श्रोते आहात. तेथे यापेक्षा अधिक चांगले कोणीही बनू शकले नसते. तुम्ही सर्व येथे दिवसा एक वाजता आला आहात. आणि पाच वाजेपर्यंत, जेव्हा त्यांनी आराधनालय उघडले आणि आणले...लोकांना आत येऊ दिले. तुम्ही थंडीत उभे राहीलात; तुम्ही बर्फामध्ये बसलात; तुम्ही सर्वकाही केले, भीतींच्या बाजूने उभे राहिलात, तुमचे पाय दुखेपर्यंत. मी काही पुरुषांना पाहिले, खाली बसलेले; स्त्रीयांना बसू द्या. आणि ठिकठिकाणी काही अशाप्रकारे उभे होते, सभोवती बसलेले. मला वाटले. “प्रभू, हे सर्व...”

347 हा एक रहस्यमय आठवडा होता. सर्व गोष्टी अशा प्रकारे अद्भूत होत्या. कसे, जेव्हा लोक येथे, त्यांना सभोवती बाहेर, खिडक्यांमध्ये, दरवाजांमध्ये, मागे, सगळीकडे बसलेले, ऐकत असलेले पाहात. आणि एक वक्ता, मी वक्ता म्हणून खूप दूर आहे. माझ्या—माझ्याकडे तेवढे ज्ञान आहे, की कळावे की मी नाही, की मी एक वक्ता नाही. परंतु का लोक अशाप्रकारे बसतील आणि ऐकतील? ते का असे करतील? ते माझ्यासारख्या व्यक्तीला ऐकण्यासाठी येत नाही. परंतु ते येतात कारण तेथे काही गोष्ट आहे, जी लोकांना तेथे आकर्षित करते. समजले? तेथे काही गोष्ट आहे, जी त्यांना आकर्षित करते.

348 जसे माझी पत्नी येथे व्यासपीठावर उभी होती आणि गात होती, जेव्हा मी आरंभ केला होता.

ते पूर्वेकडून आणि पश्चिमेकडून आले,
ते दूर प्रदेशांतून आले.
राजा बरोबर उत्सव करण्यासाठी, त्याचे पाहुणे म्हणून जेवण्यासाठी.
हे यात्रेकरु किती धन्य आहेत!
त्याचे पवित्र मुख न्याहाळत आहे.
दिव्य प्रकाशाने चमकत आहे;
त्याच्या कृपेचे भागीदार धन्य आहेत,
जसे त्याच्या मुकूटात रत्न चमकतात.

349 तुम्ही हे सदैव तुमच्या मनात ठेवा, “येशू ख्रिस्ताच्या मुकूटातील एक रत्न बनणे.” पौलाने मंडळीला म्हटले, “तुम्ही—तुम्ही त्याच्या मुकूटाचे दागिने, रत्ने आहात.” आपण येशू ख्रिस्ताच्या मुकूटाचे रत्न बनू इच्छितो.

350 आपण कधीही, एखाद्या व्यक्तिला त्यात ठेवू इच्छित नाही. तुम्ही माझ्याविषयी सर्वकाही विसरुन जा. मी तुमचा भाऊ आहे. एक पापी कृपेने वाचलो आहे, जगण्यास योग्य नाही. ते अगदी सत्य आहे. मी तुम्हाला नम्र होण्यास सांगत नाही, हे सत्य आहे. माझ्यात काहीच नाही, एकही चांगली गोष्ट नाही, बिलकुल नाही.

351 परंतु परमेश्वराच्या कृपेने माझ्या दीन, मंद डोळ्यांनी काळाच्या पडद्यामागील आणि पलिकडच्या त्या गोष्टी पाहाव्या असे केले, आणि मी परत आलो.

352 जेव्हा मी एक लहान मुलगा होतो, मी लोकांवर प्रेम केले. मला नेहमीच वाटायचे कोणीतरी माझ्यावर प्रेम करावे आणि माझ्याशी बोलावे. कोणीच ते केले नाही, कारण माझ्या कुटूंबाच्या नावामुळे. कोणीच माझ्याशी बोलत नसे.

353 परंतु जेव्हा मी स्वतः परमेश्वराला समर्पित झालो, तेव्हा...आमचे लोक, त्यांची पार्श्वभूमी, एक आयरिश म्हणून, मी विचार केला, “*कदाचित*...ते सर्व कॅथलिक होते, आणि कदाचित हे असू शकेल.” मी *तेथे* गेलो, आणि तो वेगळ्या प्रकारे होता. आणि मी प्रथम बाप्तिस्ट मंडळीत गेलो, आणि तो काही वेगळा मार्ग होता.

मी म्हणालो, “प्रभू, तेथे कोणता तरी मार्ग असेल जो सत्य आहे.”

आणि कोणीतरी म्हणाले, “ते वचन आहे.”

मी ते वचन पकडले आहे. प्रत्येक दृष्टांताकडे पाहा, सर्वठिकाणी.

354 ज्या दिवशी मी तो कोनशीला पलिकडे ठेवला, आणि तो तेथे ठेवला, मी तेथे त्यावर लिहीले जे त्याने मला त्या सकाळी दृष्टांतात दाखवले. “वचनाची घोषणा कर. सुवेळी, अवेळी तयार राहा, सर्व प्रकारच्या सहनशीलतेने व शिक्षणाने दोष दाखीव. निषेध कर व बोध कर. कारण ते सुशिक्षण ऐकून घेणार नाहीत, तर आपल्या कानांची खाज जिरावी म्हणून ते स्वेच्छाचाराने आपणांसाठी, शिक्षकांची गर्दी जमवितील, आणि ते सत्य ऐकण्यापासून फिरतील, व कल्पित कहाण्यांकडे वळतील, अशी वेळ येईल.” आणि मी ती दोन झाडे पाहिली, ज्याच्याजवळ मी उभा होतो, ती गोष्ट कर. ते बरोबर आहे. आणि तेथे आपण आहोत. आणि ते सत्य आहे. आणि, आता, तु नाही...

355 लक्षात ठेवा. मला तुम्हाला पुन्हा बजावून सांगू द्या. कोणालाही, “धन्यवाद,” म्हणू नका, म्हणू नका, ह्यावर विचार करा, कोणी सेवक किंवा काहीतरी, कोणी मर्त्य मनुष्य; त्याच्याविषयी काही चांगले आहे. कारण, काहीही नाही. मी पर्वा करीत नाही की तो कोण आहे. कोणत्याही मनुष्यात काहीही चांगले नाही. ते बरोबर आहे.

356 जर तेथे तुतारीचा मोठा ठीग असेल, आणि त्यांच्यातील एकाचा काहीतरी संगीताचा ध्वनी काढायचा असेल, तो मनुष्य हे...त्या तुतारी पूर्णतः मुक्या आहेत. तो एक व्यक्ती आहे जो ती तुतारी वाजवू शकतो, ज्याला ठाऊक आहे तो काय करणार आहे, तोच ती तुतारी उचलतो. तुतारीला त्याच्याशी काही कर्तव्य नाही. आवाज त्यामागे असलेल्या बुद्धीमत्तेकडून येतो. ते बरोबर आहे. म्हणून, सर्व तुतारी सारख्याच आहेत.

357 सर्व मनुष्य सारखेच आहेत. सर्व ख्रिस्ती सारखेच आहे. आमच्यामध्ये कोणीही मनुष्य महान नाहीत. आपण महान पुरुष नाहीत, महान स्त्रीया नाही. आपण सर्व भाऊ आणि बहिणी आहोत, सर्व सारखे, एकाच चौकटीत. आपण कोणी “महान” नाहीत. कोणी कुणाला कुणापेक्षा महान बनवीत नाही, एकही गोष्ट नाही, कोणी काहीही करा. नाही, महाशय. परंतु आपण सर्व फक्त मनुष्य आहोत.

358 गोष्टींचा अर्थ सांगण्याचा प्रयत्न करु नका. इतर गोष्टी करण्याचा प्रयत्न करु नका शिवाय फक्त येशू ख्रिस्ताच्या समीप जगा, त्याला स्तुती आणि सन्मान देत. सर्व जणांना आता ते समजले? [मंडळी म्हणते, “आमेन”—सम्पा.] तुमच्या संपूर्ण हृदयाने त्याला प्रेम करा. तुम्ही ते करता काय? [“आमेन.”]

> मी त्याच्यावर प्रेम करतो, (आणि मी करेन!) मी त्याच्यावर प्रेम
> करतो,
> कारण त्याने माझ्यावर प्रथम प्रेम केले
> आणि माझे तारण विकत घेतले.
> त्या कलवरीच्या झाडावर.

359 परमेश्वराची स्तुती होवो! प्रत्येकाला व्यवस्थित समजले काय? [मंडळी म्हणते, “आमेन”—सम्पा.] काय सर्वजण विश्वास करतात. [“आमेन.”] लक्ष द्या. जेव्हा मी प्रथम सुरुवात केली, “आमच्या वार्तेवर कोणी विश्वास ठेवला? देवाचा भूज कोणास प्रगट झाला?” काय त्याने तुला त्याची दया, चांगुलपण प्रगट केले? [“आमेन.”] “आमेन” फक्त लक्षात ठेवा, तुमच्या संपूर्ण हृदयाने त्याच्यावर प्रीती करा.

360 मी आता घरी परत जात आहे. मी येथे पुन्हा, अंदाजे एक जूनला परत येईन, जर प्रभूची इच्छा असेल तर.

361 कदाचित, जर प्रभूने माझ्या अंतःकरणात घातले, तर कदाचित ग्रीष्म ऋतुच्या आरंभी, जसे जून किंवा असेच कुठे, बर्फ पडण्याच्या वेळेस, जर प्रभूने उशीर केला. मला परत येण्यास आणि आणखी सात रात्री घालविण्यास आवडेल अंतिम सात तुताऱ्यांसाठी. तुम्हाला ते आवडेल का? तुम्हाला ते आवडेल का? [मंडळी म्हणते, “आमेन.”—सम्पा.] काय तुम्ही माझ्यासाठी प्रार्थना कराल, की परमेश्वराने माझे सहाय्य करावे? [“आमेन.”] ठीक आहे.

362 मी तुम्हास पुन्हा भेटेपर्यंत, हे चांगले जूने गाणे स्मरण करा:

> मी त्याच्यावर प्रेम करतो, मी त्याच्यावर प्रेम करतो
> कारण त्याने माझ्यावर प्रथम प्रेम केले
> आणि माझे तारण विकत घेतले
> त्या कलवरी झाडावर.

363 आता माझी इच्छा आहे की तुम्ही तुमचे मस्तक झुकवावे. मी तुमच्यासाठी प्रार्थना करु इच्छितो. पाळकाने सभा बरखास्त करण्याआधी, मी तुमच्यासाठी प्रार्थना करु इच्छितो.

364 आमच्या स्वर्गीय पित्या, प्रभू, लोकांना कळो. माझी खात्री आहे की तेथे काही जण आहेत ज्यांना समजत नाही. परंतु, पित्या, त्यांना—त्यांना हा उद्देश कळू दे. आणि त्यांना समजू दे, पित्या, की—की ही तुझी त्यांच्यावर झालेली कृपा आहे की ह्या गोष्टी प्रगट केल्या आहेत. आणि मी तुला धन्यवाद देऊ इच्छितो, प्रभू तू ह्या गोष्टी कळण्यासाठी दिलेल्या ज्ञानाबद्दल की तू आम्हास प्रगट केले आहे.

365 आणि मी येथे असलेल्या प्रत्येकासाठी, जे ह्या सभांना उपस्थित होते, प्रार्थना करतो. जर तेथे कोणी आहेत जे विश्‍वास करीत नाही, प्रभू, ते विश्वासी बनोत.

366 मी त्या सर्वांसाठी प्रार्थना करतो जे ह्या टेपद्वारे आलेला संदेश ऐकतील. आणि ह्यात संशय नाही जर हा घरांमध्ये आणि पुष्कळ अविश्‍वासणाऱ्यांच्या हाती विविध स्थळांवर पडणार आहे, परंतु, पित्या मी ह्या प्रत्येकांसाठी प्रार्थना करतो, की कोणीही देवनिंदात्मक शब्द बोलण्याआधी असे होवो की ते प्रथम बसतील आणि वचनांचा शोध घेतील ज्यातून हे बोलले गेले आहे. आणि मग तुला म्हणतील की ते खरोखरीच प्रामाणिक आहेत आणि जाणू इच्छितात की हे सत्य आहे, किंवा नाही. आणि पित्या, मी त्यांच्यासाठी प्रार्थना करतो.

367 आणि मी त्यांच्यासाठी प्रार्थना करतो जे ह्या भींतीजवळ उभे आहेत, जे बाहेर उभे आहेत, जे त्यांच्या मोटारीत बसले आहेत. त्यांच्या लहान लेकरांसाठी, आणि सर्वांसाठी जे आत आहेत. आणि प्रभू मी त्या सर्वांसाठी प्रार्थना करतो.

368 आणि मी प्रार्थना करतो की माझ्या प्रार्थनांचे उत्तर मिळेल, तू त्यांना आशीर्वादीत करशील. प्रथम, प्रभू, प्रत्येकाला सार्वकालिक जीवन दे. मी प्रार्थना करतो की तेथे त्यांच्यातील एकाचाही नाश होणार नाही, एकाचाही नाही.

369 आणि आता, पित्या, आम्हाला ठाऊक नाही. केव्हा ही महान घटना घडेल. परंतु जेव्हा आम्ही ही चिन्हे घडताना पाहतो आणि वचनांनुसार घटना पाहतो, आपली अंतःकरणे उत्साहाने भरतात. आणि मी प्रार्थना करतो, पित्या परमेश्‍वरा, की तु आम्हास सहाय्य करशील.

370 मी प्रार्थना करतो की तू आमच्या प्रिय पाळकांचे ब्रदर नेवीलचे सहाय्य करशील. प्रभू, त्याला अनुग्रहाने आणि सामर्थ्याने परिपूर्ण कर, आणि तुझ्या ज्ञानाने भर, ह्यासाठी तो हे संग्रहीत अन्न घेईल आणि देवाच्या कोकरांना खाऊ घालील.

371 प्रभू, मी प्रार्थना करतो की तू आजार आमच्यापासून दूर करशील. असे होवो, की जेव्हा लोक आजारी होतील, ते येथील उपस्थिती आणि सर्व पुरेसे असलेल्या येशू ख्रिस्ताचे रक्त जे येथे वेदीवर आहे, त्याचे स्मरण करतील, जे प्रायश्चित करते. आणि मी प्रार्थना करतो की ते त्वरीत निरोगी केले जातील.

372 आणि मी प्रार्थना करतो की तू त्यांना सैतानी शक्तीपासून दूर ठेवशील, त्यांना आवरावे किंवा संप्रदाय करण्याच्या प्रयत्नांना थांबवावे. किंवा, प्रभू, शत्रूच्या सर्व शक्तीपासून त्यांना दूर ठेव. तुझ्या वचनासाठी आम्हास पवित्र कर. प्रभू, ते प्रदान कर.

373 तर, प्रभू, मी प्रार्थना करतो की तू माझे सहाय्य करशील. मी—मी—मी क्षीण होत चाललो आहे. प्रभू मला ठाऊक आहे की माझे अधिक दिवस असू शकत नाही. आणि मी प्रार्थना करतो की प्रभू, तु माझे सहाय्य करशील की मी प्रामाणिक राहावे, आणि इमानदार आणि खरे राहावे, ह्यासाठी की मी हा संदेश धारण करण्यासाठी पात्र व्हावे ज्यासाठी मला नियुक्त केले आहे. आणि जेव्हा समय येईल की मी झोपी जावे, आणि मी नदीपाशी जावे, आणि लाटा आत येऊ लागतील. हे परमेश्‍वरा, मी समर्थ व्हावे की ही

तलवार कोणाच्यातरी हाती सोपवावी जो तिच्याशी प्रामाणिक राहील, प्रभू, आणि सत्याने भरेल. प्रभू, हे प्रदान कर. आणि, तोपर्यंत मी शक्तिमान आणि निरोगी, आणि धैर्यवान व्हावे म्हणून माझे सहाय्य कर.

374 माझ्या मंडळीचे सहाय्य कर. प्रभू आम्हास आशीर्वाद दे. आम्ही तुझे आहोत. आम्ही अनुभव करीत आहोत की तुझा आत्मा आम्हामध्ये आहे. आम्ही विश्वास करतो की तु आमच्या प्रार्थनांचे उत्तर देशील. ह्यासाठी, आम्ही स्वतःला तुला, तुझ्या वचनासह, तुझ्या सेवेसाठी आमचे ह्या पृथ्वीवरील उर्वरित दिवस परमेश्वराचा पुत्र, येशू ख्रिस्त, आमचा प्रिय तारणारा ह्याच्या नावाने, त्याच्या गौरवासाठी समर्पित करतो. आमेन.

मी...(परमेश्वर तुम्हास आशीर्वादीत करो!)...मी त्याच्यावर प्रेम
करतो, (माझ्या संपूर्ण हृदयाने)
कारण त्याने मजवर प्रेम केले.

375 भाऊ नेव्हील, परमेश्वर तुला आशीर्वादीत करो...? ...तुमचे कार्य चालू राहो...? ...

## सातवा शिक्का पूढे चालू

376 [तुम्ही आता मुळ *सातवा* शिक्का ऐकण्याचे संपविले आहे ज्याचा प्रचार पूर्णतः रविवार संध्याकाळ, 24 मार्च, 1963 ला ब्रॅन्हम टॅबरनॅकल, जेफर्सनव्हिले, इंडियाना येथे झाला होता. भाऊ ब्रॅन्हमची इच्छा नव्हती की हे मूळ रेकॉर्डिंग प्रेक्षिपित व्हावे. दुसऱ्या दिवशी, सोमवार 25 मार्च, 1963, भाऊ ब्रॅन्हम, भाऊ फ्रेड सॉथमन आणि भाऊ जेम्स मॅग्वायर ह्यांच्या हॉटेलच्या खोलीत गेले. ज्यांच्यावर त्या समयी टेप बनविण्याची जबाबदारी होती. भाऊ ब्रॅन्हम ह्या भावांना म्हणाले, "माझी इच्छा नाही की हा संदेश अशाप्रकारे बाहेर जावा." ती टेप स्वतः ऐकल्यानंतर, त्यांनी त्या भावांना सुचना केली की ही टेप ठराविक ठिकाणी, थांबवावी. आणि त्या ठिकाणी (परिच्छेद क्रमांक 261 च्या सुरुवातीला) नविन भाग अंदाजे 20 मिनिटे लांबीचा रेकॉर्ड केला (परिच्छेद 377—415). हा नविन भाग मूळ भागाच्या शेवटी परिच्छेद 261—373) ह्याऐवजी वापरला गेला. हे रेकॉर्डिंग फक्त "सात शिक्के" ह्याचे 1966 पर्यंत प्रक्षेपित झालेली आवृत्ती आहे. भाऊ ब्रॅन्हमच्या निधनानंतर, विलियम ब्रॅन्हम इवॅन्जेलिजम असोसिएशनच्या मंडळाने एकमताने ब्रॅन्हम टॅबरनॅकल येथे मूळ रेकॉर्ड झालेली टेप प्रक्षेपित करण्यासाठी मान्यता दिली. त्या समयापसून, दोन्ही आवृत्या उपलब्ध आहेत. आम्ही आता ह भाऊ ब्रॅन्हमचा अतिरिक्त संदेश एका टेपवर, मूळ "सात शिक्क्यांसह" ठेवलेला आहे. जो नंतरचा आवाज तुम्ही ऐकता हा भाऊ ब्रॅन्हम ह्यांचा हॉटेलच्या खोलीवरील सोमवार, मार्च 25,1963 चा आहे.]

377 ही एक चांगली गोष्ट होईल की त्याला ह्याविषयी काहीही ठाऊक नाही. कारण, जर त्याला कळले, तर तो त्याची नक्कल करील. ह्या त्याच्या गोष्टी करण्याच्या युक्त्या आहेत.

378 म्हणून, त्या कारणामुळे परमेश्वराने हे संपूर्ण जगासाठी असे गुप्त ठेवले आहे, स्वर्गासाठी देखिल, की ते समजण्याचा कोणताही मार्ग नाही, फक्त परमेश्वर, स्वतःच, ते प्रगट करील.

379 आता, मी, आजरात्री, तुमचे लक्ष त्या सहाव्या शिक्क्याकडे वेधू इच्छितो, तेथे एक—एक सहाव्या शिक्क्याचे तीन उद्देश होते.

त्या घोडेस्वारांचे तीन उद्देश होते.

380 ह्या सर्व गोष्टींमध्ये तीन उद्देश आहेत. ती आपणास परत तीनाकडे आणते. आणि पुन्हा सात, पाहा, सात शिक्के, सात पीडा, आणि इत्यादी. आता, तीन आणि सात, हे परमेश्वराचे अंक त्याच्या गणिताचे त्याचे वचन प्रगट करण्याचे आहेत.

381 आता तुम्ही लक्ष द्या, जसे—तो—तो घोडेस्वार, आता, तीन घोडे बाहेर गेले. त्यांच्यातील एक पांढरा होता, एक लाल होता, एक काळा होता. आणि मग, चौथा घोड्यात, का, ते सर्व रंग एकत्र मिसळलेले होते. पाहा, तीन उद्देश.

382 आता, परमेश्वराने तीच गोष्ट केली. परमेश्वराने तीच गोष्ट केली जेव्हा त्याने त्याचा सिंह पाठवला, जो त्याचे वचन होता, त्या ख्रिस्तविरोधकाशी लढण्यासाठी

383 मग आपण पाहतो की, सहा संकटाच्या काळात तो बैल पाठवतो, अर्पणाचा पशू आणि ह्या महासंकटाच्या काळात, हेच सर्व लोक करु शकले, फक्त एक कार्य होते, दास व्हा, आणि स्वतःला अर्पणासाठी द्या.

384 नंतर आपण, पुढच्या युगात येतो, जे सुधारकांचे युग होते, परमेश्वाराने मनुष्याचे ज्ञान पाठवले, पशूंवर मनुष्यासारखे मस्तक, जे सुधारकांचे सामर्थ्य होते जे पाठवले गेले होते.

385 आता काय तुम्ही लक्ष दिले काय? प्रत्येक...ह्यात आश्चर्य नाही की ह्या दिवसांतील लोक अजूनही जसे सुधारकांच्या युगात होते तशा प्रभावास जीवन व्यतीत करत होते, कारण ते तसे—तसे धर्मोपदेशकाच्या मार्गाप्रमाणे त्याकडे पाहत होते. ते त्याकडे पाहत होते, जसे सेमीनरीत शिकवले जात होते. एकेकाळी तो परमेश्वराचा मार्ग होता, परंतु आपण तो भूतकाळात जगलो आहे.

386 आता आपण गरुडाच्या युगात आहोत, प्रकटीकरण प्रगट होणे आहे, संपूर्ण गोष्ट. आता ह्याची तुलना प्रकटीकरण 10 वा अध्याय, 1 ते 7 वचनाशी करा. आणि आपण ह्या प्रकटीकरणात पाहू, येथे प्रकटीकरण, 10:1 ते 7, की, “सातवा दूत कर्णा वाजविण्याच्या बेतात असेल, तेव्हा देवाची सर्व गुजे पूर्ण होईल.”

387 आता आपल्याला कळते, की, ह्या सहाव्या शिक्क्यात, आता उघडला आहे, तो तीन उद्देशासाठी होता. आता, येथे ते उद्देश होते.

388 पहिली गोष्ट, ही होती, की मूर्ख कुमारीकेला पवित्रीकरणासाठी महासंकटाच्या काळांतून जावे लागेल. तिला तिच्या अविश्वासाच्या पापांबद्दल आणि संदेश नाकारल्यामुळे शुध्द व्हावे लागेल. हे, महासंकटाच्या काळात झाले. आपण पाहतो ते सर्व येथे प्रकटीकरण 7 मध्ये, येथे 6 व्या व 7व्या अध्यायामध्ये, तीला शुध्द केले गेले, आणि तीला तिचे शुभ्र झगे दिले गेले. आता, ती वधू नाही. परंतु ती मंडळी आहे, ते पवित्र लोक ज्यांना—ज्यांना—ज्यांना कदाचित, संदेश स्विकारण्याची संधी मिळाली नाही, किंवा अन्य प्रकारे त्यांना ह्या खोट्या संदेष्ट्यांद्वारे आंधळे करण्यात आले होते. आणि त्यांना—त्यांना संधी मिळाली नाही, आणि तरीही ते खरोखरी अंतःकरणातून प्रामाणिक होते. आणि परमेश्वर त्यांचे अंतःकरण जाणतो. आणि येथे ह्या समयात, त्यांना शुध्द केलेले आहे.

389 तुम्ही त्याकडे लक्ष द्या, हा दुसरा शुध्दीकरणाचा समय, जो इस्त्राएलाकरिता आहे, जेव्हा ती एकत्रित होते. हा दूसरा उद्देश आहे. परमेश्वर इस्त्राएलास महासंकटामध्ये शुध्द करतो. तेथे एकत्रित झालेल्या लाखोंपैकी, निवडलेले एक लक्ष चव्वेचाळीस हजार आहेत, आणि त्यांनापण, शुध्द केले जाईल. परमेश्वर इस्त्राएलास शुध्द करीत आहे.

390 लक्ष द्या, संपूर्ण पृथ्वी शुध्द केली जाणार आहे. काही अशा गोष्टी होतील की चंद्र, तारे आणि संपूर्ण सृष्टी, शुध्द केली जाईल. तुम्हाला समजते ते काय आहे? पृथ्वी तिला नवीन करीत आहे, शुध्दीकरणाद्वारे हजार वर्षाच्या काळासाठी तयार होत आहे. एक

हजार वर्षाचा काळ येत आहे. आणि, पाहा, सर्व गोष्टी ज्यांस मलिनता आहे त्या सहाव्या शिक्क्याच्या समयात शुध्द केल्या जात आहेत.

391 आता, आता, तुमच्या लक्षात आले का? हा सातवा शिक्का उघडतेवेळी येथे तीस्तरीय रहस्य आहेत. हे एक मी...बोलेन आणि बोललो आहे त्या, की ते सात गर्जनांचे रहस्य आहे. त्या सात गर्जना स्वर्गामध्ये हे रहस्य प्रगट करतील. ते ख्रिस्ताच्या आगमनसमयी होईल, कारण ख्रिस्ताने म्हटले त्याच्या आगमनाविषयी कुणालाही ठाऊक नाही.

392 काय तुम्ही लक्ष दिले, जेव्हा यहुद्यांनी त्याला विचारले की? ...जेव्हा आपण ह्या शास्त्रलेखाची तुलना मत्तय 24 बरोबर करतो, सहा शिक्क्यांसह, सातवा शिक्का सोडला आहे. कारण, तुम्हा ठाऊक आहे, ख्रिस्ताने म्हटले, "फक्त परमेश्वर स्वतः जाणतो. देवदूतांनाही नाही." ह्यात आश्चर्य नाही, ते लिहीलेलेही नाही. तुम्हास ठाऊक आहे ते शांत झाले; तेव्हाही काहीच घडले नाही. देवदूतांना ते ठाऊक नाही, कोणालाही ठाऊक नाही. तो केव्हा येणार आहे.

393 परंतु, तेथे—तेथे सात वाण्या होतील, ह्या गर्जनांच्या, त्या समयी हे महान प्रकटीकरण प्रगट करतील. म्हणून, मी विश्वास करतो, आम्हास कोण...जर आपणास ते ठाऊक नाही, आणि जर आपण ते त्या समयात प्रगट केले जाणार नाही. परंतु ते त्या दिवसात प्रगट केले जाईल, त्या समयात ज्यात ते प्रगट होणे आहे. म्हणून, आपणासाठी कुठली गोष्ट आहे ती ही की आपण परमेश्वरासमोर आदरयुक्त व्हावे आणि त्याची सेवा करावी, आणि ते सर्व करावे जे करणे आम्हाला ठाऊक आहे, आणि एक चांगले ख्रिस्ती जीवन जगावे. येथे, आता, आपल्याला समजले आहे की सहावा शिक्का आपल्यासाठी उघडला आहे, आपण तो पाहिला. आणि आपल्याला ठाऊक आहे की सातवा शिक्का लोकांसाठी फोडू शकत नाही. जोपर्यंत तो समय येत नाही.

394 आता, तेथे काही कारण होते की परमेश्वराने ह्या सात गर्जनांचे शब्द उच्चारुन दिले कारण, ते आले पाहिजे, समजले. कारण...आपण पाहतो की ख्रिस्त, तो कोकरा, ते—ते पुस्तक त्याच्या हातामध्ये घेतले, आणि त्याने तो सातवा शिक्का उघडला. परंतु, तुम्हाला समजले, ते एक दडलेले रहस्य आहे. ते कोणालाही ठाऊक नाही. परंतु ते—ते, ह्याबरोबर त्याने काय सांगितले, "त्याचे आगमन कोणालाही कळणार नाही." त्यांना ह्या सात गर्जनांचे रहस्य देखिल कळणार नाही. म्हणून, तुम्ही पाहा, ते एकत्र जुळलेले आहेत.

395 आज, त्याविषयी आपल्याला इतकी समज आहे, कारण बाकी सर्व प्रगट झाले आहे; परंतु हे प्रगट झालेले नाही. परंतु माझ्या खोलीमध्ये बसलो असता, आणि मी हे ऐकले...किंवा ते ऐकले नाही, किंबहुना, परंतु ह्या सात गर्जना प्रगट होताना पाहिल्या. आता, तेथपर्यंतच, आपण जाऊ शकतो.

396 आणि आता माझा विश्वास आहे की तुमच्यातील प्रत्येकजण परमेश्वराची सेवा कराल आणि तेच कराल जे योग्य आहे. आणि आणि तुमच्या संपूर्ण जीवनात त्याच्यावर प्रेम करा, आणि त्याची सेवा करा. आणि बाकीची परमेश्वर चिंता करील.

397 आता, आपण, परमेश्वराच्या कृपेने, समाप्तीपर्यंत आलो आहोत, ती सर्व रहस्ये जे सहा शिक्क्यांमध्ये मोहोरबंद होते, आणि आपल्याला समजते आणि जाणतो की सातवा शिक्का लोकांना प्रगट केला जाणार नाही.

398 आता, त्याचे आगमन, त्याच्या आगमनासमयी, जेव्हा पृथ्वीचा नाश, तुम्हाला ठाऊक आहे. त्याने तेथे म्हटले, "आपल्या येण्याचे व युगाच्या समाप्तीचे चिन्ह काय?" मत्तय 24 मध्ये, तेथे त्यांनी त्याला हा प्रश्न विचारला. तो तेथे खाली गेला. त्याने 31व्या

वचनात म्हटले, की इस्त्राएल एक राष्ट्र म्हणून एकत्रित होईल, मत्तय 24:31 परंतु नंतर त्याने दाखल्यावर बोलण्यास आरंभ केला, समजले. तेव्हा तुम्ही पाहा..."अंजिराच्या झाडाचा दाखला घ्या. त्याची डहाळी कोमल असता तीला पाने फुटू लागली; म्हणजे उन्हाळा जवळ आला, असे तुम्ही समजता. आणि तसेच तुम्हीही ह्या सर्व गोष्टी पाहाल, तेव्हा तो जवळ, दाराशीच आहे." असे समजा. पाहा, इस्त्राएल त्याच्या जन्मभूमीत जमा होत आहे. परंतु, तुम्ही लक्ष द्या, त्याने सातव्या शिक्क्याचे प्रकटीकरण वगळले आहे.

399 आणि येथे, जेव्हा सातवा शिक्का, जेव्हा त्याने तो उघडला, त्याने पुन्हा तो वगळला, पाहा. म्हणून आपण पाहतो की ते पूर्णतः रहस्य आहे, म्हणून हे रहस्य जाणण्याचा समय अजून आला नाही. म्हणून आपण इतके दूर आहोत, आणि बाकी येशूच्या पृथ्वीवरील पुन्हा प्रगट होण्याच्या वेळी प्रगट केले जाईल, त्याच्या वधूसाठी, किंवा जे काही त्यासमयी घडेल. आता, त्या समयापर्यंत, आपण सर्व केवळ प्रार्थना करुया, चांगले जगूया, सरळ, ख्रिस्ती जीवन, त्याच्या आगमनाची वाट पाहात.

400 आणि आता जर ही टेप कोणा व्यक्तीच्या हातात पडली, तर ह्यामधून कुठल्याप्रकारचा पंथ बनवू नका. फक्त एकच गोष्ट तुम्ही करा, तुम्ही फक्त परमेश्वराची सेवा करीत राहा. कारण, हे महान रहस्य इतके महान आहे की परमेश्वराने योहानाला देखील ते लिहू दिले नाही. त्याची गर्जना झाली, परंतु तो...हे जाणून की आपल्याला वचन दिले आहे की ते उघडले जाईल. परंतु, ह्या समयापर्यंत, ते उघडले नाही.

401 आणि आता आपण परमेश्वराचे आभारी आहोत जे काही त्याने आम्हास दाखवले आहे. मी तेथे वर खोलीमध्ये आठ दिवस बसलेलो होतो. आणि संदेश जो मी आता तुम्हाला समजावला आहे, तुमच्यातील कित्येकजण समजतील. आणि मी वचन दिले आहे की तेथे काहीतरी आत्मिक, सर्वसमयी, घडत आहे. माझी खात्री होती की तुम्ही ते चुकवले होते. आणि येथे ते आहे; हे ह्या शास्त्रलेखाच्या अनुवादाचे परिपूर्ण समर्थन आहे की ते परमेश्वराने पाठवलेले आहे.

402 कारण, आपण ह्यामध्ये जाण्याअगोदर, आणि मी पश्चिमेकडे जाण्यास गेलो, प्रभूने एके दिवशी, सुमारे दहा वाजता, एके सकाळी, मला एक दृष्टांत दाखवला. आणि मी येथे आलो आणि तो स्पष्ट केला, की तो मी पाहिला होता. समजलो नाही की तो काय होता. तो सात स्वर्ग दूतांचा एक समुह होता. आपण त्याचे स्मरण करुया. तुम्हाला तो टेपवर मिळेल, *महाशय, हा समय कुठला आहे?* ठीक आहे, आता, तुम्ही अगदी तेच पाहात आहात. ते सात स्वर्गदूत...मी पश्चिमेला होतो.

403 तुम्हाला लक्षात आहे, ते छोटे—छोटे संदेशवाहक, ते पूर्वेकडे गेले. दुसरे संदेवाहक, कबुतरे, थोडेसे मोठे पक्षी, ते पूर्वेला गेले. आणि मग मी पाहिले...ते माझ्यासोबत सर्व समयी होते. ते पहिले आणि दुसरे आकर्षण होते.

404 आता, तिसरा पश्चिमेकडून आला, भरमसाठ, तीव्र वेगाने, पुढे आले, आणि त्यांनी मला वर उचलले. ते परत पूर्वेकडे ह्या सात शिक्क्यांच्या रहस्यासह, येते होते. जसे ज्युनियर जॅक्सनच्या स्वप्नात सांगितले गेले, की प्रभू मला त्याच्यासाठी अनुवाद करु दे, "त्या पिरॅमिडच्या आत, तेथे एक पांढरा खडक होता, ज्यावर काहीच लिहीले नव्हते." त्याच कारणासाठी मला पश्चिमेला जावे लागले की ह्या स्वर्गदूतांच्या संदेशाशी जोडावे, परत येऊन मंडळीला ते प्रगट करावे. स्मरण करा, मी म्हणालो, "पुढची गोष्ट जी घडेल ती मंडळीत होईल." हे अगदी खरे आहे.

405 दुसरी गोष्ट, मला वाटते की तुम्ही लक्ष द्या की काय घडले. आणि जर तुम्ही, *महाशय, हा काय समय आहे?* ही टेप ऐकली, तर तुम्हाला कळेल की एक स्वर्गदूत माझ्यासाठी

विशेष लक्षणीय होता. त्यांच्यातील इतर अगदी साधारण दिसत होते. परंतु तो स्वर्गदूत एक विशेष स्वर्गदूत होता. समुहात जे पिरॅमिडच्या रुपात होते, तो माझ्या डावीकडे होता.

406 आणि, लक्षात ठेवा, ते पिरॅमिडमध्ये होते, जेथे तो रहस्यमय पांढरा खडक होता ज्यावर लिहीले नव्हते. आणि स्वर्गदूत स्वतः मला त्या पिरॅमिडमध्ये घेऊन गेले, परमेश्वराची रहस्य केवळ त्यांना ठाऊक होती. आणि, आणि, ते संदेशवाहक त्या पिरॅमिडचा अनुवाद करण्यासाठी आले होते, किंवा त्या सात शिक्क्याच्या रहस्याचा संदेश जो त्या पिरॅमिडच्या आत होता.

407 आता, स्वर्गदूत, जो माझ्या डावीकडे होता, तोच वास्तवात अंतिम असेल, किंवा सातवा स्वर्गदूत, जर आपण त्यांना डावीकडून उजवीकडे मोजले, कारण तो माझ्या डावीकडे होता; मी त्याच्याकडे पाहात होतो, पश्चिमेकडे, तो पूर्वेकडे येत होता, डाव्या बाजूला असेल. म्हणून, तो शेवटच्या दूताचा संदेश असेल, खूप लक्षणीय. लक्ष द्या मी कसे सांगितले, त्याचे डोके मागे होते; आणि त्याचे मोठे धारधार पंख होते; आणि कसे तो माझ्याकडे उडला. आता, तोच हा सातवा शिक्का आहे. आम्ही...अजूनही संस्मरणीय होता. आणि आम्ही...आपल्याला ठाऊक नाही तो काय आहे, अजूनपर्यंत, कारण तो फोडण्याची परवानगी नाही.

408 परंतु आता, ह्या सभेतील तुम्हा प्रत्येकजणाने हे पाहिले की, ही सभा कशी होती! प्रत्येकजण आपल्या आसनाच्या शेवटी दिसत होता. आणि सर्वजण येथे दुपारच्या एक, दोन वाजल्यापासून, दरवाजा उघडण्याची वाट पाहात आणि येथे पुढे येण्यासाठी उभा आहे. भिंतीसभोवती उभे होते, आखडलेल्या हातांचा, आणि सर्व गोष्टी.

409 ते काय आहे? हा पवित्र आत्मा आहे. जो त्याचे संदेशवाहक खाली पाठवतो, आणि त्यांनी आपल्याला ते प्रगट केले आहे. आणि मग लक्ष द्या की कसे ते वचनाशी, तंतोतंत जुळले आहे.

410 आणि तर तुम्ही सर्वांना सांगितले की हे सत्य आहे, त्याने ते अगोदरच सांगितले अंदाजे—अंदाजे दोन महिने किंवा अधिक, ते घडण्याअगोदर. जेव्हा मी पश्चिमेला गेलो, ते ठाऊक नसता; ह्या अनुवादासह परतलो जसे त्याने ते दिले. आता लक्ष द्या, त्या दृष्टांतामध्ये त्याने मला त्या दृष्टांतात एक गोष्ट कधीच सांगितली नाही जेव्हा त्याने मला वर नेले. मी घाबरलो होतो, भीत होतो की मी मरणार आहे, त्या विस्फोटात मेला असतो. तुम्हाला माहीत आहे, ते तसे करु शकले नाही.

411 तो अनुवाद तसाच आला जसा मला त्याची गरज होती, ते त्या खोलीमध्ये आले होते, आणि मी ते दिले जसे त्याने मला ते दिले.

412 आता, मित्रांनो तुम्ही पाहा, दृष्टांत कधीच असफल होत नाही. ते सदैव परिपूर्ण असतात. ते बिलकुल सत्य आहेत.

413 आता, दृष्टांत, अधिक वचन, अधिक इतिहास, अधिक मंडळीची युगे, आणि सर्व एकत्रित मिसळलेले आहेत. म्हणून, मी सत्याने सांगू शकलो, की माझ्या उत्कृष्ट समजण्याप्रमाणे, आणि परमेश्वराच्या वचनानुसार, आणि तो दृष्टांत आणि ते प्रकटीकरण, त्याचा अनुवाद हे **प्रभू असे म्हणतो** असे आहे.

414 आता, प्रभू तुम्हा सर्वांना, प्रत्येक जणास, खरोखरीच खूप आशीर्वादीत करो, आता जसे आपण उभे आहोत आणि हे जुने चांगले मंडळीचे गीत गातो. परमेश्वर तुम्हा प्रत्येकास आशीर्वादीत करो. आमेन.

415 [भाऊ ब्रॅन्हमने ह्या खालील चार ओळी परिच्छेद 374—375 मधून घेऊन ह्यात घातली आहेत, त्याच्या कालच्या संध्याकाळच्या संदेशातून, मार्च 24, 1963—सम्पा.]

मी...(परमेश्वर तुम्हास आशीर्वाद करो!) ...मी त्याच्यावर प्रेम
करतो, (माझ्या संपूर्ण अंतःकरणाने),
कारण त्याने मजवर प्रथम प्रेम केले.

भाऊ नेविल, परमेश्वर तुला आशिर्वादीत करो...?...कार्यावर रुजू राहा...?...

***सातवा शिक्का*** MAR63-0324E

(The Seventh Seal)

***सात शिक्क्यांचे प्रगटीकरण सत्र***

हा संदेश मूळ रूपाने इंग्रजीत भाऊ विलियम मेरियन ब्रॅन्हम यांनी रविवारी संध्याकाळी, 24 मार्च, 1963 रोजी, अमेरिकेच्या इंडियानाच्या जेफरसनविले येथील ब्रॅन्हम टेबरनेकल, जेफरसनविले, इंडियाना, यु.एस.ए मधून प्रचार केला होता.

MARATHI

©2020 VGR, ALL RIGHTS RESERVED

VOICE OF GOD RECORDINGS, INDIA OFFICE
19 (NEW NO: 28) SHENOY ROAD, NUNGAMBAKKAM
CHENNAI 600 034, INDIA
044 28274560 • 044 28251791
india@vgroffice.org

VOICE OF GOD RECORDINGS
P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.
www.branham.org

## छपाईच्या हक्काची सूचना

संपूर्ण हक्क राखीव आहेत हे पुस्तक घरातील प्रिंन्टरवर स्वतःच्या उपयोगा करिता, किंवा दूस-यांना मोफत देण्या करिता, येशू ख्रिस्ताची सुवार्ता प्रसार करण्या करिता एक साधन म्हणून छापू शकता येईल. हे पुस्तक विकू शकता येणार नाही. किंवा फार मोठया प्रमाणावर प्रती काढण्यास मनाई आहे. किंवा वेबसाईडवर प्रसार करण्यास मनाई आहे. कोणत्याही प्रकारच्या पुर्नःप्राप्ति प्रणाली मधून नक्कल करण्यास मनाई आहे. दूस-या भाषेत भाषांतर करण्यास किंवा रक्कम गोळा करण्यास मनाई आहे. या सर्व गोष्टीं करण्याकरिता Voice of God Recodings यांची लिखित परवानगी घेणे आवश्यक आहे.

अधिक माहिती करिता किंवा इतर उपलब्ध गोष्टीं करिता कृपया संपर्क साधा.

VOICE OF GOD RECORDINGS
P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.
www.branham.org